# गोमंतकातील कीर्तन परंपरा : एक चिकित्सक अभ्यास

## (Gomantakatil Kirtan Parampara: Ek Chikitsak Abhyas)

एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


**अभ्यासक**

**कु. सायली रामकृष्ण गर्दे.**

**हजेरी क्र. 22P0190024**

**ABC ID 945397903271**

**पी. आर 201902833**

**मार्गदर्शक**

**प्रा. विनायक ल. बापट**

**(सहायक प्राध्यापक)**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


**गोवा विद्यापीठ**

**एप्रिल २०२४**

# GOMANTAKATIL KIRTAN PARAMPARA: EK CHIKITSAK ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Master's Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**


**by**

**Sailee Ramkrishna Garde**

**Seat No: 22P0190024**

**ABC ID:** 945397903271

**PRA:** 201902833


Under the supervision of

**AST. PRO VINAYAK L. BAPAT**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

**Shenoi Goembab School of Language & Literature**

**Goa University**

**April 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "Gomantakatil Kirtan Parampara: ek Chikitsak Abhyas" is based on the results of investigations carried out by me in Marathi Discipline, Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Mr. Vinayak Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University will not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

सायली ग. गाडे

Signature and Name of Student

Seat no: 22P0190024.

Date: 16/04/2024.

Place: Goa University

Scanned with OKEN Scanner

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report titled "**Gomantakatil Kirtan Parampara: Ek Chikitsak Abhyas**" is a bonafide work carried out by Ms. **Sailee Ramkrishna Garde** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **MA in Marathi** in the Discipline **Marathi Discipline** at the **Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.**

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16/04/2024

Signature of Dean of the School/HoD of Dept

Date: 25/04/2024

Place: Goa University.

GOA UNIVERSITY
SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE
TALEIGAON PLATEAU

School/Dept Stamp

Scanned with OKEN Scanner

## ऋणनिर्देश .

कीर्तनकाराच्या घरात जन्म झाल्यामुळे मी भाग्यवान ठरले. लहानपणापासून कीर्तनाची आवड होतीच. त्याशिवाय बालपणापासून कीर्तन भक्तीची सेवा माझ्याकडून होत आहे. परंतु या विषयावर कधी अभ्यास होईल असे वाटले नव्हते. गोवा विद्यापीठातील, मराठी अध्ययनशाखेत अध्ययन करताना प्रबंधिकेसाठी विषय निवडायचे होते. सुरुवातीला काही वेगळे विषय सुचले होते, त्यात काही कीर्तनासंबंधीचे होतेच परंतु डॉ. प्रा.विनय मडगावकर सर यांनी

प्रबंधिकेसाठी 'गोमंतकातील कीर्तन परंपरा: एक चिकित्सक अभ्यास' हा विषय अभ्यासासाठी घेण्याचे आव्हान दिले. सुरुवातीला अगदी आनंदाने मी विषय स्वीकारला. परंतु ज्यावेळी कीर्तन संबंधातील संदर्भांचा शोध घेऊ लागले तेव्हा हाती खूप कमी प्रमाणात संदर्भ ग्रंथ आढळले. खास करून गोमंतकातील कीर्तन परंपरेच्या बाबतीत मडगावकर सर यांनी लिहिलेला एक लेख व डॉ.गोविंद काळे यांचे पुस्तक हाती लागली. त्याशिवाय अन्य माहिती नव्हती. सर्व माहिती ही कीर्तनकारांच्या मुलाखती घेऊन करावी लागणार होती. त्यात ज्येष्ठ कीर्तनकार स्वर्गवासी झाले त्यामुळे थोडे दडपण आले. कारण बरीच माहिती त्यांच्याकडे असण्याची शक्यता होती.

त्यानंतर अभ्यासाला सुरुवात झाली. सर्वप्रथम ह.भ.प.सुहासबुवा वझे यांनी मार्गदर्शन केले. मुलाखत देऊन विषय निवडी बद्दल कौतुकही केले. कीर्तन विषयातील त्यांना अपेक्षित असलेले विषय कसे आले पाहिजे, गोमंतकीय कीर्तनाचे स्वरूप कसे होते याची माहिती दिली. मी त्यांचीही अत्यंत ऋणी आहे. त्यानंतर आरोग्यविषयक समस्यांमुळे थोडा काळ अभ्यास करता आला नाही परंतु त्यात देखील माझे वडील, ह.भ.प.रामकृष्णबुवा गर्दे यानी बरीच माहिती पुरविली. त्यानंतर श्री हेमंत कथने, यांनीही आपल्या पणजोबांच्या संदर्भात माहिती दिली. त्यानंतर ह.भ.प.उदयबुवा फडके यांचे मला मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्येक वेळी मी सांगेन त्यावेळी त्यांनी माझ्यासाठी पुस्तके काढून ठेवली, फोनवरून संपर्क केला, जशी मिळेल तशी माहिती पुरवीत राहिले. या अभ्यासा बाबतीत त्यांनी मला खूप मदत केली. तपशीलवार माहिती दिली याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

ह.भ.प.सोमाबुवा गांवस यांनीही मला मार्गदर्शन केले. हा अभ्यास माझ्याकडून व्यवस्थित व्हावा यासाठी लागेल ती मदत करण्याची तयारी दाखविली. स्वतःहून फोन करून, काही अडचण असेल तर ती सांगून, अनेकांचे संपर्क क्रमांक देऊन, कीर्तनकारांची यादी देऊन मदत केली. त्यांचेही बरेच सहकार्य लाभले. ह.भ.प.विवेकबुवा जोशी यांनीही फोनवरून मुलाखत दिली. तपशीलवार काही माहिती सांगितली, वेगवेगळ्या विषयांवर प्रबोधन कसे करता येईल याही विषयावर मार्गदर्शन केले. कीर्तनासाठी सध्या काय आवश्यक आहे व कीर्तनातून आपल्याला काय साध्य करता येऊ शकते, राजकीय पातळीवर कीर्तनाबाबतीत कसे बदल होणे आवश्यक आहे या विषयी माहिती पुरविली. अगदी मनापासून मी त्यांची ऋणी आहे. ज्येष्ठ बुवा, ह.भ.प.मुकुंदराज मडगावकर यांनी अगदी वृद्धावस्थेत असून, आरोग्य ठीक नसतानाही वेळ देऊन, हरिभक्त परिषदेची वाटचाल समजावून सांगितली, कीर्तन परंपरे विषयी मार्गदर्शन केले. वेळोवेळी मडगावकर सरांनी जमेल तसे सहकार्य केले. याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

मला ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प.मनोहरबुवा आमशेकर यांनी आंतरजाल माध्यमातून मुलाखत दिली, ती सोय सौ. वैदेही आमशेकर यांनी केली. अतिशय समर्पक शब्दांत त्यांनी कीर्तना विषयीची माहिती दिली. कीर्तनाचे स्वरूप कसे असावे या विषयी मार्गदर्शन केले. वासुदेव जोशी यांनी चिदंबर संप्रदाया विषयी माहिती दिली व कीर्तन परंपरे बद्दल मार्गदर्शन केले. कीर्तनसम्राज्ञी ह.भ.प.राधाबाई कामत यांचे सुपुत्र श्री सनतकुमार कामत व त्यांच्या सूनबाई यांनी वेळात वेळ काढून ह.भ.प.राधाबाई कामत यांच्या संबंधित व त्यांच्या कीर्तन अभ्यासा विषयी माहिती दिली. या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे युवा कीर्तनकार ह.भ.प.शिवानी वझे, ह.भ.प.श्रेया टेंगसे, ह.भ.प.नेहा उपाध्ये यांनी वेळात वेळ काढून मुलाखती दिल्या त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. त्याचप्रमाणे माझ्या या प्रबंधिकेसाठी मला ह.भ.प.शरदबुवा घाग, ह.भ.प.किरण बुवा तुळपुले, प्रा.अदिती बर्वे यांनी मला सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

हा अभ्यास यशस्वी व्हावा यासाठी मला लाभलेले मार्गदर्शक प्रा. विनायक लक्ष्मण बापट यांनी योग्यप्रकारे मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय अभ्यास होणे अशक्य होते. परंतु त्यांनी अभ्यासाचे वेगवेगळे पदर उलगडून दाखवले. आमच्या विभागातील अन्य शिक्षक वर्ग, डॉ. हेमंत अय्या सर, प्रा.जयेश सरानी तर कीर्तन विषयक असणाऱ्या समस्या दूर केल्या. अय्या सरानी मार्गदर्शन केले. डॉ.सुनीता उम्रस्कर मॅडम यांनी मदत केली. याबद्दल मी सर्वांची अत्यंत ऋणी आहे.

त्याचप्रमाणे माझे मित्र व मैत्रिणी यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले. ओंकार, कुलदीप, वेदिका, उर्मिला, अपूर्वा यांनीही मदत केली. माझी कुटुंब मंडळी यांनी मला सहकार्य केले. आईने मुद्रित शोधन करण्यात बरीच मदत केली. माझी मैत्रीण, प्राप्ती गावकर हिनेही मला तांत्रिक अडचणीत मदत केली. याबद्दल मी सर्वांची मनापासून ऋणी आहे. डॉ.वृंदा केळकर मॅडम, प्रा.वीणा मॅडम यांनीही सहकार्य केले. त्यांचीही मी अत्यंत ऋणी आहे.

माझ्या या प्रबंधिकेसाठी मला ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले, कळत नकळतपणे मदत केली त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

**अनुक्रमणिका**


| अनु.क्र. | प्रकरणे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तावना | १-४ |
| ०२ | प्रकरण १. कीर्तनाचे स्वरूप व संकल्पना | ५-७० |
| ०३ | प्रकरण २. नारदीय व वारकरी कीर्तन परंपरा व प्रकाराची तुलना. | ७१-९४ |
| ०४ | प्रकरण ३. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा इतिहास | ९५-११० |
| ०५ | प्रकरण ४. गोमंतकामधील कीर्तनातील परिवर्तने. | १११-११६ |
| ०६ | प्रकरण ५. निष्कर्ष व समारोप. | ११७-१२२ |
| ०७ | परिशिष्ट | १२३-१३३ |
| ०८ | संदर्भसूची | १३४-१३५ |

# प्रस्तावना

गोमंतकमध्ये धार्मिक वातावरण आहे. कित्येक वर्षे जुनी मंदिरे गोव्यात आहेत व त्यातून विविध उत्सवांच्या माध्यमातून अनेक भक्ती प्रकार आयोजित केले जातात. त्यातील एक भक्ती म्हणजे कीर्तन. कीर्तन हे समाज प्रबोधनाचे साधन व माध्यम या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आध्यात्मिक विचारांची देवाण-घेवाण होण्याकरीता उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे सामाजिक, ऐतिहासिक, विषयांचा समावेश त्यात केला जातो. कीर्तन प्रकारात नवरस व इतर विविध कला समाविष्ट असतात. प्राचीन काळापासून चालत आलेली कीर्तन परंपरा अखंडित आहे. या कीर्तन प्रकारांमध्ये कालानुरूप आशय – अभिव्यक्तीत जे बदल झाले त्याचा विचार या प्रबंधिकेमध्ये केलेला आहे.

गोमंतकातील कीर्तन परंपरेचा आढावा, विविध कीर्तनकारांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत व त्या अनुषंगाने अभ्यास केला आहे. कीर्तनाची आवश्यकता व वैशिष्ट्ये याचा विचार केलेला आहे. महाराष्ट्र व गोवा या भागातील कीर्तन प्रकाराला केंद्रस्थानी ठेवून गोमंतकातील कीर्तन परंपरेचा एक चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रबंधिकेमध्ये कीर्तनाचे स्वरूप संकल्पना नारदीय व वारकरी कीर्तन याचा तुलनात्मक अभ्यास गोमंतकातील कीर्तन परंपरेचा परिचय गोमंतकातील कीर्तनातील परिवर्तने अशा प्रकरणांचा समावेश केलेला आहे. महाराष्ट्र व गोमंतकाला केंद्रस्थानी ठेवून हा अभ्यास केल्याने दोन्ही राज्यातील कीर्तनाचे असणारे अद्वितीय स्थान व सांस्कृतिक पार्श्वभूमी यांचा परिचय होतो. त्याशिवाय वारकरी व नारदीय कीर्तनातील भिन्नता, स्वरूप व आजतागायत हेच दोन कीर्तन प्रयोग जास्तीत जास्त प्रमाणात सादर केले जातात याची कारण मीमांसा समजून येते.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या कीर्तनपरंपरेचे स्वरूप व विद्यमान कीर्तनाचे स्वरूप याचा प्रत्यय प्रबंधिकेतून येतो. या प्रबंधिकेच्या मार्फत कीर्तनातील विषय वैविध्यता, प्रकारांतील विविधता यांचा परिचय होतो. किर्तन भक्तीचा मार्ग स्वीकारल्यानंतर येणाऱ्या आव्हाने, राजकीय पातळीवरील काही उणिवा, कीर्तनाला अधिकाधिक जनमानसापर्यंत पोहोचवण्याची कीर्तनकारांची असणारी धडपड व त्यासाठी केले जाणारे प्रयत्न यांचे दर्शन प्रबंधिकेच्या माध्यमातून झालेले आहे.

प्रस्तुत प्रबंधिका, भूत वर्तमान व भविष्य काळातील कीर्तनाचे प्रयोजन व बदलांचा आढावा घेणारी आहे. त्याचप्रमाणे कीर्तनात सादरीकरणाच्या अनुषंगाने जे बदल करता येतील त्याचाही विचार केलेला आहे. शेवटच्या प्रकरणातून कीर्तनकारांच्या असणाऱ्या अपेक्षांची मांडणी व वास्तवातील कीर्तनाचे स्थान अधोरेखित केलेले आहे.

**संशोधन विषयक समस्या.**

कीर्तन हे पूर्वपरंपरेने चालत आलेले आहे. या परंपरेची नेमकी वैशिष्ट्ये, आवश्यकता, साधन व माध्यम या अनुषंगाने कीर्तनाची उपयुक्तता, आशय अभिव्यक्तीतील बदल अशा गोष्टींचा विचार केलेला आहे.

गोमंतकात विविध उत्सव साजरे केले जात असले तरी ठराविक उत्सवातच कीर्तनांचे सादरीकरण केले जाते. गोमंतकात नारदीय कीर्तन परंपरा आहे. नारदीय कीर्तन परंपरेतील वैशिष्ट्यांचा विचार या अभ्यासात समाविष्ट आहे.

अजूनही कीर्तनात श्रोत्यांचा समावेश तेवढ्याच प्रमाणात आहे याची कारणमीमांसा केलेली आहे. गोमंतकातील काही बाल कीर्तनकार, युवा कीर्तनकार उर्वरित काळात कीर्तने चालू ठेवत नाही या कारणाचा विचार केलेला आहे.

कीर्तनाचे अन्य प्रकार असताना गोमंतकात केवळ नारदीय कीर्तन परंपरेचा अवलंब होत असल्याची कारणमीमांसा समजून घेतलेली आहे. त्याचप्रमाणे गोमंतकातील बदलत्या कीर्तन विषयांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधन पद्धती.**

गोमंतकातील कीर्तन परंपरा: एक चिकित्सक अभ्यास, या प्रबंधिकेमध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहे. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा आढावा घेताना, कीर्तन प्रकाराचा इतिहास जाणणे आवश्यक आहे. कीर्तनातील परंपरांचा चिकित्सक अभ्यास करताना, नारदीय व इतर कीर्तन परंपरांचा इतिहास समजणे आवश्यक असते म्हणून ऐतिहासिक पद्धती वापरली आहे.

तौलनिक संशोधन पद्धती.

तौलनिक पद्धती वापरताना गोवा, महाराष्ट्र राज्याला केंद्रस्थानी ठेवल्याने त्यातील कीर्तन प्रकाराच्या भेदांचा विचार केलेला आहे. नारदीय व वारकरी कीर्तन परंपरेतील साम्य भेद पडताळून पाहण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धतीचे उपयोजन केलेले आहे.

सर्वेक्षण संशोधन पद्धती.

या प्रबंधिकेत अभ्यासासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. गोमंतकातील विविध वयोगटातील कीर्तनकारांच्या मुलाखती घेण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरली आहे. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा वारसा पुढे अखंडित चालू ठेण्यासाठी काय काय आव्हाने आहेत व त्यासाठी काय उपाय करावेत याचा विचार करण्यासाठी कीर्तनकारांच्या मुलाखती उपयुक्त ठरणार असल्याने सर्वेक्षण पद्धतीचे उपयोजन केलेले आहे.

वर्णनात्मक संशोधन पद्धती.

वर्णनात्मक पद्धतीने संशोधन केलेले आहे. कीर्तन प्रकारचे आशय अभिव्यक्तीनुरुप वर्णन, कीर्तन परंपरांचे वर्णन करण्यासाठी ही पद्धत वापरली आहे.

**संशोधनकार्याची उपयुक्तता/आवश्यकता**.

गोमंतकातील कीर्तन परंपरेचा अभ्यास ऐतिहासिक, वाङ्मयीन, आध्यात्मिक अशा अनेक पैलूंनी महत्त्वाचा आहे. या कीर्तन प्रकारातून गोमंतकातील सांस्कृतिकतेचा परिचय झालेला आहे. गोमंतकातील धार्मिक समाजाची ओळख होण्यास मदत झालेली आहे.

पूर्वापार चालत असलेल्या कीर्तनपरंपरेचा भूत, वर्तमान व भविष्यातील परिणामांचा परिचय झाला. कीर्तन प्रकाराची वैशिष्ट्ये समजल्यानंतर कीर्तनाचे अद्वितीय स्थान लक्षात आले. गोमंतकातील पारंपरिकतेचा परिचय झाला.

कीर्तन प्रकाराचा साधन म्हणून विचार केला तर उत्सवातील उत्साहाचा प्रत्यय येतो. त्याचप्रमाणे बदलती विचारसरणी पाहता पुढे कीर्तन परंपरा टिकून राहिली पाहिजे यासाठी अभ्यास आवश्यक आहे.

कीर्तनातून क्रांती झालेली आहे याचाच अर्थ पुढेही खुलेपणाने जनमानसात विषय पोहोचवण्यासाठी माध्यम म्हणून कीर्तनाचा विचार अखंड राहावा म्हणून खोलवर अभ्यास केलेला आहे.

कीर्तनाची परंपरा माहीत असल्याने ती टिकवून ठेवण्यासाठी अभ्यास महत्त्वाचा ठरलेला आहे.

**संशोधनकार्यामागची उद्दिष्टे.**

- कीर्तन या कला प्रकाराविषयी संशोधन करणे.
- कीर्तन परंपरा अखंडित सुरू आहे याचे कारण समजण्यासाठी कीर्तनाविषयीची माहिती असणे आवश्यक आहे.
- कीर्तन कलाप्रकार सर्वांपर्यंत पोहोचावा, तरुण पिढीला कीर्तन प्रकाराची नव्याने ओळख व्हावी. कीर्तन हे समाज प्रबोधनाचे माध्यम असल्यामुळे समाज जागृती कीर्तनातून साधली जाते याचा अभ्यास करणे.
- कीर्तन हा कलाप्रकार आध्यात्मिक आहे शिवाय ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक असा व्यापक कलाप्रकार आहे. त्यानिमित्ताने सर्व समाविष्ट असलेल्या कीर्तन कलाप्रकाराचा संशोधनात्मक दृष्टीने परामर्श घेणे.
- कीर्तनात काळानुरूप विषयात बदल आवश्यक असल्यास त्याचा अभ्यास करणे.
- गोमंतकातील नारदीय कीर्तनातील बदलांचा अभ्यास करणे. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा चिकित्सक अभ्यास करणे.
- गोमंतकातील नारदीय कीर्तन परंपरा पुढच्या कालखंडात अशीच सुरू असेल तर त्याचा अभ्यास किंवा नसेल तर त्यासंबंधी उपाय-योजनांचा विचार प्रबंधिकेत केला जाणार आहे.

**गृहीतकांची मांडणी.**

महाराष्ट्र गोवा तसेच इतर राज्यातही कीर्तन हा भक्तीप्रकार प्रचलित आहे. कीर्तन प्रकाराचा आवाका मोठा आहे. महाराष्ट्र व गोवा या राज्यांना केंद्रस्थानी ठेवून कीर्तन प्रकाराचा अभ्यास प्रबंधिकेमध्ये केलेला आहे.

१. गोमंतकामध्ये नारदीय कीर्तन परंपरा अद्याप टिकून आहे.
२. कीर्तन प्रकाराकडे तरुण पिढी नव्या दृष्टीकोनातून पाहत आहे.
३. काळानुरूप कीर्तनातील विषय बदलण्याची आवश्यकता आहे.
४. आधुनिक विचारसरणी, विविध प्रवृत्ती प्रवाह यांचा उल्लेख कीर्तनात येतो.
५. कीर्तनातील विनोद श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यास आवश्यक असतात.
६. कीर्तन परंपरा गोव्यात भविष्यातही अखंडित सुरू राहील याबद्दल शंका वाटते.
७. कीर्तन सादरीकरणाच्या पद्धतीत बदल केले तर तरुण पिढी या विषयाकडे वळू शकेल.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा.**

"गोमंतकातील कीर्तन परंपरा: एक चिकित्सक अभ्यास" या विषयासंबंधी संशोधन करत असताना, कीर्तनाचे व्यापक स्वरूप अभ्यासलेले आहे. विविध कीर्तन संप्रदायांचा उल्लेख, नारदीय व वारकरी कीर्तनाचे स्वरूप, कीर्तन परंपरेचा इतिहास, महाराष्ट्र व गोवा या राज्यांना केंद्रस्थानी ठेवून अभ्यास केला असल्याने, तेथील कीर्तन परंपरेचा आढावा घेतलेला आहे. गोमंतकातील कीर्तन परंपरा, कीर्तनकारांच्या मुलाखती घेऊन, गोमंतकीय कीर्तनाची वैशिष्ट्ये अभ्यासली आहे.

कीर्तन कलाप्रकाराचा अभ्यास व्यापक स्वरूपाचा असल्याने काही मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. इतर कीर्तनाचे प्रकार किंवा संप्रदाय असले तरी प्रबंधिकेत गोमंतकीय कीर्तन परंपरेचा अभ्यास केलेला आहे. गोव्यात असंख्य कीर्तनकार आहेत त्यामुळे केवळ निवडक कीर्तनकारांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

**प्रकरण १.  कीर्तनाचे स्वरूप व संकल्पना.**

प्रास्ताविक.

भारतीय कीर्तन परंपरा ही सांस्कृतिक इतिहासाचे एक प्रभावी माध्यम आहे. “वेदान्त, तत्वज्ञान, शास्त्रे, साहित्य, संगीत, अभिनय, वक्तृत्वाचे अभिनव रसायन म्हणजे कीर्तन”[१]. सर्वांगाने समृद्ध व तीन हजार वर्षांचे प्राचीनत्व लाभलेली अशी कीर्तन परंपरेची महती वर्णिली जाते. कीर्तनाला संकीर्तन, कीर्तन, हरिकथा व स्तवन या संज्ञा वापरल्या जातात. भगवंताच्या नामाची महती, गुणांची कीर्ती वर्णन करून आध्यात्मिक पातळीवरील आनंदोत्कर्श गाठण्याचे साधन म्हणजे कीर्तन. वेदकाळापासून कीर्तनाचे अद्वितीय स्थान असलेले दिसून येते.

भारतीय कीर्तन परंपरेचा विचार करता पुराण काळातील नारदमुनींपासून ही परंपरा सुरू झाली. कीर्तनाचे अंतिम साध्य म्हणजे परमार्थ प्राप्ती. ‘कीर्तन’ ही एक अनुभूती आहे. कीर्तन या शब्दाचा अर्थ एकच आशय सूत्र घेऊन विविध पद्धतीतून अभिव्यक्त केलेले आहे. कीर्तन भक्ती एक दृष्टी बनलेली आहे.

कीर्तन भक्ती कालांतराने आध्यात्मिक अभिवृद्धीचे विविध स्तर उलगडताना दिसते. कीर्तनातील प्रयोजने कालौघात वेगवेगळे आकार घेताना दिसतात. वेदांत उपदेशाचे प्रभावशाली साधन व भगवंताच्या गुण कीर्तीचे वर्णन करणारे सोपे माध्यम म्हणजे कीर्तन.

नवविधा भक्तीतील या द्वितीय भक्तीचे महत्त्व पुराणांमध्ये असलेले आढळते. श्रीमद् भागवतातून कीर्तन भक्तीच्या अनन्यसाधारणत्वाची प्रचिती येते. कीर्तन ही एक सांस्कृतिक संस्था आहे. कीर्तनाचे नेमके स्वरूप, संकल्पना व परंपरा यांचा विवेचनात्मक अभ्यास या प्रकरणातून केलेला आहे.

१.१.१. **कीर्तनाचे स्वरूप.**

‘कृत’ धातूपासून आलेला कीर्तन हा शब्द म्हणजे गौरव वा स्तुती करणे, कथन वा निवेदन करणे. त्याचा अर्थ विष्णूच्या स्तुती पर पदांचे गायन वा त्याच्या कथांचे निवेदन करणे असा आहे. कीर्तन संस्थेला वैदिक काळापासून महत्त्व प्राप्त झालेले आहे. वेदांतील ऋचा देखील भगवंताच्या स्तुती पर वचनांचे दाखले देताना कीर्तनाचे महत्त्व प्रतिपादित करतात. कीर्तन या शब्दासाठी कीर्ती, कीर्तनम्, कित्तने, कथा, कथने, सेवा, प्रसाद व भजन इत्यादी शब्द वापरलेले दिसतात. नवविधा भक्तीतील असणाऱ्या या अद्वितीय कीर्तन भक्तीचे विविध अर्थ आढळतात. त्यापैकी काही प्रमुख अर्थ खालील प्रमाणे आहेत.

“(१) कीर्तनम् (कृत्- भावे ल्युट्) (अ) Telling, narrating. (ब) Prais- ing, celebrating. (क) A temple, any work of art, a building.

(२) कीत्तणे-सं. कत् म्हणजे स्तविणे, स्तुतिस्तोत्रे गाणे, गुण वर्णन करणे.

(अ) हरिदास वगैरे वीणादी गानसाहित्य घेऊन देवळात परमेश्वराचे उभे राहून गुणवर्णन करतात.

(ब) ईश्वरनामाचा जप.

(क) कथिणे-सांगणे.

(३) कीत्तणे म्हणजे गुणवर्णन करणे. गाणे, कीत्तितमात्रे.

(४) “भक्तीच्या ज्या (नवविधा) नऊ पायऱ्या सांगितल्या आहेत त्यांपैकी कीर्तन ही दुसरी पायरी आहे. कीर्तन करणे ही एक उपासनाच आहे असे ‘सुततं कीर्तयन्तो मां....’ या वाक्यावरून म्हणावयास हरकत नाही. भगवंताची भक्ती करून त्याच्या चरित्राचे गायन करणे हे जरी कीर्तनाचे मुख्य अंग असले तरी जगाला सन्मार्गाला लावणे, त्याला यथायोग्य उपदेश करून हे प्रवर्तित झालेले अनादिधर्मचक्र यापुढे तसेच चालले पाहिजे अशी व्यवस्था करणे हाही कीर्तनाचा एक प्रधान हेतू आहे. तो हेतू साधण्याकरिता म्हणून कीर्तनात देवांच्या व भक्तांच्या निरनिराळ्या कथांचा आदर्श पुढे ठेवण्याची रीत पडली आहे. “

(५) कीर्त्त F (Vulgar For) कीत्ति. Fame or reputation कीर्त्तणे v. C. (कीर्त्तन) To celebrate the praise of, to laud, extol, exalt. कीर्त्तन n. S. (A) Celebrating the praises of a God with music and singing. (B) Reciting the name of deity. कीर्त्तन भक्ति F (S) Worshipping of the Deity by chanting his praises and reciting his names,

(Molsworth Dictionary).

(६) "नवविधा भक्तीपैकी दुसरा भक्तिप्रकार, भगवंताच्या मंगलमय लीला त्यात वर्णिल्या आहेत अशा कथा सांगणे; भगवत्चरित्र पठण करणे, भगवंताचे नाम- संकीर्तन करणे या गोष्टींचा अंतर्भाव कीर्तनभक्तीत होतो."

कलेर्दोषानिधे राजन्नास्ति इयेको महान् गुणः । कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तसङ्गः परं व्रजेत् ॥ १२.३.५१ (भागवत)

"हे राजा, कलियुग हे केवळ दोषांचे भांडार आहे. पण याचा एक मोठा गुण असा की, या युगात केवळ कृष्णाच्या कीर्तनभक्तीनेच मनुष्य संगरहित होऊन परम- पदाला पोहोचतो."

भगवंताचे चरित्रकथन व गुणगान हे कीर्तनात मुख्य असले तरी जगाला तदनुरोधाने सन्मार्गाचा उपदेश करणे हाही कीर्तनाचा एक हेतू असतो.

(७) वीणादिवाद्यसहितं हरिलीलानुवर्णनम्।स्वरूपं कीर्तनस्यास्य सामान्यमिह वर्तते॥

"वीणा, पखवाज, टाळ वगैरे वाद्यांबरोबर श्रीहरिलीलेचे वर्णन करणे हे श्रीहरि-कीर्तनाचे सामान्य स्वरूप आहे.""[२]

(८) कीर्तन – २ : नवविधा भक्तीतील दुसरा प्रकार. भगवंताच्या गुणांचे व लीलांचे कथन करणे, भगवंताच्या नामाचे संकीर्तन करणे, हे त्याचे मुख्य स्वरूप. कीर्तनाने धर्मप्रसाराचे कार्य होते; म्हणून कीर्तन ही सामाजिक संस्था बनली आहे. ( मराठी विश्वकोश, खंड ४, (कीकट ते गाल्फिमिया ग्लॉका), प्रमुख संपादक तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई १९७६, प्रकाशन,सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.) कीर्तन या शब्दाचे असे विविध अर्थ आढळतात.

१.१.२. **कीर्तनाची संकल्पना.**

कीर्तन भक्तीचे वर्णन वेदकालीन आहे. ज्याप्रमाणे कीर्तन या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला जातो, ते अथर्व वेदांतील ऋचांशी साधर्म्य साधताना दिसतात. "तमु ष्टवाम य इमा जजान| (ऋ.८.९६.६) ज्याने ही सृष्टी निर्मिली त्या परमेश्वराचे गुणकीर्तन करतो." "मर्ता अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे| (ऋ.८.११.५) आम्ही मानव, अमर देवता परमात्म्याचे वारंवार कीर्तन करतो." कीर्तनातून परमात्म्याचे गुणवर्णन करणे हा अर्थ अभिप्रेत आहे. यजुर्वेदातील मंत्रभाग स्वाध्यायाची व कीर्तनाची कल्पना स्पष्ट करतो. त्यात "जो सर्वांचा रक्षक, पालक, ज्याचे नाव सुंदर, समर्थ असून लोक सुखावतात अशा त्या ईश्वराचे वारंवार 'कीर्तन' करीत; अशा प्रकारचे उल्लेख आढळतात."[३] सदा सर्वदा कल्याणाची फलश्रुती परमात्म्याच्या कीर्तनातून होते. वैदिक काळातील ब्रम्हणस्पती देवता मंत्रांचे कीर्तन करीत, ते मंत्र गाऊन व विवेचन करून सांगत यावरून कीर्तनाचे प्राचीनत्व प्रत्ययास येते.

विशेषत्वाने कीर्तनाचे संदर्भ वेद, उपनिषद, पुराण यातून आढळतात. त्याचप्रमाणे भगवन्नामकौमुदी, हरिवंश, व्याकरणमहाभाष्य इत्यादी ग्रंथात कीर्तन शब्दाचा उल्लेख आढळतो. कीर्तनाची संकल्पना श्रीमद्भागवत ग्रंथात विपुल प्रमाणात व प्रमाणासहित स्पष्ट केलेली आहे. कीर्तनाचे आद्य प्रणेते म्हणून नारद महर्षींचा आधारासहित उल्लेख केला जातो. नारद महर्षी, शुक हे कीर्तनकार कीर्तने करून सर्वत्र संचार करत, नामस्मरणाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य करीत. महाराष्ट्रीय मराठी संतांनी कीर्तन या संकल्पनेचे सर्वप्रकारे चिंतन करून, कीर्तनाचा अर्थ, महिमा, स्वरूप, ध्येय वर्णन केलेले आहे.

इ.पू. ८००-५०० म्हणजेच उत्तर वैदिक पुराणकाळात आचारधर्म, विचारधर्म यात परिवर्तन घडून येताना दिसले. महाभारत, भगवद्गीता, रामायण, श्रीमद्भागवत्, नारद भक्तीसूत्रे त्याचप्रमाणे पुराणांची निर्मिती झाली. यातून केवळ भगवंताच्या सगुण उपासनेला व भक्तिमार्गाला अग्रस्थान दिले. या परिवर्तनातूनच भारतीय 'कीर्तनभक्ती' निर्माण झाली. श्रीमद् भागवतात कीर्तन भक्तीला द्वितीय स्थान दिलेले आहे. श्रवणं कीर्तन विष्णो स्मरणं पादसेवनं । अर्चनं वदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।। (श्रीमद्भागवत ७|५|२३)

कीर्तनाला 'कथा' आणि कीर्तनकाराला 'कथेकरी' म्हणतात. अग्निपुराणांमध्ये कीर्तन हा शब्द प्रासाद , देवालय या अर्थाने योजलेला आहे. सातव्या शतकामध्ये कीर्तन हा शब्द सार्वजनिक धार्मिक वास्तू, अर्थात भगवंताच्या कीर्तन

भक्तीचे मंदिर अशा अर्थाने घेता येऊ शकतो. विविध प्रांतामध्ये कीर्तन या शब्दाचे भिन्न भिन्न अर्थ वर्णन केले जातात. भारतीय कीर्तन परंपरेचा अवकाश व्यापक आहे. बंगालमध्ये प्राचीन काळी कीर्तन हा लोकनृत्याचा प्रकार म्हणून ओळखला जायचा. बंगालामधील चैतन्य कीर्तन, चंडिदास कीर्तन, मणिपूर व नेपाळमध्ये कीर्तन या प्रकाराचे स्वरूप भक्तीप्रधान नृत्य-नाट्याचे असे होते. त्यांना कीर्तन किंवा कीर्तनीया म्हणत. चौदाव्या शतकात ‘कीर्तने’ हा कर्नाटकातील भक्तीसंगीताचा एक प्रकार निर्माण झाला. कर्नाटकामध्ये दासकूट कीर्तन, पुरंदरदासांची कीर्तनपद्धती, आंध्रातील हरिदासी कीर्तन, त्यागराजाच्या कीर्तन, तामिळातील कथाकालक्षेपम्, उत्तर भारतातील नामसंकीर्तन-गुणसंकीर्तन-लीलासंकीर्तन, आसामतील शंकर देवांचे कीर्तन, पंजाब मधील शबद कीर्तन व महाराष्ट्रातील वारकरी, नारदीय, रामदासी कीर्तन अशा कीर्तन परंपरेच्या संकल्पना यथावकाश प्रगतिशील झाल्या.

१.१.३. **कीर्तनासंबंधीच्या व्याख्या.**

कीर्तनाची व्याख्या करणे कठीण आहे. कीर्तनामध्ये भगवतगुणकथनाचा आविष्कार यथामती, यथाशक्ती साकारला जातो. कीर्तनाची व्यापकता ही भावानुभावाशी निगडित आहे. ज्याप्रमाणे चक्रधर स्वामींनी आंधळयांना देवासंबंधी उपदेश केला, तेव्हा ज्याला जसा देव दिसतो, वाटतो तसा आहे असे सांगितले, त्याप्रमाणे कीर्तनातून भगवंत ज्याला जसा भावला तसा गुणसंकीर्तनातून आकाराला आला. कीर्तनाची व्याख्या शब्दांच्या साचेबद्धतेवर आधारलेली नसून, भावनिकतेवर निर्धारलेली आहे. कीर्तनाच्या व्याख्या पुराणांमधून, कोशातून तसेच विविध कीर्तनकारांनी मांडलेल्या आहेत.

- नारद महर्षी- "स कीर्त्यमान: शीघ्रमेवाविभर्वति अनुभावयाति च भक्तान्"||८०||.(भगवंताची कीर्ती ऐकली किंवा वर्णन केली असता, भगवान लवकर प्रकट होतात व भक्ताला आपल्या स्वरूपानुभव देतात.)(सार्थ श्रीनारदभक्तिसूत्राणी अनुवाद, संपा. प. पू. श्री श्री. द.(मामा)देशपांडे, श्रीवामनराज प्रकाशन, तृ. आ.२००४, पृ. क्र. १९)
- संत ज्ञानेश्वर – कृष्ण विष्णू हरी गोविंद। या नामाचे निखिल प्रबंध। माझी आत्मचर्चा विषद। उदंड गाति॥
- चैतन्य महाप्रभू- "सर्वात्मस्नपनं परम् विजयते श्रीकृष्ण संकीर्तनम्",
- "नामलीला गुणादीनाम उच्चैर्भाषातु कीर्तनम्"।।. भगवंताचं नाम, त्याच्या लीला, त्याचे गुण यांचे उच्च भाषेतले प्रकटन, उच्चार आवर्तन हे कीर्तन आहे.
- नानाबुवा बडोदेकर- 'नाम स्मरणात्मक कथा सांगणे याचे नाव कीर्तन'
- श्री समर्थ रामदास- "सगुण कथा या नाव कीर्तन।" सगुण कथा म्हणजे देवदेवतांचे, थोर व्यक्तींचे गुणवर्णन करणे, त्यांचे चरित्र वर्णन करणे, त्यातून भक्ती, ज्ञान, सत्वगुणांचे वर्णन करणे अव्दैताचे निरुपण करणे. अव्दैत म्हणजे ब्रह्म, माया, आत्मा यांचे निरुपण करणे.
- पं. मदनमोहन मालवीय- "हिंदु जगतमे कथा और कीर्तन धर्मोपदेशकके दो प्रधान साधन है। इनके द्वाराहि हिंदू संस्कृती की रक्षा और प्रचार होगा"[४].

- भागवत संप्रदायातील कीर्तनाची संकल्पना- “वेगवेगळया पध्दतीने काव्य, संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यांच्यासह सादर करीत असलेल्या भक्तीरसपूर्ण कथारुपी एक पात्री निवेदनाला कीर्तन असे म्हणतात.”
- कीर्तनाचार्य विनायकबुवा भागवत-“वाग्वैद्ग्ध्याविराजितं नवनवोन्मेषार्थविलासीकृतम्। गीताऽऽलापकलापितं च भगवल्लीलाविलासीकृतम्। उत्स्याद्यत्र किलावलंव्य महतां पद्म सुबोधप्रदम। तास्मेंश्चेदुपसंहतं भुवि वरं प्रोक्तं हरेः कीर्तनम् ॥ “वीणा व इतर वाद्यांसह श्रीहरी लीलांचे वर्णन करणे हे कीर्तनाचे सामान्य स्वरूप आहे.” (कीर्तनाचार्यकम् ग्रंथ).
- यशवंतबुवा कविश्र्वर- “नवविधा भक्तीत कीर्तनभक्ती द्वितीय असूनही ती अद्वितीय आहे. कीर्तन शब्दाचा अर्थ परमेश्वरविषयक गुणानुवाद, अतिप्रेमाने गायन करणे इतकाच आहे. कीर्तनाचे दोन प्रकार आहेत. (प्राचीन)खाली बसून पुराण- प्रवचन करणे, याचेच नाव वैय्यासिक संप्रदायी कीर्तन आणि उभे राहून प्रभूचे गुणानुवाद गायन करणे हाच नारदीय (कीर्तन) संप्रदाय, कृतयुगातच कीर्तनाचा प्रारंभ झाला. द्वापारयुगाच्या शेवटी पुराणकाळात शुकाचार्यांनी कीर्तन केले. (पुराणकाळाची कीर्तनपद्धती अशी होती. एखादे घेऊन त्यावर बोधप्रद निरूपण करून भक्तिरसपूर्वक साधुसंतांची किंवा परमेश्वराची चरित्रे मधूनमधून दृष्टांतादाखल सुरस पद्धतीने सांगत असत. ती (नारदीय कीर्तनाची) पद्धत पेशवाईपर्यंत (१८ वे शतक) होती.”
- अनेक संतांच्या वचनाद्वारे कीर्तनाची अशी व्याख्या करता येईल की “सगुण-निर्गुण परमात्म्याचे नामस्मरण, नामसंकीर्तन भक्ती म्हणजे कीर्तन.”[५]

वेद, उपनिषदे, शास्त्र, पुराणादी ग्रंथ यांच्या परिपूर्ण अभ्यासातून वक्तृत्व, संगीत, नृत्यांग, अभिनय यांच्या संगमातून, समाजप्रबोधन, लोकशिक्षण, राष्ट्रशिक्षण आदीचे माध्यम बनून, आध्यात्मिक स्थिरतेचे भक्ती साधन म्हणून अभिनिवेशाची स्थिती प्राप्त करवून देणारा, आचार धर्माचे पालन करायला शिकविणारा असा भक्तिमार्ग म्हणजे कीर्तन होय. विद्वत्वचनांच्या आधारे, भगवंताचे गुणकीर्तन, अवतार कार्य वर्णन करण्याचा भक्तिपूर्ण, कलापूर्ण आविष्कार म्हणजे कीर्तन होय.

१.२. **<u>कीर्तनातील विविध प्रकारांचा प्रयोग परिचय</u>**.

कीर्तनाचा इतिहास हा पुरातन काळापासून प्रचलित आहे. वेदोक्त वचनांची पूर्तता कीर्तनातून होते. कीर्तनाची उद्दिष्टे लोकांना ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवणे, प्रबोधन करणे, उपदेश करणे, नीती मूल्यांची जाणीव करून देणे अशा प्रकारची आहेत. वैदिक काळापासून ते संत महात्म्यांपर्यंत तसेच आधुनिक काळातही कीर्तनाचे उद्दिष्ट्य हे प्रबोधनाच्या व भक्तिमार्गाच्या दिशेने जाणारे आहे. कीर्तनाला माध्यम मानून अनेक संप्रदाय उदयास आले. ज्यांनी आपल्या संप्रदायाचा, शुद्ध आचार-विचारांचा प्रचार व प्रसार केला.

पुराणकाळात म्हणजेच जवळजवळ ३००० वर्षांपूर्वी प्राचीन कीर्तन पद्धती उदयास आली. तेराव्या शतकापर्यंत ही कीर्तन पद्धती प्रचलित होती. मध्ययुगीन भारतामध्ये शैव-वैष्णव पंथाच्या भक्ती चळवळीने विस्तार करायला सुरुवात केली. प्रांतातील अनेक भक्ती संप्रदाय व साधुसंत भक्ती मार्गाचा, पंथप्रसाराचा प्रचार करू लागले व त्यासाठी त्यांनी कीर्तन भक्ती अंगीकारली व याच प्रक्रियेतून वैशिष्ट्यपूर्ण प्रांतीय कीर्तन पद्धतीचा विकास सुरू झाला.

मध्ययुगीन भारतीय भक्ती संप्रदायाच्या चळवळीचा विचार करताना असे आढळते की विविध प्रदेशातील संत पुरुषांनी जे तत्वज्ञान, साहित्य, संगीत, तीर्थयात्रा, लोकभाषा व सुबोध भक्तिमार्गाद्वारे आपापले भक्ती संप्रदाय अभिवृद्ध केले. या सर्वांत विविध कीर्तन संप्रदाय निर्माण झाले. कर्नाटकात दासकूट संप्रदाय, आंध्रात त्यागराजांचा भक्तिसंप्रदाय, तामिळनाडूत नायनार-अळवार, महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय, बंगालमध्ये चैतन्य संप्रदाय व पंजाबात शीख संप्रदाय हे सर्व संप्रदाय कीर्तन पंथ प्रसाराचे प्रभावी साधन समजून समाजप्रबोधन करू लागले.

अनेक संतांनी पंथ प्रसारासाठी व भक्तिच्या प्रचारासाठी विविध अभंग, पदांची रचना रागदारी संगीतात केली, भिन्न भिन्न प्रकारचे काव्य रचले. त्यांचा उपयोग कीर्तनात केला. प्राकृत ग्रंथातील विचार, प्रवचन, पुराण, संकीर्तन, भजन, कीर्तन यांमार्फत लोकांपर्यंत पोहोचवले. प्राचीन काळातील कीर्तनाचा संतांनी विकास केला, विविध बदल केले. त्यात काव्य, संगीत, अभिनय, वक्तृत्व, भाषा, निरूपण व सुंदर सादरीकरण शैली अंगिकारून ‘कीर्तन’ नव्याने उदयास आले.

अनेक संतकवी हे कीर्तनकारही होते. पाचव्या शतकात भारतात विविध प्रांतात अनेकविध कीर्तन प्रकार अस्तित्वात आले. त्यात, हरिदासी कीर्तन, दासकूट कीर्तन, कथाकालक्षेपम्, चैतन्य संप्रदायी कीर्तन, आसामी कीर्तन, कथा कीर्तन, नारदीय कीर्तन व वारकरी कीर्तन हे कीर्तन प्रकार विकसित होऊ लागले.

कीर्तन संस्थेत विविध संप्रदायांनी आपापले वेगळेपण विकसित केले. प्रबंधिकेच्या मर्यादेसाठी गोमंतक व महाराष्ट्र या राज्यांना केंद्रस्थानी ठेवल्यामुळे केवळ तेथील कीर्तन प्रकारांचे विवेचन या उप प्रकरणात केलेले आहे.

विविध संप्रदायांनी कीर्तन साधनाचा वापर करून भक्ती मार्गाला, विचाराला, प्रबोधनाला प्राधान्य दिले. प्रत्येकाची कीर्तन पद्धती निराळी असली तरी उद्दिष्ट्य एकच होते व अजूनही आहे. काही प्रचलित असलेल्या कीर्तन पद्धतीचा विवेचानात्मक विचार खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्रातील कीर्तन संस्थेचा विचार करता महानुभाव संप्रदायापासून त्याची महती स्पष्ट होते. कीर्तनामध्ये लीळा, दृष्टांत सांगितले जातात. कीर्तनात विविध शैलिनिरुप प्रयोग आढळतात. नारदीय व वारकरी कीर्तन प्रकारात अनेक उप प्रकार आढळतात.

**नारदीय कीर्तनप्रयोग.**

महाराष्ट्रातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कीर्तन प्रयोग म्हणजे नारदीय कीर्तन होय. या कीर्तनाला 'हरिदासी कीर्तन' अशी संज्ञा वापरली जाते. हा कीर्तन प्रयोग उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, गोवा, कोकण या भागांत प्रसिद्ध आहे. "मराठी रंगभूमीचा उगम या कीर्तन पद्धतीतून झाला आहे."[६]. नारद महर्षी हे या कीर्तन पद्धतीचे आद्य प्रवर्तक आहेत. ही पुराण काळापासून प्रचलित असलेली कीर्तन परंपरा व्यास, शुक, प्रल्हाद, ध्रुव यांच्यापासून कीर्तन परंपरेची श्रेष्ठता मानली जाते. शिवकाळात ही कीर्तन परंपरा स्थिरावली व पेशवे काळात अधिक विस्तारत गेली. शिवकाळात रघुनाथपंडित, निरंजनरघुनाथ, अमृतराय, मधुमुनिश्र्वर या परंपरेतील श्रेष्ठ कीर्तनकार होऊन गेले. पेशवाई कालखंडामध्ये छैयाबुवा गोसावी हे महत्त्वाचे हरिदास होऊन गेले. नारदीय कीर्तन पद्धतीमध्ये मंगलाचरण म्हणताना, गणपती, सरस्वती, श्री गुरु, माता पिता, उपास्यदेवता, ग्रामदेवता, कुलदेवता, स्थानदेवता, अनुग्रहगुरु त्याचप्रमाणे ज्या पठडीतील कीर्तनकार आहे ती पठडी या साऱ्यांना भजनी धुमाळी, यमनकल्याण रागात वंदन केले जाते. या कीर्तन पद्धतीतील पोशाख, जुन्या पठडीतील कीर्तनकार जरिकाठी एकटांगी स्वच्छ धोतर, अंगात बाराबंडी, त्यावर

उपरणे, कानात भिकबाळी डोईवर झिरमुळ्यांची पगडी, गळयात तुळशीची व रुद्राक्षाची माळ, उजव्या हातात सोन्याचे, चांदीचे पवित्रक कपाळी आडवी चंद्रकोर किंवा उभे गंध उजव्या हातात झांज, काही किंवा काळी दोन-चार स्वरात संस्कृत मध्ये मंगलाचरण झाल्यानंतर गोविंदतारकाश्रमांच्या परंपरेतील किंवा नानाबुवा बडोदेकरांच्या परंपरेतील मंगलाचरणचे पद म्हटले जाते.

जय जय रामकृष्ण हरी।। धृ।। गोवर्धनधर गोपालनस्त गोकुळसंकट हारी।।१।। जय राम. नवनीरदसम नवनीतप्रिय, नवलविनोदविहारी ।।२।। जय जय राम. रावणमदहर दीनजनोद्धर, सुरवरमोचनकारी।।३।। जय जय राम.

नाना बुवा बडोदेकरांच्या परंपरेत हे मंगलाचरणाचे पद असे येते- जय जय रामकृष्ण हरी ।। धृ.।।हेचि रसायन सेवन करितां, भगवद् सत्वर हारी।. जय जय राम. निगम दधिचें नवनीताचिं हे, सेविती शिवविधि हरी ।। २ ।। जय जय राम. मानसि ध्याउनि रमती, जेथे, व्यास शुकादिक भारी ।। ३ ।। जय जय राम. चिद् घनरूप गुरू पांडुरंग, शरणागत उद्धारी।।४।। जय जय राम.

या पदानंतर पारंपरिक भजनी धुमाळीत दोन्ही परंपरा, पारंपरिक चाल केरवा द्रुत लयीत पदे म्हणतात.

ये सदगुरुराया, कीर्तनी ये सद्गुरूराया ।। धृ.।। मतिमंद मी कांहीच नेणें सांख्या अथवा न्याया ।।१।। ये सदगुरुरायाऽऽ हीन दीन परि मनांत वाटे, इच्छा तव गुण गाया।। २ ।। ये सदगुरुराया ऽऽ जनार्दन सद् गुरु ते विनवी निरंजनीच्या राया ।।३।। ये सदगुरुराया ऽऽ यानंतर पारंपरिक चालीत केरवा द्रुतलयीत पुढील पद म्हणतात. बाळकृष्ण चरणि लक्ष लागो। कीर्तनसंगे रंगात देह जागो।। धृ.।। स्वरूपी चिन्मय नारायणरूप ध्यावो। तन्मय होवोनी बळवंत प्रेमे गावो ।।१।। सारासार वदविता वंद्य असो रे। मंगलधाम जीवन नरहरि पावो ।।२।।

यानंतर श्रोत्यांना भजन करायला सांगितले जाते. 'राम राम राम राम। सीताराम सीताराम' किंवा जय हरी विठ्ठल। जय जय विठ्ठल,' 'जय जय विठोब्बा रखुमाई' अशी भजने म्हटली जातात. भजन संपल्यानंतर 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' श्री ज्ञानदेव तुकाराम' 'गोपाळकृष्णमहाराज की जय' राजाधिराज रामचंद्र महाराज की जय' 'सदगुरूनाथ महाराज की जय' 'जय जय रघुवीर समर्थ' असा गजर करतात. त्यानंतर उपाश्यदेवतेचा जयजयकार करतात व रागदारीत अभंग म्हणतात. नारदीय कीर्तन पद्धतीत जे अभंग म्हटले जातात ते संतांचे किंवा स्वरचित अभंग असतात. अभंग म्हणताना कधी ख्याल किंवा ठाय त्रितालात बांधलेला असतो. यातून बुवांचे गानकौशल्य प्रकट होते. अभंगानंतर तरणा म्हणून

आख्यान सांगितले जाते. या कीर्तनात पेटी, तबला वादकांचा समावेश असतो. काही ठिकाणी पखवाज, तंबोरा देखील असतो. संस्कृत पठडीतील श्रोतृ वर्ग असल्यामुळे व विद्वान मंडळी असल्याने तशाच दर्जाचे कीर्तनकार या परंपरेत तयार झाले. संस्कृत पठडी म्हणजे वेदांती पठडी. या अभंगाचे जे विश्लेषण केले जाते त्यात तत्त्वज्ञान, वेदान्त अशा विषयांचा अंतर्भाव असतो. वेद, उपनिषदे, पुराणे, श्रीमद्भागवत, भगवद्गीता इत्यादी ग्रंथांची प्रमाणे काही बुवा देतात व संत-पंत-तंत कवींनी रचलेल्या रचनांचाही वापर कीर्तनात केला जातो. पूर्वरंग निरुपणातील भाषा प्रौढ, विदग्ध स्वरूपाची व गंभीर असते. असे पूर्वरंग असतील तर ते क्लिष्ट स्वरूपाचे वाटतात, कारण त्यात वेदांत विवेचन असते परंतु कीर्तनकाराची शैली प्रासादिक असल्यामुळे ते विवेचन रसाळ ठरते. एकही वाक्य वेदांत प्रमाणाशिवाय बोलायचे नाही असा संकेत काही बुवा पाळतात.

पूर्वरंगातील निरूपण हे ईश्वर, ज्ञान, कर्म, भक्ती यांच्याविषयी असते. श्रीमद्भागवतापासून तुकोबांच्या गाथेपर्यंतचे संदर्भ, विविध प्रकारचे दृष्टांत, हरिभक्तीचा प्रसार, सदाचरण या विषयावर भर देणारे असते. नारदीय कीर्तनाची प्रस्थानत्रयी म्हणजे गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्र भाष्य याविषयी पूर्वरंगात निरूपण केल्याशिवाय पूर्वरंगाला सुरुवात होत नाही. त्यातील अवतरणे व मूळ अभंग यांचा सुयोग्य संबंध कीर्तनातून दर्शवला जातो. रामायण, चंपुभारत, चंपुभागवत यासारख्या चंपू काव्याचा वापरही कीर्तनात केला जातो. भाष्य ग्रंथांचा, व्यवहारिक दृष्टांताचा वापर कीर्तनात केला जातो. पूर्वरंगाची सांगता होताच मूळ अभंग गायला जातो. त्यानंतर पुजारी तबकात बुक्का हार घेऊन येतात व देवतेला बुक्का वाहून, कोणी ज्ञानविरुद्ध, तपोवृद्ध, कीर्तनकार किंवा अन्य बुवा आले असतील तर त्यांना बुक्का लावून मग पुजारी बुवांच्या कपाळी बुक्का लावतात. त्यानंतर पुजारी बुवांना बुक्का लावतात. पेटीवादक, तबलावादक ज्या ठिकाणी पखवाज वाजवणार असेल त्यांनाही बुक्का लावला जातो व बुवांच्या गळयात हार घालून त्यांना नमस्कार केला जातो. मंदिरात 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' असा गजर होतो. त्यानंतर उपास्यदेवतेचे किंवा ज्या मंदिरात कीर्तन असेल त्या देवतेचे भजन बुवा सांगतात व श्रोतृ वर्ग ते भजन म्हणतात. भजन संपल्यानंतर उत्तररंगाला प्रारंभ करण्यापूर्वी पेटी वादकाला एखादे पद, गौळण किंवा अभंग म्हणण्यास सांगितला जातो.

उत्तररंगाला प्रारंभ करण्यापूर्वी काही बुवा काव्यातील साकी, दिंडी यांचा वापर करून सुरुवात करतात. आख्यानातील विविध पात्रे सहज सुंदर पद्धतीने कीर्तनकार रंगवितात. संवादात्मक शैलीतून आख्यान वर्णन केले जाते. भारतीय कीर्तन पद्धतीत बुवा स्वकृत किंवा अन्य कवींची पदे ही वापरतात. नारदीय कीर्तनाचे वैभव समजले जाणारे

मोरोपंतांची आर्या; त्याचाही मुबलक वापर कीर्तनामध्ये केला जातो. त्याशिवाय काही बुवा स्वकृत आर्याही रचतात. जुन्या नारदीय कीर्तन पठडीत अधिकाधिक आर्या असलेल्या आढळतात. त्याचप्रमाणे नारदीय कीर्तन प्रकारात कटाव, पाळणा अशा विविध वृत्त, छंद, चूर्णिका, चंपू काव्य, वर्णन काव्य, पद्यरचना, आख्यानकाव्य, लावण्या यांचा वापरही केला जातो. नारदीय कीर्तनातले जुन्या पठडीतून नव्या पठडीतील कथाख्यान हे वेगळे व स्वकृत काव्यावर आधारित होते. गोविंदतारकाश्रम स्वामींची पठडी अत्यंत महत्त्वाची आहे. नारदीय कीर्तन पद्धतीत अनेक घराणी निर्माण झाली त्यात अन्योबावा दशपुत्रे; गोविंदशास्त्री मोडक; विनायकबुवा भागवत; गंगाधरबुवा काशीकर; नानाबुवा बडोदेकर यासारखे प्रख्यात नारदीय कीर्तनकार यांचा समावेश होता. नारदीय कीर्तनामध्ये नवरसांच्या परिशीलनातून आख्यान रंगविले जाते परंतु नारदीय गादीवर बीभत्स रस निर्मू नये असा एक महत्त्वाचा दंडक नारदीय पठडी पाळते. भक्तीला केंद्रस्थानी ठेवून त्यानुरूप नवरसांचा वापर कीर्तनात केला जातो. मुद्राभिनय योग्य प्रकारे केला जातो. संगीतही आवश्यक तेवढेच वापरले जाते. आख्यानातील संवाद मार्मिक भाषेतून बोलले जातात. ज्यावेळी आख्यान एखाद्या विशिष्ट टप्प्यावर पोहोचते त्यावेळी बुवा ते थांबवतात किंवा ते पूर्ण करतात. एखाद्या वेळेस जर सलग कीर्तने असतील तर आख्यानांची विशिष्ट प्रसंगी तोड करून टप्प्याटप्प्याने सविस्तरपणे आख्यान सांगितले जाते. उत्तररंग पूर्ण झाल्यानंतर पूर्वरंग निरुपणासाठी घेतलेला अभंग त्याच्याशी साधर्म्य साधून, आशय सूत्राची व्यवस्थित सांगड घालून, भैरवी रागात अभंग गाऊन व त्यानंतर उपास्य देवतेचे भजन करून, जय जयकार करून, बुवा नारदाच्या गादीला नमस्कार करतात. काही ठिकाणी पुजारी आरतीचे तबक घेऊन बुवांच्या उजव्या हाताशी उभे राहतात व बुवा श्रोत्यांना नमस्कार करून, "हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।. गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ तुका म्हणे गर्भवासी । सुखे गाळावे आम्हासी ॥" हे मागणे मागतात. त्यानंतर गणपती, राम, शंकर, विठ्ठल, कृष्ण, दत्त, देवी यांच्या व संतांच्या आरत्या म्हटल्या जातात, तबकात यथाशक्ती द्रव्य टाकून व आरती संपल्यानंतर पुन्हा एकदा नमस्कार करून कीर्तनाची सांगता होते.

जुन्या पठडीत नारदीय कीर्तनाची घराणी निर्माण झालेली दिसतात व त्यानंतर नव्या पिढीतही त्या पठडीत वाढ झालेली दिसते. जुन्या पठडीतून नवीन कीर्तन पठडी तयार होत असताना विविध बदल होत गेले. प्रत्येक पठडी नारदीय कीर्तन परंपरेचा ढाचा वापरून सादरीकरणात फरक करत गेले. जुनी पठडी कीर्तनाच्या वेळी मृदुंग वापरायची, त्यानंतर पखवाज वापरले जाऊ लागले व नव्या पठडीने तबला स्वीकारला. फिडल सारखे वाद्यही स्वीकारले.

आख्यानांमध्ये परिवर्तन आणले. काही विशिष्ट पठडीत विशिष्ट आख्याने लावण्याची प्रथा असलेली दिसून येते. उदाहरणार्थ, नानाबुवा बडोदेकरांनी 'कर्णपर्व', गंगाधरबुवा काशीकरांनी 'सुभद्राहरण', कऱ्हाडकर पठडीतील दुर्गाआख्यान' व 'भीष्मप्रतिज्ञा' प्रसिद्ध, 'ज्ञानदेवचरित्र' मुरलीधरबुवा निजामपूरकरांचे, 'श्रीकृष्णचरित्र' व 'रामचरित्र' विनायकबुवा भागवत प्रभावीपणे मांडत, 'रामकृष्ण परमहंस', 'नरसी मेहता', 'मीराबाई' ही आख्याने गौतमबुवा पाठक उत्तमप्रकारे सांगायचे, संताख्यानात गौतमबुवा; लक्ष्मणबुवा; नरहरबुवा पायात चाळ बांधून नाचायचे. कीर्तन वाङ्मयात महिपतीबुवा ताहरबादकर, दासगणूमहाराज यांनी अमूल्य भर घातली. या प्रत्येक बुवांनी संहिता बांधल्या. कोणत्या आख्यानात कोणती पदे योजावीत, कोणती वृत्ते असावीत याचे उत्तम आराखडे तयार केले गेले व ते आजही कीर्तनातून वापरले जातात. नारदीय कीर्तनामध्ये स्वयंवर आख्याने अत्यंत प्रसिद्ध आहेत. नारदीय कीर्तन परंपरेत प्रचलित असलेल्या स्वयंवराख्यानात 'रुक्मिणी-स्वयंवर', 'द्रौपदी-स्वयंवर', 'सीता स्वयंवर', 'सुभद्रा स्वयंवर', 'उत्तराहरणाख्यान', 'उषा-स्वयंवर' आदी आहेत. काही ठिकाणी स्वयंवराची आख्याने सांगताना, रेशमी पोशाख केला जातो. जरीकाठी धोतर, रेशमी लांब बाह्यांचा सदरा, रेशमी फेटा किंवा बिनाझिरमुळ्याची पगडी, अंगावर लांब जरीकाठी उपरणे, हाताला अत्तर लावलेले असते, फेट्यात फुलांचा तोरा खोवलेला असतो, हातात फुलांचा सुगंधी गजरा, गळ्यात चार-पाच हार अशा थाटात काही बुवा उत्तरंग सांगतात. नारदीय कीर्तनाची समाप्ती काल्याने होते.

गोविंदबुवा होशिंग यांचे रूक्मिणीस्वयंवर; यशवंतबुवा कवीश्वरांचे सीतास्वयंवर; गंगाधरबुवा काशीकरांचे सुभद्राहरण; नानाबुवा बडोदेकरांचे उषास्वयंवर; कऱ्हाडकरबुवांचे द्रौपदीस्वयंवर नारदीय कीर्तनांमधे सुप्रसिद्ध आहे.

दत्त पठडी.

नारदीय कीर्तनात दत्त पठडी अशी एक स्वतंत्र पठडी आहे. या कीर्तनातील वेगळेपणा काही अंशी आढळतो. या पठडीतील बुवा भगवा फेटा परिधान करतात. बाराबंदी किंवा सदऱ्यावर भगवी कफनी घातली जाते. ही कफनी पायापर्यंत असते. त्यावर चांदी किंवा तांब्यात गाठवलेली रुद्राक्षाची माळ असते. कीर्तनाच्या प्रयोगाच्या वेळी दत्ताच्या पादुका कीर्तनात गादीसमोर ठेवून, पादुकांची कीर्तन प्रयोगाच्या पूर्वी पूजा करतात, खडावांना बेलाचे व तुळशीचे पान वाहून, त्याच्याजवळ नृसिंह सरस्वती स्वामींची प्रतिमा ठेवली जाते. बाकी मंगलाचरण हे नारदीय

कीर्तनाप्रमाणेच असते. त्यातील काही बुवा चिपळ्या घेऊन कीर्तन करतात तर काही टाळ घेऊन कीर्तन करतात. या पठडीत नमन भजनी परंपरेप्रमाणे चालू असते. काही बुवा पादुका जवळ वीणा ठेवतात. त्या वीणेला हार घालतात. नमन सुरू करण्यापूर्वी वीणा गळयात घालतात. नमन पूर्ण झाले की वीणा पादुका जवळ ठेवतात. वीणेला वंदन करून, अभंगावर निरूपण करण्यासाठी टाळ, चिपळया घेऊन कीर्तनाला प्रारंभ करतात. काही बुवा पादुकांजवळ तंबोरा ठेवतात, तंबोऱ्याला हार घालतात. त्यानंतर बुवांच्या पाठीशी असलेला साथीदार तंबोरा घेतो.

दत्त पठडीत कीर्तन निरूपणाला प्रारंभ करताना "ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानपूर्तीम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमहूयादिलक्ष्यम् । एवं नित्यं विमलमचलं सर्वधीः साक्षीभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरू तं नमामि ।।" हा श्लोक म्हटला जातो. हा श्लोक म्हटल्यानंतर नारदाच्या गादीवरून पादुकांपर्यंत बुवा नाचत जातात. त्यानंतर पादुकांना नमस्कार करून, पाठ न दाखवता मागे येतात. त्या वेळेला 'दत्ता दिगंबरा या हो| स्वामी मला भेट द्या हो||' हे भजन म्हटले जाते. बुवा गादीवर स्थिर होताच श्री गुरूंची प्रार्थना करून 'भक्ताला सांभाळून घ्या' असे मोठ्याने सांगून, 'श्री गुरुदेव दत्त'चा जयजयकार करून, मग निरूपणाचा अभंग म्हटला जातो. आख्यानवतार कीर्तनातून सांगितले जातात.

**राष्ट्रीय कीर्तनप्रयोग.**

नारदीय कीर्तन परंपरेतील राष्ट्रीय कीर्तन ही नवी संकल्पना अस्तित्वात आली. कीर्तन देवाण-घेवाणीचे असाधारण माध्यम असल्याचे लोकमान्य टिळकांनी जाणले होते. त्यांनीच डॉ. दत्तात्रयबुवा विनायक पटवर्धन यांना कीर्तनाची दीक्षा दिली होती. पटवर्धन बुवांनी जोगमहाराजांकडे कीर्तनाचे धडे घेतले होते. ज्यावेळी पटवर्धनबुवानी कीर्तन करायला सुरुवात केली त्यावेळी त्या एका कीर्तनात लोकमान्य टिळक आले होते व त्यांनी विचारले की आजच्या कीर्तनात कोणते आख्यान सांगितले, त्यावेळेला पटवर्धन बुवांनी त्यांना असे उत्तर दिले होते की 'रामाख्यान' सांगितले. त्यावर लोकमान्य टिळकांनी असा प्रतिसाद दिला, प्रथम राम हा माणूस होता व स्वतःच्या कर्तृत्वाने तो देव झाला असा इतिहास लोकांना सांगितला तर तो लोकांना पटेल म्हणून तुम्ही ऐतिहासिक चरित्र सांगा. असा उपदेश पटवर्धन बुवांना केला. जनसमुदायांमध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्यासाठी, स्वातंत्र्य प्रीती उद्युक्त करण्यासाठी राष्ट्रीय आख्याने उपयुक्त ठरतील व त्यानंतर राष्ट्रकार्य करण्यासाठी लोक अधिक प्रवृत्त होतील. पटवर्धन बुवांनी हा

उपदेश लक्षात घेऊन कीर्तनातून इतिहासातल्या अलौकिक महापुरुषांची आख्याने लावायला प्रारंभ केला व त्यातून ‘राष्ट्रीय कीर्तन’ ही संज्ञा रूढ झाली. राष्ट्रीय कीर्तनाचे आद्यजनक डॉ. पटवर्धन बुवा होय.

राष्ट्रीय कीर्तने करण्यासाठी इतिहासाचा बारकाईने अभ्यास करावा लागतो. अख्यानांना ऐतिहासिक ग्रंथाचे साधार, प्रमाण दिले जाते. या कीर्तनातील आख्यानात आर्या, साकी, दिंडी, पदे, पोवाडे, वृत्ते स्वरचित असतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याची जाणीव म्हणजेच परमेश्वरी जाणीव असा संदेश या कीर्तनाच्या माध्यमातून बुवा देतात. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपले प्राण वेचले ते सर्व ईश्वरी अंशच आहेत असा विचार श्रोत्यांच्या मनात पेरला जातो. सर्वप्रथम पटवर्धनबुवानी, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, छत्रपती शिवाजीमहाराज, झाशीची राणी लक्ष्मीबाई, नेताजी सुभाषचंद्र बोस, लो. टिळक, नरव्याघ्र तानाजी, आग्र्याहून सुटका, अफजलखान – वध यांसारख्या ऐतिहासिक तेजस्वी पुरुषांची आख्याने तयार करून सांगितली. परिणामी हा कीर्तन प्रयोग रस्त्यावर, चावडीवर होऊ लागला. स्वातंत्र्य चळवळीला मदत ठरणारे असे एक प्रभावी माध्यम व साधन म्हणून राष्ट्रीय कीर्तनाकडे लोक पाहू लागले. तरुण वर्ग हा कीर्तन प्रयोग पाहण्यासाठी आवर्जून येऊ लागला. ऐतिहासिक आख्यानांचा पूर्वरंग हा निवडक असे उदाहरणार्थ, “’एका बीजा केला नाश । मग भोगिले कणीस॥‘ या तुकारामांच्या अभंगाला बुवा ‘नरव्याघ्र तानाजी’ चे आख्यान सांगत असा उल्लेख आढळतो. ‘सतीचे ते घेतां वाण। बहु कठीण परिणामी ॥‘ हा अभंग पूर्वरंगाला लावलेल्या कीर्तनारंभी की असे मानले जायचे बुवा लोकमान्य टिळकांचे आख्यान सांगणार. ‘काय वानूं जाता। न पूरे ही वाणी। मस्तक चरणी। ठेवितसे’ हा तुकारामांचा अभंग घेतला की सुभाषचंद्र बोसांचे आख्यान बुवा सांगणार, इतकी पूर्वरंग व उत्तरंग यांची बेमालून सांगड बुवा घालीत.”[७]. सर्वप्रथम जुन्या पठडीतील कीर्तनकारांनी, राष्ट्रीय कीर्तनाविषयी नाराजी व्यक्त केली. परंतु त्यानंतर त्याचा प्रसार व प्रचार जलद गतीने होऊ लागला. राष्ट्रीय कीर्तनामध्ये पोवाडा, शाहिरी काव्यांचा वापर होऊ लागला. पटवर्धन बुवांनी कीर्तनातून श्रोत्यांना संकल्प सांगितला. तरुणांना स्पदेशी व्रताची दीक्षा देऊन, राष्ट्रभक्ती विषयी जागृती निर्माण केली, त्यांच्या स्वतंत्र संकल्प असा होता की, “अस्मात राष्ट्रबलसंवर्धनार्थ, दीनदुःखहरणार्थ, गोहत्याप्रतिबंधार्थ, शीलसंरक्षणार्थ, लोकसंग्रहकार्यार्थ, श्रीरामनामजपं वयं करिण्याभः”॥[८]. पटवर्धन बुवांच्या कीर्तनातून उत्स्फूर्त आर्येचे उदाहरण असे आहे, “आंग्ला जागृत करण्या; शीघ्र बहिष्कार हो सदा माला । घाला त्यांच्या तेणे; निश्चित चिमटा बसेल दामाला॥“. ज्याप्रमाणे ऐतिहासिक आख्यानातून देशभक्तीचे श्रेष्ठत्व बुवा प्रतिपादित करीत होते त्याचप्रमाणे पौराणिक आख्यानातूनही त्यांनी हेच सूत्र

सांभाळले होते. पौराणिक संदर्भांना ऐतिहासिक संदर्भांशी जोडून राष्ट्रीय कीर्तन विकसित करत होते. बुवांचे राष्ट्रीय कीर्तने ऐकून अनेकांनी सुधारणा केल्या. त्यांची ही राष्ट्रीय कीर्तन परंपरा त्यांचे शिष्य वासुदेव देशपांडे, गौतमबुवा पाठक, बाळशास्त्री म्हैसाळकर, चिंतामणीबुवा वाड यांनी चालवली. त्यांनी १९४ आख्याने रचली. पटवर्धन बुवा आणि राष्ट्रीय कीर्तनाची स्वतंत्र पठडी निर्माण केली व ती पुढील कीर्तनकारांनी स्वीकारली. नारदीय कीर्तनामध्ये ऐतिहासिक आख्यानांचे एक पर्व सुरू झाले.

ही राष्ट्रीय कीर्तन पद्धती लवचिक बनली. वर्तमानाचे संदर्भ वापरून नारदीय ढाचा राखून ही कीर्तन पद्धती विकसनशील होत आहे. बुवांच्या पोषाखाचे, कीर्तन स्वरूप असे होते की खादीचे धोतर नेसत. नंतर वैष्णव साधू जसे गोल नेसतात तसे नेसत. अंगात कोपरी, त्यावर खादीची शाल, केस वाढलेले, दाढी वाढलेली. साथीला पेटी-तबला, हातात चिपळया, नमनापुरती झांज, मग चिपळया, मधोमध नारदाची गादी असे, त्यावर खादीची सतरंजी. ही सतरंजी बुवा स्वतः धुवून त्यावर कीर्तनास उभे राहात. मागे दोनचार शिष्य टाळ वाजवावयास असत. कीर्तन देवळात किंवा रस्त्यावर देखील केले जायचे. राष्ट्रीय कीर्तना विषयीचे त्यांनी काही नियम दैनंदिनित लिहून ठेवले होते.

कीर्तनकार आचारशील, विचारशील, कृतिशील असणे आवश्यक आहे असे प्रतिपादित करणारे नियम बुवांनी घालून दिले. कीर्तनप्रयोगासाठी डॉ. पटवर्धन बुवानी आचारसंहिता तयार केल्या होत्या. त्यानंतर अनेक राष्ट्रीय कीर्तनकार महाराष्ट्रात तसेच गोव्यातही तयार झाले. गौतमबुवा पाठक, शिरवळकर, सदाशिवबुवा शिरवळकर, गंगाधरबुवा कोपरकर, गोविंदस्वामी आफळे, श्रीपादबुवा कर्वे, चिंतामणीबुवा वाड, वासुदेवबुवा देशपांडे, मुकीमबुवा रावरेकर, वासुदेवबुवा कोल्हटकर आदी अनेक कीर्तनकार आहेत.

**रामदासी कीर्तनप्रयोग.**

रामदासी कीर्तन प्रयोग हा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा नारदीय कीर्तन परंपरेतील एक प्रयोग आहे. समर्थ रामदासांनी कीर्तन प्रयोगाचे अगदी सूक्ष्म पद्धतीने वर्णन केलेले आहे. समर्थ रामदास स्वामींच्या मते, सर्व श्रोते हरीकथेत रंगून जावे, त्यांना समाधान प्राप्त व्हावे व त्यासाठी लागणारी विद्या आणि कला यांचा संगम त्याचप्रमाणे नवरस पूर्ण कीर्तनाची अभिव्यक्ती कीर्तनकाराकडून व्हावी असे कीर्तन असणे आवश्यक आहे. या संप्रदायामध्ये रामदास्य स्वीकारून रामकथा निरंतर गायली जाते. रामदासी संप्रदायातील लोक जनसमुदायाला रामकथेची गोडी लागावी

यासाठी कीर्तन केले जाते व म्हणून त्यांना रामदासी कीर्तनकार अशी संज्ञा वापरली जाते. रामदासांच्या सांप्रदायिक कीर्तन परंपरेचा उल्लेख असा केला जातो की, "आदिनारायण सद्गुरू आमुचा । शिष्य जाता त्याचा महाविष्णू ॥ तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तेणें ब्रह जयास उपदेशिले ॥ उपदेश केला त्यावरी वसिष्ठा । तेथे धरा निष्ठा शुद्ध भावो ॥ वसिष्ठे उपदेशिले श्रीरामरायासी । रामे रामदारी उपदेशिले ॥ उपदेश देऊनि दिधला मारुती । स्वये रघुपती निरविला ॥ निरविला तेणे जालो रामदास । संसारी उदास आत्मरूपी ॥आत्मरूपी जाला रामीरामदास । केला उपदेश दिनोद्धारा"॥

रामदासी बुवांच्या पोशाखाचा विचार केला तर असे दिसून येते की ते वैष्णवसाधू सारखे पांढरे स्वच्छ वस्त्रे, मानेवर गाठ मारून नेसले जातात. कपाळावर उभे किंवा आडवे भस्म लावून मधोमध गंधाच्या दोन उभ्या रेघा काढून, पायात खडावा घालून, हातात चिपळ्या घेऊन, समोर समर्थ रामदास व श्री राम यांच्या प्रतिमा ठेवून, सूर्याच्या चक्रात वा यंत्रात श्रीराम व रामदास यांच्या प्रतिमा बसवून, समोर लांब सतरंजी घालून, त्यावर पांढरे जाड वस्त्र अंथरतात. या समर्थांच्या गादीवर कीर्तनकार बुवा कीर्तनाला उभे राहतात. या कीर्तन पद्धतीमध्ये कीर्तनात पेटी, तबला नसतो. बुवांच्या मागे साथीदार उभे नसतात. नारदीय कीर्तन परंपरेतील पहिल्या पठडीतील 'जय जय राम कृष्ण हरी' हे केवळ चिपळयांच्या आधारे नमन गाऊन, गणपती, सरस्वती, श्री गुरु यांचे स्तवन म्हणतात. 'जय जय रघुवीर समर्थ' असा त्यांचा सामूहिक गजर असतो. त्यानंतर पारंपरिक भजनी धुमाळीत म्हणून सांप्रदायिक पद म्हटले जाते. त्यानंतर 'गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरु' हे सामुदायिक भजन होते. भजनानंतर सांप्रदायिक पद म्हटले जाते व त्यानंतर 'रामदास गुरू माझे आई मजला ठाव द्यावा पायी' हे भजन बुवांच्या बरोबरीने श्रोतेही म्हणतात. 'राजाधिराज रामचंद्र महाराज की जय' 'महारुद्र हनुमान की जय', 'श्रेष्ठ समर्थ रामदास स्वामी महाराज की जय' असा नाम घोष होतो. या घोषात बुवा समर्थांच्या प्रतिमेपाशी जाऊन साष्टांग दंडवत घालून, पुन्हा गादीवर येतात. समर्थ रामदासांचा मूळ अभंग निरूपणासाठी घेऊन, पारंपरिक चालीवर तो म्हटला जातो व अभंग संपल्यानंतर मनाचा श्लोक म्हटला जातो, त्यानंतर 'जय जय रघुवीर समर्थ' असा गजर करून बुवा निरूपण सांगण्यास प्रारंभ करतात. रामदासी परंपरेतील रामदासीबुवा या परंपरेत समर्थ रामदासांच्या वाङ्मया शिवाय इतर कुठलेही वाङ्मय घ्यायचे नाही असा प्रघात आहे. पूर्व रंग निरूपणामध्ये दासबोध, मनाचे श्लोक, करूणाष्टके, अध्यात्म पारायण स्फूट रचना यांचा समावेश असतो. 'जय जय रघुवीर समर्थ' असा जयजयकार केला जातो. निरूपण हे रूक्ष असते. संप्रदायाच्या कर्मठपणाचा प्रभाव म्हणून बुवा

श्रोत्यांना सक्तीने काही गोष्टी करायला भाग पाडतात. या कीर्तन परंपरेत वैराग्याची अति स्तुती केली जाते. राम भक्तीत अडथळा येऊ नये यासाठी रामदासी बुवा गाण्याचा कीर्तनात अधिक वापर करत नाही व त्यामुळे निरूपण रूक्ष होते. पूर्वरंग संपताच बुवा 'श्रीराम जय राम जय जय राम' या मंत्राची माळ ओढतात. त्यानंतर सर्व सांप्रदायिक देवतांचा गजर करतात. उत्तररंगांमध्ये श्री राम चरित्र किंवा श्री समर्थ चरित्र सांगितले जाते. याची आख्यान पद्धती पुराण पद्धती सारखीच असते. बुवा आख्यानाचा प्रारंभ करताना "आणि मग जेहत्ते कालाचे ठाई|" श्रोतेहो असे संबोधन करून करतात. आख्यानामध्ये रामदासांच्या ओव्या, पदे, श्लोक, घाटी वृत्ते यांचा समावेश असतो. रामदासी कीर्तनामध्ये पाठांतर महत्त्वाचे असते. रामदासी बुवांना समग्र रामदास पाठ असतात. त्यातील सारे पद्य व रचना त्यांना मुखोद्गत असतात. आख्यानाची निवेदन पद्धती अतिशय सरळ असते. आवाजामध्ये चढ-उतार नसल्याने किंवा काही वेळा संवादही वर्णना सारखे बुवा म्हणत असल्यामुळे आख्यानात रंगत येत नाही. आख्यान सुरू असताना काही बुवा सांप्रदायिक अभिनिवेशा पोटी संबोधन केल्यास रसविघ्न होतो. आख्यान व विषय यात तफावत जाणवते. समर्थ रामदास स्वामींनी श्रोत्यांना बोजड होईल अशा वैराग्याच्या गोष्टी हरिकथेत बोलू नये असा दंडक घालून दिलेला आहे. आख्यान संपल्यानंतर समर्थ रामदासांची निर्वाणीची प्रार्थना बुवा म्हणतात. ही प्रार्थना राष्ट्रीय कीर्तन परंपरेतही म्हटली जाते. नारदीय कीर्तन परंपरेतही जुन्या पठडीतले कीर्तनकार निर्वाणीची प्रार्थना म्हणायचे. या प्रार्थनेनंतर निरूपणाचा अभंग म्हटला जातो व त्यानंतर रामाची, रामदासांची, हनुमंताची, गंगाधरस्वामींची, कल्याणस्वामींची आरती म्हटली जाते. कीर्तनानंतर बुवा रामराया पाशी मागणी मागताना रामदासांनी केलेल्या त्या त्या वारांची सवाई म्हणतात. सवाई संपल्यानंतर साष्टांग दंडवत घालून कीर्तनाला विराम दिला जातो.

रामदासी कीर्तनात नारदीय कीर्तनातील नव्या-जुन्या पठडीचा मिलाफ आहे. नारदीय कीर्तन पद्धतीत रामदासी कीर्तन प्रयोग पद्धती असल्याचे आढळते. काही नारदीय कीर्तनकार ही रामदासी बुवा म्हणून ओळखले जातात. उदाहरणार्थ उद्धवबुवा रामदासी, कल्याणबुवा रामदासी इत्यादी; हे सर्व अगोदरच्या रामदासी कीर्तन प्रयोग पद्धतीतले आहेत परंतु नामानंद रामदासी बुवा, गंगाधर बिडकर, नारायणबुवा, दिनकर गोसावी, गणेशबुवा पाठक इत्यादी कीर्तनकार मंडळी नारदीय कीर्तन पद्धतीप्रमाणे रामदासी कीर्तन करताना दिसतात.

या नारदीय कीर्तन पद्धतीतील पोशाख, पांढरे स्वच्छ धोतर, अंगात लांब बाह्यांचा पांढरा सदरा, डोक्याला पांढरा फेटा, कपाळावर अष्टगंधांची उभी रेख, मधोमध बुक्का, अंगात भगवी कफनी, त्यावर उपरणे, गळयात तुळशीची

माळ किंवा काही बुवा मंडळी भगवा फेटा ही घालतात. उजव्या हातात बारीक झांज असते. डाव्या हातात चिपळया, नारदाची गादी व त्या गादी समोर श्री राम व समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमा असतात. भजनी धुमाळीत म्हणून 'श्रीमन्महागणाधिपतये नमः', 'श्री सरस्वत्यै नमः', वेळेप्रमाणे नमनाचे राग ठरवून रामदास माऊली हे पद गातात व त्यानंतर 'रामदासा माऊली दया करी रामदास माऊली' हे भजन म्हणून नृत्य करतात. वरील नमूद केलेल्या पठडीमध्ये निरूपणाचा अभंग तुकारामांचा किंवा समर्थ रामदासांचा असतो. बहुसंख्य रामदासीबुवा मंडळी 'सद्गुरु वाचोनी सापडेंना सोय धरावे ते पाय आधी आधी' हा तुकारामांचा अभंग घेतात किंवा 'दासाची संपत्ती राम सीतापती' हा अभंग अथवा 'देव जवळ अंतरी भेटी नाही जन्मभरी' किंवा राम गावा राम ध्यावा  रामजीवीचा विसावा' या रामदास स्वामींच्या अभंग पैकी कोणताही अभंग घेऊन, विविध रागदारी पद्धतीतून गायन करतात. अभंग संपल्यानंतर 'राम लक्ष्मण जानकी जय बोला हनुमान की' किंवा 'सद्गुरु नाथ श्री गुरुनाथ मी अपराधी घ्या पदरात' यापैकी कोणतेही एक भजन म्हटले जाते व त्यानंतर 'सीताकांत स्मरण जय जय राम', 'पार्वतीपतये हर हर महादेव', ,पुंडलिक वरदे हरी विठ्ठल', 'जय जय रघुवीर समर्थ' असा जयजयकार केला जातो.

श्रीमद्भागवत, भगवद्गीता, उपनिषदे यातील एक श्लोक बुवा म्हणतात व पुन्हा रामदेवतेचा जयजयकार करतात. निरूपणामध्ये ज्ञान, कर्म, भक्ती, सद्गुरु याविषयीचे विवेचन असते. विवेचनाला अनुरूप असे ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, एकनाथी भागवत या ग्रंथाचा आधार देऊन पुष्ट्यर्थ सांगितले जातात. या कीर्तनामध्ये प्रादेशिक लोककथा, दृष्टांत, पारंपरिक स्त्री गीते, लोकगीते यांचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे चुटके व विनोद पातळी राखून सांगितले जातात. निरूपणातील सूत्र हे नेटका प्रपंच करून परमार्थ विवेक करावा अशा आशयाचे असते. निरूपण जर बोजड होऊ लागले तर दृष्टांताचा वापर केला जातो. निरूपणामध्ये निरूपण व गायन यांची योजना असते. पूर्वरंग झाल्यानंतर बुक्का मागवून, देवाला बुक्का वाहून, जर कोणी ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध असेल त्यांना व स्वतःला बुक्का लावायला सांगून, पुजाऱ्यांना बुक्का लावतात. बुवा पुजाऱ्यांना बुक्का लावतात व त्यानंतर पुजारी बुवांच्या गळयात हार घालतात. त्यावेळी 'जय जय रघुवीर समर्थ' असा सामूहिक गजर केला जातो. त्यानंतर सर्वांना 'श्री राम जय राम जय जय राम' असे म्हणायला सांगतात. पद झाल्यानंतर 'जय जय रघुवीर समर्थ' असा गजर पुन्हा केला जातो  उत्तररंगात आख्यान देव, संत, भक्त, राष्ट्रीय यापैकी असते. आख्यानात नारदीय कीर्तनाचा ढाचा असल्याचे आढळून येते. आख्यान संपल्यानंतर बुवा मूळ अभंगा पर्यंत येतात पण तो अभंग म्हणत नाहीत. उत्तररंगामध्ये समर्थ चरित्रातील

एक प्रसंग सांगितला जातो. आख्यानचा विषय कोणताही असला तरी मूळ अभंगाकडे वळण्यापूर्वी समर्थ रामदासांच्या चरित्रातील एखादी गोष्ट किंवा प्रसंग कीर्तनामध्ये सांगितल्याशिवाय ते कीर्तन संपत नाही. हा प्रसंग ऐकल्याशिवाय श्रोत्यांनी उठायचे नाही असा बुवांचा दंडक असतो. बुवा मंडळी आपापल्या शैलीतून समर्थ चरित्रातील गोष्ट सांगतात.

रामदासी बुवा श्रीराम व समर्थ जन्मोत्सव साजरा करतात. रामदासी परंपरेचा  श्रीराम समर्थ हा बीज मंत्र आहे. या उत्सवाच्या निमित्ताने जांबे, सज्जनगड, चाफळ, टाकळी या चार महत्त्वाच्या तीर्थस्थानांवर कीर्तन सेवा केली जाते. हा जन्मोत्सव प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत असतो. यावेळी जे कीर्तन केले जाते त्यात प्रतिपदेला रामाला सूर्याच्या रथात बसवतात, द्वितीयेला चंद्रकोरीच्या झोक्यावर ठेवतात, तृतीयेला आश्रमात ठेवतात, चतुर्थीला हरणाच्या रथावर बसवतात, पंचमीला पंचवटीतला आश्रम तयार करून, षष्ठीला किष्किंधा नगरीत विहार करायला धा, सप्तमीला हनुमंतासह सेतू उल्लंघन, अष्टमीला रावणाचा मृत्यू व अयोध्येत आनंद उत्सव ही आठ दृश्य बुवा कीर्तनातून वर्णन करतात. आख्यानानंतर समर्थ चरित्रातील रोज एकेक उपाख्यान सांगितात. काही रामदासी बुवा एकाच पदातून वा एकाच आर्येतून, श्लोकातून राम कथा व समर्थ कथा यांचा अन्वय साधतात. बुवांच्या आख्यानात सहजता असते. आख्यान सांगताना बुवा नृत्य करतात. विविध चालीतील पदे म्हणून, लोक परंपरेतील चालींसह पदेही गातात. आख्यानच्या समारोपाच्या वेळी काही बुवा बासरी वाजवतात. पारंपरिक लईवर पदे म्हटली जातात  राम-समर्थांची पदे गायली जातात. श्रीरामांचा नाम गजर केला जातो. नामगजरानंतर बुवा राम किंवा रामदासांचे रूप वर्णन करतात. त्यानंतर राम व रामदासाची आरती म्हटली जाते. पायात चाळ बांधले जातात. जन्म कीर्तन सकाळी दहा वाजता सुरू होते. सुरुवातीला समर्थांचे जन्माख्यान सांगितले जाते व त्यानंतर रामरायाचे जन्माख्यांन सांगितले जाते. अतिशय रसाळ वर्णनातून हे जन्माख्यान रंगविले जाते. जन्माची वेळ येताच ‘राजाधिराज रामचंद्र महाराज की जय’, ‘ जय जय रघुवीर समर्थ’ असा तीनदा नामघोष करून बुवा गाभाऱ्याकडे जातात. गुलाल, फुले गादीवर टाकतात, आच्छादन उघडते, घंटा वाजवून, नगारा वाजून पुजारी पंचारती करतात व त्यानंतर बाळमुर्तीला पाळण्यात ठेवले जाते व बुवा रामाचा पाळणा उघडतात व गातात. रामानंतर समर्थांचा पाळणा हलविला जातो. यात कीर्तन दीक्षा देण्याचाही विधी केला जातो. हा विधी समर्थांच्या टाकळी, सज्जनगड व जांब या ठिकाणी केला जातो.

कीर्तनातील सादरीकरणाचा विचार केला तर नारदीय, राष्ट्रीय, रामदासी कीर्तनकारांच्या सादरीकरणात साम्य स्थळे आढळतात. या तीनही पठड्या मौखिक परंपरेशी निगडित आहेत. निरूपण पद्धती मौखिक परंपरेतून कीर्तनकारांना शिकविली जाते. बुवा ज्या पद्धतीने निरूपण करतात त्याच पद्धतीने शिष्याने केले पाहिजे असा दंडक या परंपरांमध्ये आढळत नाही. मौखिक परंपरा म्हणत असताना केवळ पाठांतर हा एकमेव घटक नसून वाचिक, आंगिक आणि उच्चार, आवाजातील चढ-उतार याचे प्रात्यक्षिक केले जाते ते मौखिक परंपरेत येते. सादरीकरणात जिवंतपणा येण्यासाठी हा मौखिक परंपरेचा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

रामदासी कीर्तन परंपरेत मुख्यतः रामभक्ती व समर्थ विचारांचा समावेश असतो.

**वारकरी कीर्तन प्रयोग.**

महाराष्ट्रातील आजपर्यंत मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली कीर्तन परंपरा म्हणजे वारकरी कीर्तन. संत श्रेष्ठ नामदेव महाराज हे या परंपरेचे आद्य प्रवर्तक होते. कलियुगात आध्यात्मिक फलप्राप्तीसाठी कीर्तन हे एकमेव साधन आहे.

महाराष्ट्रात वारकरी कीर्तनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सर्व समावेशक असणारा असा हा कीर्तन प्रकार आहे. संत ज्ञानेश्वरांनी सांप्रदायिक लोकांना चौकात घालून दिली व उपासनेची बैठक तयार केली. वारकरी कीर्तनाच्या माध्यमातून अनेक कीर्तनकार आजही आपल्या पंथाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्याचप्रमाणे विठ्ठलभक्तीचा मार्ग सर्वांना सांगण्यासाठी कीर्तन प्रकाराविषयी आग्रही आहेत. श्री विठ्ठल या संप्रदायाचे उपास्य दैवत आहे. या संप्रदायात वारकऱ्याची उपासना म्हणजे पंढरीची वारी, संतनिष्ठा, संतग्रंथाचे चिंतन, एकादशी व्रत, हरिपाठ भजन, प्रवचन-कीर्तन श्रवण व निर्व्यसनी सदाचाराचे आचरण अशी आहे. तुळशीची माळ गळयात घालून या संप्रदायाची दीक्षा दिली जाते. या पंथाचे प्रमुख ग्रंथ वेद, उपनिषदे, गीता, भागवत, भारत, रामायण, पुराणे आणि ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथ भागवत, तुकाराम गाथा व संतांचे अभंग आहेत. राम, कृष्ण, शिव, प्रल्हाद, नारद, दत्त, हनुमान आदि देवता व त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम व संत निळोबा ही वारकऱ्यांची श्रद्धास्थाने आहेत. वारकरी संप्रदायात हे वारी, दिंडी, चातुर्मास, नामसप्ताह, पुण्यतिथी, जन्मोत्सव, कीर्तन, भजन, प्रवचन व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या उपक्रमांना वारकरी संप्रदायात अत्यंत महत्त्व आहे.

संत नामदेव महाराजांनी सुरू केलेली ही कीर्तन परंपरा, भानुदास महाराज, संत एकनाथ, संत तुकाराम, निळोबा या संतांनी विकसित केली. अर्वाचीन वारकरी कीर्तनाचा विकास मल्लाप्पा वासकर, भाऊसाहेब काटकर, नाना महाराज साखरे, जोग महाराज, दांडेकर मामा व धुंडा महाराजांनी केला. या कीर्तनाची प्रयोग पद्धतीत, टाळ, वीणा व मृदंगाच्या नादात कीर्तन केले जाते. कीर्तन करतेवेळी, कीर्तनकार मध्यभागी उभे राहतात. टाळ वाजवणारे टाळकरी कीर्तनकाराच्या मागे व दोन्ही बाजूला; अर्ध वर्तुळाकार पध्दतीने किंवा आयताकार उभे राहतात. कीर्तनकाराच्या समोर एका बाजूला अथवा दोन्हीकडे, एक किंवा अधिक मृदुंग वादक असतात, वीणा घेऊन मात्र एकच वीणेकरी उभा असतो. वारकरी कीर्तनकारांचा पोशाख पांढरे शुभ्र धोतर , पांढरा अंगरखा अथवा बाराबंदी, पांढरा फेटा व गळयात अथवा खांद्यावर उपरणे किंवा काही कीर्तनकार रंगीत फेटा वापरतात. कीर्तनकार येण्यापूर्वी वीणेकरी वीणा घेवून कीर्तनकाराच्या जागी उभे राहून भजनाला प्रारंभ करतो. ‘जय जय राम कृष्ण हरी’ या भजनाने कीर्तनाची सुरवात होते. त्यानंतर वीणेकरी संत तुकाराम महाराजांनी लिहिलेल्या ‘सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ‘ या अभंगाचे गायन करतो व यानंतर ‘जय जय विठोबा रखुमाई’ हे भजन व अभंगाचे गायन होते. याच प्रारंभिक भजनाला ते ‘मंगलाचरण’ म्हणतात. कीर्तनकार स्वतः किंवा टाळकऱ्यांपैकी दोघेजण निरुपणाला घेतलेल्या अभंगातील पहिल्या दोन चरणांचे (पहिले कडवे व धृवपद )गायन करतात, त्याला पहिली चाल असे म्हणतात. त्यानंतर वीणेकरी येऊन कीर्तनकाराकडील वीणा घेतात व कीर्तनकाराच्या डाव्या बाजूला टाळक-यांच्या शेवटी जाऊन उभे राहतात. कीर्तनकार उपरणे कंबरेला बांधून निरुपणा करण्यासाठी तयार होतात. यावेळेस ‘विठ्ठल विठ्ठल’ हे भजन केले जाते. निरुपणाच्या सुरवातीस कीर्तनकार हे निरुपणाला घेतलेला अभंग पुन्हा म्हणून त्यांच्या परंपरे प्रमाणे – ‘प्रथम नमन करू पांडुरंगा । दुसरे चरण संतांचिया ।। त्यांच्या कृपादाने कथेचा विस्तारू । बाबाजी सद्गुरु दास तुका ‘ अथवा ‘मस्तक हे पायावरी । या वारकरी संतांच्या ।’ हे नमन गातात . संत ज्ञानेश्वरांनी रचलेले ते संत निळोबांनी रचलेल्या अभंगापर्यंत कुठलाही एक अभंग घेऊन त्याचे व्यवस्थित विवेचन केले जाते. त्यालाच ते निरूपण अथवा भावार्थ किंवा व्याख्यान असे संबोधतात. अभंगाचे विवेचन करताना विविध दृष्टांत, वेद वचने, संत वचनांची प्रमाणे, उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करतात. निरुपण सांगताना अभंगाची पार्श्वभूमी, शब्दशः अर्थ, भावार्थ , गुढार्थ सांगितला जातो. निरुपणासाठी घेतलेला अभंग आणि निरुपण करताना गायली जाणारी ‘प्रमाणे’ फक्त वारकरी संतांचीच असावीत असा वारकरी कीर्तनाचा दंडक आहे. वारकरी सोडून अन्य संप्रदायातील पदे, प्रमाणे म्हटली जात नाहीत. कीर्तनाच्या मध्यावर

विठोबा रखुमाई हे भजन म्हटले जाते. त्यावेळी कीर्तनकाराला बुक्का लावून हार घातला जातो. कीर्तनकार शक्यतो हे हार लगेच काढून देतात. हे काढलेले हार विणेकऱ्याना घालतात. भजना नंतर पुनश्च अभंगातील ध्रुव पदाचे गायन होते. याला दुसरी चाल असे म्हणतात. अभंगाचे शेवटचे चरण चालीवर म्हटले जाते. याला शेवटची चाल झाली असे म्हणतात. कीर्तनाच्या शेवटी – 'जय विठ्ठल जय जय विठ्ठल' हे भजन होते. नंतर कीर्तनकार कंबरेला बांधलेले उपरणे सोडून पुन्हा गळ्यात घालतात व कडेला उभे असलेले वीणेकरी कीर्तनकाराच्या जागी येऊन उभे राहतात अथवा कीर्तनकाराकडे वीणा देतात. कीर्तनाच्या अखेरीस 'बोलिली लेकुरे I वेडी वाकुडी उत्तरे। हा संत तुकोबांनी लिहिलेला किंवा अन्य संतपर अभंग म्हटला जातो. यानंतर पुंडलिक वरदे हरी चा गजर होऊन व 'ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' भजन, 'हेचि दान देगा देवा' या अभंग व आरतीने कीर्तनाची सांगता होते.

या कीर्तनाचा कालावधी दोन ते तीन तासांचा असतो. या कीर्तन प्रकारात जन्मोत्सवाची कीर्तने देवतांच्या जन्म प्रसंगी सांगितली जातात. कीर्तनातील प्रतिपाद्य विषय श्री विठ्ठल, पंढरी क्षेत्र, संत महात्मे, सद्गुरू, भगवंत, संतकार्य, संप्रदाय निष्ठा, वारकऱ्याचा आचारधर्म, भगवन्नाम संकीर्तन आणि नामभक्ती, ज्ञान, कर्म, वैराग्य, जीव, आत्मा, परब्रह्म, माया, मोक्ष, प्रपंच, परमार्थ व मानवी कल्याण असतात. कीर्तनकार अभंगानुरुप निरूपण करतात. कीर्तनकार वेदान्त शास्त्रे, पुराणे, महाकाव्य, संत चरित्र, शास्त्रे, मराठी संतांचा व त्यांच्या साहित्याचा सखोल अभ्यास केलेला असतो. संप्रदाया प्रति निष्ठा व सदाचार पाळले जातात. कीर्तनकार व साथीदार हे वारकरी किंवा माळकरी असणे आवश्यक असते. दिंडी, वारी, यात्रा, काला, चातुर्मास, एकादशी, पर्वकाळ, जन्मोत्सव, पुण्यतिथी, नामसप्ताह व उत्सव महोत्सवप्रसंगी आणि राऊळ, वाळवंट, फड, धर्मशाळा, मंदिर व सार्वजनिक प्रांगणात वारकरी कीर्तने सादर होतात. वारकरी कीर्तनामुळे विठ्ठलभक्तीचा प्रसार व संप्रदायाचा प्रचार सर्वत्र पसरला.

गाडगे महाराजांचा कीर्तन प्रयोग.

गाडगे महाराजांची कीर्तन पद्धती ही वारकरी कीर्तनासारखीच होती परंतु त्यात थोडासा फरक असा, तो म्हणजे महाराजांचे दहा-पंधरा शिष्य उघड्या डोक्याने, टाळ मृदंगाच्या साथीने भजन करायचे. वारकरी कीर्तनामध्ये टाळकऱ्यांनी पांढरी किंवा पुठ्याची टोपी घालावी असा नियम आहे, त्याशिवाय त्यांना साथ करता येत नाही, अशुभ मानले जाते किंवा डोक्याला फेटा घालावा लागतो. पण गाडगेबाबांच्या टाळकऱ्यांमध्ये कुणाच्या अंगात लाल

रंगाच्या शालीचे कुर्ते, डोक्याला काहीही बांधलेले नसायचे. गाडगे महाराजांच्या संप्रदायाची खूण म्हणून गळ्यात तुळशीची माळ व पट्ट्या पट्ट्यांचा घोंगडीचा तिरपा तुकडा किंवा एखादी चिंधी हाताला गुंडाळलेली असते. गाडगे महाराज येण्यापूर्वी भजन चालूच असायचे. ते आल्यानंतर भजन थांबवून, कीर्तनाला गाडगे महाराज उभे राहिल्यानंतर, कानावर हात ठेवून अभंग म्हणण्यास ते प्रारंभ करायचे. त्यांच्या कीर्तनात तुकाराम महाराजांच्या अभंगाचा वापर विपुल प्रमाणात केला जायचा. अभंगाची चाल सोपी असायची. अभंग म्हणून झाल्यानंतर भजनाला सुरुवात व्हायची "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला" किंवा "राम राम राम, सिताराम राम, राम" हे भजन सर्वांसह म्हटले जायचे. भजन संपल्यानंतर "पुंडलिका वरदे हरी विठ्ठल"चा जयघोष व त्यानंतर निरूपणाला प्रारंभ व्हायचा. गाडगे महाराजांच्या कीर्तनामध्ये, लोकांविषयी कारुण्य भाव किंवा गावंढळपणवर टीका करणारे भाष्य असायचे. त्यांच्या विवेचनामध्ये कधी थट्टा तर कधी समाज दोषांवर टीका करणारे कठोर शब्दही असायचे. गाडगे महाराज आपल्या निरूपणातून कोणत्या समाजाला कशा स्वरूपात विषय विवेचन सांगावे यासाठीचे प्रयोग करीत. त्यांच्या निरूपणाचे विषय पशुबळी, शेतकरी कुणब्यांचे दारिद्रय, परोपकार, व्यसनमुक्ती, मित्रनिष्ठा अशा स्वरूपाचे असायचे. ते विषय घेऊन त्यावर महाराज निरूपण करायचे. त्यात श्रीमंत गरिबांचा संघर्ष, संतवाणी योगाने उपदेश अशा पद्धतीचे सरसकट विवेचन करणारे निरूपण असायचे. गाडगे महाराज आपल्या कीर्तन पद्धतीतून वर्तमानातील विषयही कीर्तनात मांडायचे. गाडगेबाबांच्या कीर्तनावर, बोलीभाषेवर, वऱ्हाडी भाषेचे संस्कार असल्याचे नमूद केले जाते.

कैकाडीमहाराजांचा कीर्तन प्रयोग.

कैकाडी महाराजांची कीर्तन पद्धती ही गाडगे महाराजांच्या कीर्तन पद्धती सारखीच स्वतंत्र होती. कैकाडी महाराज मनगटावर चिंधी व डोक्यावरील वाढलेल्या केसांना एक चिंधी बांधलेली असायची, कैकाडी महाराज पांढरी स्वच्छ लुंगी नेसायचे. " कैकाडीबुवांनी साधना काय केली माहीत नाही. अभ्यास किती केला तेही ठाऊक नाही. बहुधा फारसा केला नसावा. मात्र अभ्यास म्हणजे अध्ययन. विरक्तीपायी जे शारीरिक कष्ट करावे लागतात ते त्यांनी अपरंपार केले असले पाहिजेत. ते जी व्रतं पाळीत, त्यावरून हे स्पष्ट होई.. दोन नियम त्यांनी मोठ्या निष्ठेने कित्येक वर्षे पाळले आहेत. ते आडवे होऊन कधी झोपले नाहीत. रात्री तीन तीन वाजेपर्यंत कीर्तन करणे. होता होईतो विनाश्रमाचे कुणाकडे न खाणे. इ. इ. कीर्तन संपल्यावर कुठे तरी मळयात, खळयावर, झाडाखाली जी उरली ती रात्र काढायची, ती एका कुबडीवर टेकून, बसल्याबसल्या. तसंच बसल्या बसल्या झोपी जायचं. आणि दुसरा नियम केवळ कीर्तनातच

बोलायचं. कीर्तन संपलं की मौन.". ज्याप्रमाणे गाडगे महाराज आपल्या पायावर कुणालाही डोके टेकवायला देत नसत, त्याचप्रमाणे कैकाडी महाराजांचेही होते, त्यासाठी ते पायाला पक्के फडके बांधून ठेवायचे. स्त्री वर्गांच्या भावनांना स्पर्शून जाणारी त्यांची कीर्तन शैली असल्यामुळे त्यात संत जनाबाई आदी स्त्री संतांचे अभंग ते कीर्तनात म्हणत व त्यात इतर स्त्रियांना सहभागी करवून घेत. त्यांच्या कीर्तनात ते कोट्यांचा वापर अधिक प्रमाणात करायचे. "राधा ऽऽ राधाकृष्ण राऽधा" हे भजन म्हणायचे. गायीवरील कवने ते तयार करून गात असत. संतवाणीचा, त्यांच्या विचारांचा, आधार घेऊन, कीर्तनातून ते आपले विषय मांडायचे व उपहासात्मक, उपरोधात्मक अशा पद्धतीने निरूपणात विषयांचा परामर्श घ्यायचे. त्यांच्या कीर्तनातून समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य ते करायचे.

तनपुरेमहाराजांची कीर्तन पद्धती तशाच स्वरूपाची होती. त्यांच्या कीर्तनातून केवळ नामभक्ती, ईश्वरभक्ती असेच विषय नव्हते तर त्याशिवाय धर्मशाळा बांधणे, चारीधाम तीर्थयात्रा करणे, शिधावाटप, अशा विविध कार्याची दखल गाडगेबाबा प्रमाणे त्यांच्याही कीर्तनात घेतली जायची. त्यांनी इतर कीर्तनकारांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करून, संप्रदायाचा व तत्त्वज्ञानाचा प्रचार कसा करायचा याविषयी देखील शिक्षण दिले. आधुनिक विषयांना कीर्तनात स्थान देऊन, सुधारणावादी दृष्टिकोन ठेवून कीर्तन केले. त्यांच्या संप्रदायातील कीर्तनकार आजही कीर्तने करीत असल्याचे आढळते. त्यांनी समाजाला आध्यात्मिक आधार देण्याचे कार्य केले. गाडगे महाराजांच्या प्रभावाखाली अनेक कीर्तनकार तयार झाले. वैचित्र्य भिन्नतेनुसार कीर्तनकार वेगळे विषय घेत परंतु आशय सूत्र, भक्ती विचार एकसारखेच असल्यामुळे व गाडगे महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर असल्यामुळे काही कीर्तनकार स्वतःला गाडगे महाराजांच्या संप्रदायातील मानीत. उदा. उदा. पाटीलबुवा, भिकाबुवा, गणपतीबुवा इत्यादी. परंतु यातील सर्व महाराजांनी वारकरी कीर्तन परंपरेत असणारी संत ज्ञानेश्वर ते निळोबा पर्यंतची परंपरा स्वीकारली नाही. या महाराजांच्या कीर्तन पद्धती वारकरी कीर्तनाशी साधर्म्य असणाऱ्या असल्या तरी वर्तमानाशी संलग्न होत्या. त्यांनी विवेचनासाठी लोकभाषेला, वाक्प्रचारांना कीर्तनात स्थान दिले व उपदेश जनमानसांत पोहोचवला.

यात एकनाथ महाराज, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, कैकाडी महाराज, इत्यादींनी वारकरी कीर्तनाच्या पद्धतीला धरून परंतु विषय व उद्देश तोच ठेवून आशयानुरुप काही बदल केले. आजही वारकरी कीर्तन परंपरा महाराष्ट्रात तसेच इतरत्र ठिकाणीही आपले स्थान टिकवून आहे.

**गाणपत्य कीर्तनप्रयोग.**

गणपती कीर्तन प्रयोगाचा ढाचा नारदीय कीर्तनपरंपरेसारखाच आहे. वारकरी व नारदीय कीर्तन पद्धतीच्या संगमातून गाणपत्य कीर्तन पद्धती निर्माण झाली. गाणपत्य कीर्तन परंपरा ही वंशपरंपरेनुसार चालत येणाऱ्या व्रता सारखी आहे. गणपती ही या कीर्तनपरंपरेची अधिष्ठित देवता आहे. या परंपरेचा बीजमंत्र 'ॐ गणानां त्वा गणपतीं हवामहे' आहे. या परंपरेत गणपती उपास्य देवता आहे. गाणपत्य कीर्तन प्रयोगातील नमनाची सुरुवात, 'वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव, सर्वकार्येषु सर्वदा ॥ स जयति सिंदुर वदनो, देवो यत्पाद पङ्कज स्मरण वासर मणिदिव तमसां, राशि नाशयति। विघ्नान् ॥ यदा लम्बोदरं हन्ति, सतां प्रत्यूह संभवम्। तदालम्बं दयालम्बे, लंबोदर पदांबुजम् ॥ नमस्ते शारदे देवी, सरस्वती मतिप्रदे। वसत्वं मम जिह्वाग्रे सर्वविद्याप्रदाद्भव ॥' या श्लोकांनी होते. गाणपत्य ही संज्ञा बुवांना वेगळ्या प्रकारे घ्यावी लागते. गणपतीच्या अखंडित साधनेचे ते आचरण असते. हे आचरण उपनयन संस्कार वा कीर्तनकार झाल्यानंतर देतात. गणपतीच्या भक्तीला या परंपरेत विशेष महत्त्व व प्राधान्य आहे. उजव्या सोंडेच्या गणपतीचे कडक व्रत केले जाते.

या संप्रदायातील कीर्तन प्रयोगामध्ये पूर्वरंग, उत्तररंग भाग असतात. कीर्तनाच्या प्रयोगापूर्वी कीर्तनकार दिवसभर उपवास करतात, सकाळी गणपती अथर्वशीर्षाची एकशे आठ आवर्तने करतात. कीर्तनातील त्यांचा पोशाख, स्वच्छ पांढरे धोतर नेसून, उजव्या कनवटीला गणपती खोचतात. अंगावर उपरणे घालतात. पायात चाळ बांधतात. डोक्यावर घेरा असतो. कपाळी चंद्रकोरीसारखे अष्टगंध लावलेले असते. डाव्या मनगटावर काळा करदोटा असतो व त्यात छोटासा गणपती बांधलेला असतो, अशा पद्धतीचा असतो. बुवा डाव्या हातात चिपळ्या व उजव्या हातात झांज घेऊन, वाजवत, नाचत संपूर्ण देवळाला अकरा प्रदक्षिणा घालतात.

गाणपत्य कीर्तनकार शुक्ल पक्षातली विनायकी चतुर्थी व वद्य पक्षातली संकष्टी चतुर्थी या दोन्ही तिथींना अत्यंत महत्त्वाचे मानतात. त्याचप्रमाणे भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गाणपत्य संप्रदाय 'आद्यतिथी' म्हणतात. त्यांच्या गणपतीवर्षाचा प्रारंभ या तिथीने होतो. पार्वतीपुत्र गणपती व पार्वती ही धरणी माता म्हणून मातीची नित्य पूजाही संप्रदायात केली जाते. भाद्रपदातील गणेश चतुर्थीला चंद्र दर्शन वर्ज्य असल्याने तो नियम बुवांना लागू होतो. त्याचप्रमाणे गणपतीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर, मूर्तीदर्शनावरून मूळ चंद्ररुपी गणेशाला पाहायचे नसते अशा

प्रकारच्या नियमांचे पालन बुवा करतात व त्यातून घडतात. गाणपत्याची खूण म्हणून गळयात किंवा जानव्यात गणपती असतो. गाणपत्य संप्रदायात व्रतवैकल्पाला फार मोठे स्थान आहे. दीक्षाविधी प्रसंगी बुवा ऋग्वेदातील ब्रम्हणस्पतीसुक्त मौखिक परंपरेतून म्हणायला लावतात व त्यानंतर परंपरेने चालत आलेल्या गणपतीचा मंत्र म्हणून आचार्य बुवांच्या कपाळी चंद्रकोरी सारखे दुरेघी आडवे गंध लावतात. हे गंध कीर्तनाच्या सादरीकरतात बुवांनी लावायचे असा सक्तीचा नियम आहे. गणपती ही कृषी देवता असल्याने शेतीच्या अवजारातील नांगराचे चित्र कीर्तनाच्या गादीवर बुवा काढतात. त्या भोवती सहा विनायक गणाची छोटी प्रतिमा काढतात, शांतीविधी करतात व गादीचे पारंपरिक पूजन करून त्या प्रतिमा गादीवर लावल्या जातात. 'ॐ हीं ग्रीं ही' हा चार अक्षरी शक्तिविनायक मंत्र गाणपत्य कीर्तनकार आपल्या उपरण्यावर कोरतात. गणपती कीर्तनकार गणेश पुराणे, गणेश गीता, गणेश सहस्रनाम, या वाङ्मयाचा अभ्यास करून अद्भुत कथांचा कीर्तनात वापर करतात. ब्रह्मवैरीतर्त पुराणातील गणेश खंड, भविष्यपुराणातील ब्राह्मखंड, गणेशोपनिषद, स्कंद पुरणातील काशी खंडार्गत विनायक महात्म्य, गणेश भागवत, या वाङ्मयाचा उपयोगही कीर्तनात केला जातो. त्याचप्रमाणे गणेश कथांवर स्वतंत्र आख्याने तयार केली जातात. ही आख्याने आचार्य मौखिक परंपरेतून बुवांकडून म्हणून घेतात. दीक्षाविधीचा भाग म्हणून कथा विशिष्ट स्वरातून व त्याच्या चढ-उतारातून म्हणून घेतात.

गणपतीच्या प्रतिमे शेजारी ओंकाराची यंत्र प्रतिमा लावून, त्यांच्या शेजारी ज्यांनी दीक्षा दिली त्या आचार्यांची प्रतिमा लावली जाते व तिचे पूजन केल्यानंतर बुवा कीर्तन प्रयोगाला प्रारंभ करतात. या कीर्तन प्रयोगात उत्तररंगांमध्ये गाणपत्य परंपरेत चिंचवडचे मोरया गोसावी, त्र्यंबकेश्वरचे गणेश भट्ट पुराणिक, सिद्धटेकचे हेरंबबुवा वैद्य, नाशिकचे विनायक बुवा नाशिककर, अशा संत विभूतींची आख्याने सांगितली जातात. गाणपत्य कीर्तन परंपरेत काही बुवा गणेश आख्याना समवेत रामायण, महाभारत, भागवतावर आधारलेली आख्यानेही सांगतात. तर काही बुवा गणेश आख्याना व्यतिरिक्त अन्य गोष्टींचे निरूपण करत नाही. या संप्रदायात भक्त चरित्र किंवा संताख्यान जास्ती प्रमाणात सांगितली जातात. जुन्या पठडीतले बुवा चमत्कारांवर भर देत असे व नव्या पठडीतले बुवा कष्ट, अभ्यास, कर्तव्य, कठोरता यावर भर देतात व त्यामुळे आख्यानांची लोकप्रियता अधिकाधिक वाढते.

कीर्तनाला सुरुवात करण्यापूर्वी, ज्यावेळी बुवा मंदिरात प्रवेश करतात, त्यावेळी मंदिराला तीन प्रदक्षिणा घालतात. त्यांच्या मागोमाग श्रोतेही प्रदक्षिणा घालतात. 'पार्वतीश नंदना । मोरया गजानना । सकळ दुरितनाशना । मोरया

गजानना' हे भजन बुवा गातात. त्यांना पेटी किंवा तबल्याची साथ नसते. साथीदारही बुवांच्या पाठोपाठ जातात. हे भजन बुवा झांज किंवा चिपळयांचा वापर करून म्हणतात. यात वेगळया चालीही नसतात व रागदारी संगीताचाही समावेश नसतो. लोकपरंपरेतून आलेली चाल या ठिकाणी वापरली जाते. ही चाल पहिल्या प्रदक्षिणेला विलंबित लयीत म्हणून, दुसऱ्या प्रदक्षिणेला मध्य लयीतच म्हणतात व दृत लयीत शेवटची प्रदक्षिणा घालताना म्हटली जाते. तिसऱ्या प्रदक्षिणेनंतर बुवा नाचत, नाचत कीर्तनाच्या गादीपर्यंत येतात. गादीला प्रदक्षिणा घालून, चौथी प्रदक्षिणा वाद्यांना घालून, गादीला वंदन करून व श्रोत्यांना साष्टांग नमस्कार घालून गणपतीची प्रतिमा कपाळाला लावून नमनाला प्रारंभ करतात. नमनाची सुरुवात ही पारंपरिक भजनी धुमाळीत अभंग म्हणून केली जाते. 'गणेश नमूं तरी तुमचा नाचणा । म्हणोनी नारायणा नमन माझे ॥ सारजा नमूं तरी तुमची गायणी । म्हणोनि चक्रपाणी नमन माझे॥.' वारकरी कीर्तनाच्या पारंपरिक चालीवर 'इंद्र नमूं तरी तुमचिया भुजा । म्हणोनि गरुडध्वजा नमन माझे ॥ ब्रह्मा नमूं तरी तुमची विभूति । म्हणोनि हृषिकेशी नमन माझे॥' या ओळी म्हटल्या जातात. संत नामदेवांचा नऊ कडव्यांचा अभंग बुवा संपूर्ण घेत नाहीत व गुरुपरंपरा हे कारण सांगितले जाते. नमन झाल्यानंतर कमरेला बांधलेल्या भगव्या पिशवीत ठेवलेला गणपती काढून, त्याला गादीवर मधोमध ठेवले जाते. त्या भोवती बुवा तीन प्रदक्षिणा घालतात. उजव्या तळहातावर गणपती ठेवून 'जय गजानन। श्री गजानन। जय गजानन। मोरया' हे भजन गात, नाचत गादीपासून पंधरा-वीस पावले चालत जातात. त्या ठिकाणी चौरंगावर गणपती ठेवलेला असतो, कुंकवाचे स्वस्तिक काढले जाते, पाच मुठी तांदूळ ठेवणाऱ्या स्त्रीला उभे राहायला सांगतात, त्यानंतर ती पाच मुठी तांदूळ ठेवते. त्यावर सुपारी ठेवली जाते. बुवा त्यावर हळद-कुंकू वाहतात व पंचमहाभूते कीर्तनात प्रसन्नपणे वावरत आहेत असे मानून, चौरंगाभोवती चार प्रदक्षिणा घालून नाचत नाचत बुवा मुख्य देवालयाच्या गाभाऱ्याला एक प्रदक्षिणा घालतात व त्यानंतर चौरंगासमोर येऊन उभे राहतात. उजवा पाय डाव्या गुडग्यावर ठेवतात व हाताची घडी घालून, ॐ मुद्रा करीत, बुवा पाठ न दाखवता गणपती मुद्रा नाचत नाचत गादीवर ठेवतात. 'मंगलमूर्ती मोरया', 'पार्वतीपतये हरहर महादेव', 'गोपालकृष्ण महाराज की जय' असा जयजयकार केला जातो. तीनही साथीदार झांजांचा जोरजोरात आवाज करत बुवांच्या पाठीमागे असतात. काही वेळ झांजेचा नाद मंदिरात घुमत असतो व बुवा भक्ती नृत्य करतात. बाकीचे श्रोते 'जय गजानन, श्री गजानन, जय गजानन मोरया' हे भजन गातात. बुवांच्या कमरेचा भगवा ध्वज एका विशिष्ट टोकाला आल्यानंतर, त्यांच्या दृष्टीस पडला की 'मंगलमूर्ती मोरया'चा तीनदा उद्घोष करतात. त्यानंतर अचानक बुवा छोटीशी जागच्याजागी

हनुमानउडी(हा बुवांचा शब्द आहे. करण्यासाठी अशी उडी मारली की हनुमान येतो अशी या संप्रदायात समजूत आहे.)[९] घेतात व काळी चार मध्ये अभंग गाऊ लागतात. 'गणेश सारजा करित्ती गायना। आणि देवांगना रंभे ऐशा ।। तेथे आम्ही मानवांही विनवावे ते काय । सुखर पाय वंदिती जेथे ।। ज्याच्या गायनासी तटस्थ शंकर । त्याहिपरि पार न कळे तुझा ।। तुका म्हणे आम्ही किंकर ते किती । इंद्राची ही मति नागविशी।।' हाच अभंग निरुपणासाठीही घेतात. या संप्रदायात नमनासाठी भूप राग वापरला जातो निरूपणाचे अभंगासाठी बिहार, काफी, खमाज, पिलुराग अशा प्रकारचे राग विशेषत्वाने म्हटले जातात. गायनाची विशिष्ट अशी परंपरा लाभलेला हा गाणपत्य संप्रदाय आहे. "ज्या बुवांचे गाणे उत्तम त्या बुवांचे निरूपण उत्तम अशी संप्रदायातील बुवांची समजूत आहे."[१०]. भक्ती नृत्यालाही या कीर्तनात महत्त्वाचे स्थान असल्यामुळे कथकली नर्तकाचा पोशाख काही कीर्तनकार घालतात.

अभंग गाऊन झाल्यानंतर, गणेश स्तुतीचा पारंपरिक चालतील अभंग म्हटला जातो व त्यानंतर गणपतीला कीर्तनात बोलावण्यासाठी आवाहन केले जाते; तेही प्रेक्षणीय असते. शेवटी गादीभोवती गोल गोल नाचत बुवा अभंग पूर्ण करतात. गादीच्या मधोमध उभे राहून, गुरुपरंपरेचे स्मरण करून, हात जोडून 'प्रारंभी विनंती करू| गणपती विद्या दयासागरा||' हा श्लोक म्हणुन, प्रदीर्घ जयजयकार करून, निरुपणाला प्रारंभ करतात. निरुपणामध्ये वेद, पुराणे, उपनिषदे, आचार्य भाष्ये व संतवाणीचाही अंतर्भाव असतो. कीर्तन निरूपणात पहिल्या कीर्तनात मंगलमूर्तीचा महिमा सांगितला जातो. त्यानंतर निरूपणात विविध मुद्द्यांचे विवेचन करतात. काही गणपती बुवा मंगलमूर्तीच्या महात्म्याशिवाय अन्य काही कथन करीत नाहीत. त्यामुळे त्या कीर्तनाला शुष्कपणा येतो. या परंपरेत दृष्टांत कमी सांगितले जातात. त्यांच्या विवेचनात पूर्वपक्ष व उत्तरपक्ष सांगितला जातो. त्यामुळे निरूपणाची पातळी संस्कृतिनिष्ठ असते. तंत्रशास्त्राचाही उल्लेख कीर्तनात केला जातो पण तंत्राचार दुर्बोध होतो. काही बुवा तंत्राची प्रात्यक्षिके कीर्तनात दाखवितात. काही बुवा गणेश भक्तीचे निरूपण करतात व नाममहिमा वर्णन करताना, गणेश जन्माच्या कथा सांगतात. काहीजण गणेश भक्तांच्या आख्यायिका किंवा कथा सांगतात. काही दृष्टांत निरुपणात सांगतात. निरूपण संपल्यानंतर 'मंगलमूर्ती मोरया' असा गजर केला जातो व मूळ अभंग म्हटला जातो. त्यानंतर संवादिनी वादक पद म्हणतात. त्या वेळेला बुवा पायातील चाळ काढून, गणेशाच्या मूर्ती जवळ ठेवतात. काहीजण निरूपणा पुरतीच चाळ बांधतात व उत्तररंगात चाळ काढून ठेवतात. पेटीवाल्या बुवांचे पद सुरू असतानाच पुजारी बुवाना बुक्का लावतात, माळ घालतात, बुवांच्या पायावर फुले घालतात, भजन संपल्यानंतर मंगलमूर्तीचा जयजयकार होतो व बुवा उत्तररंगाला

प्रारंभ करतात. उत्तररंगामध्ये केवळ गणेशभक्तांची चरित्रे सांगितली जातात. काही बुवा गणेश आख्यानही सांगतात. आख्यानात आर्या, साकी, दिंडी, ओवी यांचाही वापर केला जातो. काही बुवा इतर संताख्याने देखील सांगतात.

या परंपरेत दासगणू महाराजांच्या कविता व विठोबाअण्णा दप्तरदार, अमृतराय, मध्वमुनेश्वर यांच्या पदांचाही उपयोग केला जातो. आख्यान विशिष्ट टप्प्यावर आल्यानंतर बुवा संपवितात. मूळ अभंग भैरवीत गाऊन, गणेशाची प्रार्थना करतात व बुवा चौरंगापाशी जाऊन, भगव्या पिशवीत गणपती ठेवून देतात. त्यावर सुपारी ठेवली जाते व गादीला नमस्कार केला जातो. मंगलमूर्तीची आरती करून, आरती नंतर गणपती अथर्वशीर्ष म्हणुन हा गाणपत्य कीर्तन प्रयोग संपतो.

**शाक्त कीर्तन प्रयोग**.

महाराष्ट्रातल्या कीर्तनपरंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण किर्तन पद्धती म्हणून शाप्त कीर्तन पद्धती परिचित आहे. माहूर, तुळजापूर, कोल्हापूर, वणी, सप्तश्रृंगी अशा मर्यादित परिसरात शाक्त कीर्तन परंपरा प्रचलित आहे. या परंपरेतील बुवा देवीची साडेतीन शक्तीपीठ सोडून, अन्य ठिकाणी कीर्तन करण्यास जात नाही. देवीचे ठाणे सोडून जायचे नाही, असा या परंपरेचा दंडक आहे. अन्य ठिकाणाहून आमंत्रणे आली तरी ते स्वीकारत नाही. या संप्रदायातील हरिदास स्वतःला 'भगवतबुवा' म्हणवून घेतात. या संप्रदायातील कीर्तनकार कधीही तीर्थस्थानी व इतर देवतांच्या उत्सवाला किंवा यात्रेला जात नाही या संप्रदायात परंतु तत्वाची कल्पना असते रूपात केलेली आहे व त्यालाच ते शक्ती म्हणतात. शक्तीला दुर्गा, त्रिपुरासुंदरी, ललिता, महाभैरवी, आनंदभैरवी या नावाने संबोधले जाते. षोडशोपचारे शक्तीची पूजा केली जाते. पूजेतील उपासक हा हरिदास असतो. तो नेहमी संचारी भावाने शक्तीची पूजा करतो, म्हणून यास 'शाक्त' असे म्हणतात. या संप्रदायात मंहत्त्वाचे चार वेद, ब्राह्मणे, आरण्यके, सूत्रे व उपनिषद हे मुख्य ग्रंथ आहे. वेदांतील अदिती व आद्या ही शक्ती आहे. यात शक्तीचा मातृभाव प्रामुख्याने वर्णन केलेला आहे. शाक्त उपासकांत परशुरामांची कल्पसूत्रे, अगस्ती, भारद्वाज, नागानंद यांची शक्तीसूत्रे, अंग्रिसाची दैवी मीमांसासूत्रे, गौडपादांची श्रीविद्यारत्नसूत्रे ही देवीसूत्रे प्रचलित आहेत व या सूत्रांची पठण पद्धती भिन्न स्वरूपाची आहे. या संप्रदायातील आचार्य म्हणून विद्यारण्यस्वामींना मानले जाते. शाक्त परंपरेत शिवपासना व योगमार्ग यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे त्यांच्या सहकार्यातूनही परंपरा पुढे पर्यंत चालू आहे. या परंपरेत मत्स्येंद्रनाथांच्या 'कौलज्ञाननिर्णय' या संहितेचे पठण महत्त्वाचे

मानले जाते. 'न शिवेन विना शक्तीर्न शक्तीरहितः शिवः । अन्योन्यंच प्रवर्तते अग्निधूमौ यथा प्रिये।।' हा या परंपरेतील महत्त्वाचा मंत्र आहे, यातूनच देवी स्तोत्रांचा उदय झाला अशी या संप्रदायाचे मान्यता आहे.

कीर्तनाला सुरुवात करण्यापूर्वी नाचत नाचत तीन प्रदक्षिणा घालून, तिसऱ्या प्रदक्षिणेला त्यांच्या अंगात संचार होतो. यावेळी तबलजी डग्गा जोरजोरात घुमवतो. ''आई आली ऽऽ का ऽऽ'' अशी तीनदा बुवा हाळी देतात. त्यानंतर तिसऱ्यांदा तबलजी मोठ्ठ्यांदा म्हणतात; ''आली ऽऽ आली ऽऽ आई आली हो ऽऽऽऽ!'' हे ऐकताच बुवांचे डोळे भरून येतात. पेटीवाले बुवा काळी दोनच्या मध्यमात मंगलचरण गातात.

पुढील प्रमाणे वर्णन केलेले शाक्त तत्त्वज्ञान बुवांच्या कीर्तनातील पूर्वरंग निरूपणात असते. "या परंपरेत आद्या शक्ती हे सृष्टीचे मूलतत्त्व आहे. सृष्टीनिर्मितीक्षणी ब्रह्माने शक्तीची प्रार्थना केली. शक्तीने बिंदूरूप धारण केले. शिवाने आपले तेज या बिंदूत दिले. यातून नादतत्त्व निर्माण झाले. नाद आणि बिंदू एकरूप होऊन ते अर्धनारीनटेश्वर झाले. यात श्वेत बिंदू आणि रक्त बिंदू असे निर्माण झाले. हेच स्त्री- पुरुष होत. हे दोन्ही मिळून कला निर्माण करतात. यातून सृष्टी निर्माण होते. सांख्याप्रमाणे शाक्त छत्तीस तत्त्वे मानतात. याचे तीन भाग करतात. शिव-तत्त्व, आत्मतत्त्व, विद्यातत्त्व. शिवतत्त्व व शक्तीतत्त्व हे दोन भाग. विद्यातत्त्वात सदाशिव, ईश्वर व शुद्ध विद्या ही तीन तत्त्वे येतात. आत्मतत्त्वात आत्मा, माया, कला, विद्या, राग, काल, नियती, पुरुष, प्रकृती, बुद्धी, अहंकार, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच विषय, पंचमहाभूते येतात. यांत शिव प्रकाशरूप आहे. शक्ती विमर्शरूपिणी आहे. अकृत्रिम आहे. या शिवशक्तीच्या चिंतनातून आत्मतत्त्वाचा बोध होतो. शिवाला पुरुषरूपात येण्यासाठी माया, कला, विद्या यांची निर्मिती करते. यातून विकास होतो"[११]. या परंपरेतील कीर्तनाच्या निरूपणात वर्णाश्रमविहित कर्मांवर जुनी पठडी प्रामुख्याने भर देते. शाक्त उपासनेत बुवांचा दीक्षाविधी असतो. या दीक्षाविधीत जप, होम, तर्पण, मार्जन, भोजन या पाच घटकांचा अंतर्भाव असतो. या संप्रदायात देवी कवचाची नित्य पठणाची परंपरा बुवांनी निर्माण केली. शाक्त साधनेतील, शाक्तमतांचे निरूपण बुवा कीर्तनातील पूर्वरंगांमधून करतात. शाक्त परंपरेत तंत्रांची संख्या अधिक असली तरी शाक्त कीर्तनकार आपल्याला पेलवतील व लोकांना समजतील अशा तंत्र मार्गाने पूर्वरंगात देवीतत्त्वाचे विवेचन करतात. काही शाक्त कीर्तनकार श्रीविद्येचे उपासक आहेत "(श्रीविद्या हाही देवी उपासनेचा एक प्रकार आहे. ही विद्या पंचप्रेतासनावर विराजमान आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, ईश्वर, सदाशिव हे पंचप्रेत होत. यातले पहिले चार प्रेतासनांचे पाय व सदाशिव त्यावरची फळी आहे. त्यावर ही श्रीविद्या आरूढ झालेली आहे. हिच्या हातात पाश, अंकुश, इक्षुधनू, पंचबाण आहेत. मनू,

चंद्र, कुबेर, लोपामुद्रा, मदन, अगस्ती, अग्नी, सूर्य, इंद्र, स्कंद, शिव, दुर्वास हे श्रीविद्येचे प्रख्यात बारा उपासक आहेत).[१२]". यासंबंधीच्या काही कथा किंवा आख्याने बुवा उत्तररंगात सांगतात किंवा पूर्वरंगातून दृष्टांतरूपी कथाही सांगतात.

काही कीर्तनकार ब्राह्मचारी असतात. त्यांचे कीर्तन नामसंकीर्तन असते. यात देवीची काही निवडक स्तोत्रे रागदारीतून गातात व नृत्य करतात. या प्रकारच्या आरती नृत्यात मुद्राभिनयाचा भाग असतो. हे आरती नृत्य आश्विन शुद्ध पंचमीला केले जाते. या सांप्रदायातील काही बुवा या तिथीला 'शांतिपंचमी' असेही म्हणतात. काही बुवा शांतिपंचमीला रात्रभर कीर्तन करतात. त्यांच्या कीर्तनामध्ये नामसंकीर्तनाचे प्रमाण अधिक असते. त्याचप्रमाणे शिवभक्तीचे ऐक्य ते निरूपणातून सांगतात. शाक्त कीर्तनाचे उपप्रकार असले तरी हा कीर्तन प्रयोग नारदीय कीर्तनाशी समन्वय साधणारा आहे. या कीर्तन प्रयोगातील बुवांचा पोशाख हा हिरवे पातळ धोतरासारखे दुटांगी नेसलेले असतात, पायात चाळ अशा प्रकारचा असतो. कपाळी मळवट, केस लांब-मोकळे असतात. दंडाला ताईत, अंगावर उपरणे, मुखात तांबूल व दोन्ही हातात मोठ्या आकाराच्या चिपळ्या असतात. देवीचा टाक तांब्यात गुंफून त्यात रुद्राक्ष गाठवतात. त्याशिवाय कवड्याची माळ, तुळशीची माळही घातली जाते. कुणी दाढे घडवतात, कोणी कीर्तन प्रयोगाला दाढी करतात. डोळ्यात काजळ घालतात. कुणी पायात देवीचे पैंजण घालतात.(देवीचे पैंजण हा या संप्रदायात फार मानाचा आहे).काहीजण पितळीचे गोल कडे घालतात, तळाचे कडे मोठे व पसरट असते व त्यावर आणखी एक छोटे कडे ठेवतात. बुवा या कड्यांचा नृत्य म्हणून आख्यानात उपयोग करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या उजव्या हातात 'देवीचा डफ' असतो. हा डफ पदे, अभंग म्हणताना बुवा वापरतात. शाक्त कीर्तनातले काही कीर्तनकार संस्कृत पाठडीतील आहेत. तसेच काहीजण मराठी पठडतील आहे. यातील काही बुवा कीर्तनात मंगलाचरण म्हणताना सप्तशतीतील संस्कृत श्लोक म्हणतात. त्यानंतर काही वेळ भक्तीनृत्य करतात. त्यानंतर 'जगदंब माता की जय' असा जयजयकार करून गुरुपरंपरेचा उद्घोष करतात. काही बुवा लोक परंपरेतील चालींवर पारंपरिक ओव्या म्हणतात व त्यानंतर देवी नृत्य करत, स्वतः देवीचा डफ वाजवून, "आईऽऽ जगदंबेऽऽ ये ग ऽऽ माऽऽय कीर्तनाला. तुझ्या ध्यानाला लागला. जीव तुझ्या पायाला. सांभाळ या सेवकाला. भले भले या जनाला. वाचीव या मोहाला. सोडीव या क्रोधाला. ये वोऽऽ आदिमायेऽऽ जगदंबेऽऽ जगदंबऽऽ" अशा स्वरूपाचे आवाहन करतात. भजनानंतर

कीर्तन परंपरेत निरूपणासाठी संत विष्णुदास नामा यांचे अभंग म्हटले जातात. पद म्हणून झाल्यानंतर आई जगदंबेचा तीनदा जयजयकार करतात.

पूर्वरंग निरूपणात देवी महात्म्य, शाक्त परंपरेचे तत्वज्ञान, शिवशक्तीचे ऐक्य, शाक्त परंपरेच्या कर्मकांडाबद्दल किंवा योगमार्गा विषयी विवेचन केले जाते, आदिशक्तीचे श्रेष्ठत्व प्रतीपदित केले जाते. त्याचप्रमाणे संत काव्यातील देवीवर अभंग, ओव्या, श्लोक यांचा योग्य पद्धतीने वापर केला जातो. सप्तशतीचा उल्लेख व काही ग्रंथातल्या श्लोकांचे मराठी भाषांतर निरूपणात वापरले जाते. पूर्वरंग झाल्यानंतर बुवांच्या कपाळी कुंकू लावले जाते, गळयात माळ घालून नंतर इतरांना कुंकू लावले जाते. विशेषत्वाने या कीर्तनात विधवा स्त्रियांनाही सौभाग्यवती स्त्रिया कुंकू लावतात. कीर्तन ऐकेपर्यंत त्यांचे कुंकू असते. कीर्तन संपले की त्या कुंकू उतरवतात. पेटीवाले बुवा एखादी गवळण, पद किंवा अभंग सादर करतात. त्यानंतर देवीचे भजन करून नृत्य करून, 'जय जगदंबा माता की जय', 'रेणुका माता की जय' असा जयजयकार करून आख्यानाला प्रारंभ केला जातो. काही शाक्त बुवा देवी चरित्र सांगतात किंवा काही देवी भक्तांची आख्याने सांगतात. काही इतर संतांची आख्याने किंवा राम कथा, कृष्ण कथाही सांगतात. काही बुवा कीर्तनात स्वीकृत तर काही इतर कवींकडून किंवा संत, पंडित यांच्या रचनांचा कुशलतेने वापर करतात. काही बुवा अख्यानात डमरू, डफ वाजवतात, नृत्य करतात. काही बुवा देवीचा काकड ओढतात. आख्यान संपल्यावर बुवा गणपतीच्या, देवीच्या, शंकरांच्या आरत्या म्हणतात व त्यानंतर कीर्तन प्रयोग संपन्न होतो.

### १.२.१. <u>**नारदीय कीर्तन परंपरेचा इतिहास.**</u>

कीर्तन असे उद्धृत केल्यानंतर सर्वप्रथम ज्यांचे नाव स्मरते ते म्हणजे देवर्षी नारद. कीर्तनाचे आद्य जनकत्व हे देवर्षी नारदांकडे जाते. युगानुयुगे कीर्तन करण्याचा ज्याने आदर्श घालून दिला त्या नारदिया कीर्तनाची परंपरा ही पुराण काळापासून सुरू झालेली आढळते. प्राचीन काळापासून ज्या कीर्तन पद्धतीचा उगम झाला ते म्हणजे 'नारदीय कीर्तन.' मध्ययुगीन भारतात विविध प्रांतानुरूप भक्ती संप्रदाय निर्माण होऊ लागले व संप्रदायाच्या विस्तारासाठी पंथांच्या प्रणेत्यांनी नवनवीन कीर्तन पद्धती निर्माण केल्या. हे सर्व कीर्तन प्रकार प्राचीन नारदीय कीर्तनाची विकसित रूपे होती. नारद महर्षींच्या कार्याचे स्मरण ठेवण्यासाठी व कीर्तनाचा वारसा जपण्यासाठी या कीर्तनपरंपरेला 'नारदीय कीर्तन' असे नाव देण्यात आले. सतराव्या शतकात विद्यमान नारदीय कीर्तनाचा उदय झाला.

नारदीय कीर्तन परंपरा- पूर्व इतिहास.

नारदीय कीर्तन परंपरा ही अतिशय प्राचीन काळापासून आहे. कीर्तनाच्या स्वरूपात नमूद केल्याप्रमाणे, अग्निपुरणापासून अप्रत्यक्षपणे ‘कीर्तन’ भक्तीचे वर्णन केलेले आहे. कीर्तनाचा प्रारंभ नारदांपासून झाला व कीर्तनाचे महत्त्व श्रीमद् भागवतात पदोपदी वर्णन केलेले आहे. “अहो देवर्षिर्धन्योऽयं यत्कीर्ति शाङ्गधन्वय्। गायन् वाद्यन् इदं तंत्र्या समयत्यातुरं जगत।।“(श्रीमद् भागवत, प्र. स्कं. अ. ६, श्लो.३९.) अर्थात, हातात वीणा घेऊन तिच्या सुस्वर नादाच्या साह्याने, उत्कटभक्तीने श्रीनारायणाचे यश गाणारे नारदमुनी दुःखीत जगाला हरिकथेने (यत्कीर्ती) संतुष्ट करीत होते. प्राचीन काळात पद्मपुराणानुसार सुकाचार्यांनी वाद्य व साथीदारांच्या सहाय्याने कीर्तन केल्याचे वर्णन आढळते. कीर्तनाची प्राचीनता प.पू. धुंडा महाराजांनी स्पष्ट केली आहे, ते म्हणतात, “आज आपण ज्या अर्थाने कीर्तन शब्द वापरतो तशा कीर्तनाची परंपरा ही खूपच प्राचीन आहे. ....ही परंपरा देवर्षी नारद, शुकसनकादिक मुनिश्रेष्ठ, भागवतातील नवयोगेश्वर ऋषभपुत्र यांच्यापासूनची आहे. नारद हे प्रतिभासंपन्न कीर्तनकार होते व जगद्धारासाठी त्यांनी सर्वत्र कीर्तने केली म्हणून नारद हेच भारतीय कीर्तनपरंपरेचे ‘आद्यजनक’ मानले जातात.”

संत एकनाथ महाराज व दासोपंत हे जरी अनुक्रमे वारकरी व दत्त संप्रदायाचे असले तरी देखील त्यांच्या कीर्तनातून नारदीय कीर्तनाशी समन्वय साधणारे असे पोशाख, अभंग, चरित्राख्याने इत्यादींचा वापर दिसतो. मध्ययुगीन कीर्तनात जे प्रयोग झाले त्यानंतर नारदीय कीर्तनाची अनेक वैशिष्ट्ये अभिव्यक्त होताना दिसतात. दासोपंतांनी अभिजात रागदारी संगीत कीर्तनात प्रचलित करून पुराण कीर्तन सुरू केले.

नारदीय कीर्तनाचे अन्य प्रकार आहेत. जसे की रामदासी कीर्तन, राष्ट्रीय कीर्तन, सामाजिक कीर्तन इत्यादी. अर्वाचीन महाराष्ट्रीय नारदीय कीर्तनात रामदासी कीर्तन उदयास आले. मध्ययुगीन कालखंडात संत, पंत व शाहिरांनी कीर्तनात उपयोगी काव्य, आख्यानादी सामग्री तयार केली. त्या काळातील सर्व कवी हे उत्तम प्रकारे कीर्तन करायचे. कवी मुक्तेश्वर १७ व्या शतकातील होते. त्यांनी हजारो ओव्यांचे महाभारत, संक्षेप रामायण, शतमुखरावण, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्र भोजन, हरिश्चंद्र, अर्जुनकामपूर्ती, शुक्रभासंवाद, स्फुटप्रकरण, आरत्या, पदे इत्यादींची रचना केली. महानुभाव, नाथांची आख्यान परंपरा वृद्धिंगत करून कीर्तन उपयोगी आख्याने रचली. सतराव्या शतकातील आणखी एक श्रेष्ठ पंडित कवी वामन पंडित. सुश्लोक वामनाचा, अहिल्योध्दार, बाळक्रीडा, गजेंद्रमोक्ष, आदी पौराणिक

आख्यानांची निर्मिती केली. विठ्ठल बिडकर यांनी चरित्राख्याने लिहिली. पाळणा यांसारखी गेय पदांची रचनाही केली. कृष्णदेवराय यांनी अभंग पदांची रचना केली. शिवराम स्वामींनी ३०० पदांची व व्याख्यानांची निर्मिती केली. अमृतराय हे अभिजात आख्यान कवी, कीर्तनकार होते. त्यांनी कटाव हा काव्यप्रकार कीर्तनाला बहाल केला. उत्तम पदांची रचना केली. कटाव काव्यप्रकारातून त्यांनी शुकरंभासंवाद, चंद्रावली इत्यादी आख्यानांची रचना केली. कटावांची निर्मिती झाल्यानंतर अनेक कीर्तनकार आपल्या कीर्तनातून अमृतरायांचे कटाव वापरू लागले. परांड्याच्या भुजंग नाथांनी चाळीस रागात ६६ पदांची निर्मिती केली. चुडामणी सूत, विठ्ठल विष्णुदास माहूरकर व दासगणू महाराजांनी गेय पदांची रचना केली. अशा प्रकारे नारदीय कीर्तन समृद्ध होण्यासाठी अनेक संत-कवींनी चरित्राख्याने, पदे, अभंग, वृत्ते, कटाव, पदांची रचना केली. या संत-पंत-तंत कवींनी नारदीय कीर्तनाला लोकप्रियता व समृद्धता प्राप्त करून दिली. आनंदतनय, मध्वमुनीश्वर, आनंद फंदी, उद्धव चिद्धान, निरंजन माधव, श्रीधरस्वामी, रघुनाथ पंडित, सामराज, मोरोपंत, तुळशीदास, सगणभाऊ, प्रभाकर, पठ्ठे बापूराव, होनाजी बाळा व राम जोशी यांनीही कीर्तने करून चरित्राख्याने, पदे, फटका, लावणी, पोवाडा, अष्टपदी या काव्य निर्मितीचा वापर नारदीय कीर्तनामध्ये करून नाविन्यता प्राप्त करून दिली.

सर्वांची नारदीय कीर्तनाची वाटचाल लक्षात घेताना संत एकनाथांपासून प्रारंभ झाला. मध्ययुगातील अनेक संत, पंत, शाहीर, कवी, कीर्तनकारांनी नारदीय कीर्तनामध्ये आख्याने, पद्यप्रबंध, काव्य, रागदारी संगीत, वेदान्त विषय असे प्रकार वापरून कीर्तन विकसित केले. एकोणिसाव्या शतकापर्यंत होणाऱ्या या कीर्तनाचे स्वरूप बदलले होते. कीर्तनकार स्वरचित अथवा अन्य कवींच्या अभंग-पदांवर पूर्व रंगाचे निरूपण करू लागले. पूर्व रंगाचे विषय प्रामुख्याने अध्यात्म, वेदान्त व परमार्थ असे असायचे. त्यानंतर उत्तररंगात रामायण, महाभारत, भागवत किंवा पुराणातील कथा निवडून कीर्तनकार त्याचे वर्णन करायचे. विविध कवींची व्याख्याने, पदे, काव्य, प्रसंग वर्णनांचे उतारे वापरून कीर्तनात रंग आणायचे. अर्वाचीन नारदीय कीर्तनाचे प्रणेते गोविंदबुवा होशिंग होते. आजची कीर्तन पद्धती त्यांची आहे. त्यातील नमन, पूर्वरंग, आख्यान इत्यादी स्वरूपाची पद्धत गोविंदतारकाश्रम पठडीतील आहे असे म्हटले जाते. ही पद्धती गोविंदातारकाश्रम परंपरेपासून सुरुवात झाली. या परंपरेचे नमनाचे पद 'जय जय राम कृष्ण हरी' व त्यानंतर 'बाळकृष्ण चरणी लक्ष लागो रे' हे पद म्हटले जाते. चुडामणिसुत विठ्ठल कवी चाकूरकर, साठे, बडोदेकर, केमकर, पटवर्धन, शिरवळकर, कोल्हटकर, कऱ्हाडकर, आफळे, परांजपे, लेले, धेनुदासबुवा, दे. ल. महाजन, दासगणू महाराज

व दासमारुती, या कीर्तनकारांनी आख्यानंची निर्मिती केली. पटवर्धनबुवा, कोल्हटकर व धोंगडेबुवांनी ऐतिहासिक राष्ट्रीय विषयाच्या कीर्तनाला प्राधान्य दिले. नारदीय कीर्तनामध्ये सुसंबंध किर्तन प्रयोगाच्या निर्मितीत कीर्तनध्येय, कीर्तनकार, प्रतिपादित विषय, कीर्तन वाङ्‌मय, संगीत, वक्तृत्व, नमन, पूर्वरंग व उत्तररंग, आशय व अभिव्यक्ती या तंत्रामध्ये परिवर्तन घडवून येताना दिसले व यातूनच अर्वाचीन नारदीय कीर्तन उदयास आले.

मराठी कीर्तनामध्ये सतराव्या शतकात रामदासी कीर्तनाचा उदय झाला. एकनाथ महाराजांचे नारदीय ढंगाचे वारकरी कीर्तन होते असे मानले जायचे. दासगणू महाराज हे कीर्तन परंपरेचे प्रवर्तक होते. दासगणू महाराजांच्या कीर्तन परंपरेचा उदय विसाव्या शतकात झाला. राष्ट्रीय व सामाजिक कीर्तने वा.शि.कोल्हटकर, दत्तोपंत पटवर्धन, गोविंदस्वामी आफळे, कमलाकर बुवा धोंगडे व देव महाजन यांच्यापासून झाली. त्यानंतर मराठवाडी नारदीय कीर्तन प्रकार प्रचलित झाला. या कीर्तन परंपरेवर वारकरी कीर्तनाचा प्रभाव असलेला दिसून येतो. विसाव्या शतकापासून रेडिओद्वारे कीर्तने सुरू झाली. भाऊसाहेब शेवाळकर, लक्ष्मण बुवा करंदीकर, श्रीकृष्ण बुवा सिन्नरकर, अशोक बुवा वडूजकर, नरेंद्रबुवा, मालगुंडकर, उपासनी, आफळे, शिरवळकर, कमलाकरबुवा धोंगडे, गणपतबुवा शेलमोहकर, नानाबुवा पुराणिक, प्रभाकर पारेकर, सौ. प्रज्ञा मांडे, वि. महाजन, प्रकाश मुळे, पांडुरंगबुवा गोसावी, वसंत मंडलिक, गंगाधरशास्त्री बीडकर, रामराजे पारेकर, भरतबुवा रामदासी, मनोहर दीक्षित इ. रेडिओ कीर्तनकार असलेले आढळतात.

बहुतांशी कीर्तने मराठी भाषेत जरी असली तरी जुन्या पिढीतील काही कीर्तनकार संस्कृत व हिंदी भाषेतूनही कीर्तने करीत. आजेगावकर, धारूरकर, जुक्कलकर, अंबुलगेकर इत्यादी कीर्तनकार हिंदी व तेलगू भाषेतून कीर्तने करायचे. ग.ना.कोपरकर बुवा व माधव बुवा आजेगावकर यांनी अमेरिकेमध्ये इंग्रजी मधून कीर्तने केली.

महाराष्ट्रातील काही प्रमुख नारदीय परंपरेतील कीर्तनकार गोविंदबुवा तारकाश्रम गंगाधर बुवा काशीकर, रामकृष्ण बुवा ढोले, विनायक बुवा भागवत, रामचंद्र बुवा मोरगावकर, गणेश शास्त्री मोडक, रामचंद्र बुवा मोरगावकर, गणेश शास्त्री मोडक, राजाराम बुवा मिसळ, नारायण बुवा गोगटे फलटणकर, गोंजीवन श्री बाळकृष्ण चौंडे महाराज, वा.शि.कोल्हटकर, दत्तोपंत पटवर्धन, मुरलीधरबुवा निजामपूरकर, म.म.बाळशास्त्री हरदास, भास्करबुवा देवरस, दादाबुवा देवरस, रामचंद्रबुवा शिरवळ, सदाशिवबुवा शिरवळकर, पांडुरंगबुवा शिरवळकर, शंकर शास्त्री भिलवडीकर, नानाबुवा बडोदेकर, चिंतामणीबुवा व न.चि. अपमार्जने, रामदत्तबुवा देशपांडे, प्रल्हादबुवा आयाचित,

जनार्दनबुवा गोसावी पाटांगणकर, रामचंद्रबुवा रणभरे, शंकरबुवा वडगावकर, वसंतबुवा मणेरीकर, सखाराम तथा धनुदास डोळ, हरिभाऊ कराडकर, रामचंद्रबुवा कऱ्हाडकर, नागनाथ चऱ्होलीकरबुवा, वामनबुवा सिन्नरकर, श्रीकृष्णबुवा सिन्नरकर, रामकृष्णबुवा कानड, पिलुबुवा वडूजकर, अशोक वडूजकर, तात्या महाराज उपाख्य माधवबुवा झांशीकर, लक्ष्मण केशव करंदीकर, गंगाधरबुवा कोपरकर, राष्ट्रीय कीर्तन सम्राट गोविंदस्वामी आफळे इत्यादी कीर्तनकार होते. या सर्व कीर्तनकारांचे किर्तन क्षेत्रात बहुमोल योगदान आहे. यातील प्रत्येक कीर्तनकाराने कीर्तनाच्या संगीत, आख्यान, पूर्वरंग व एकूण पद्धतीत कालानुरूप बदल केला.

मराठवाड्यातही भारतीय कीर्तन परंपरा प्रचलित आहे परंतु गोमंतकातील कीर्तनकारांशी महाराष्ट्रातील कीर्तनकारांचा संबंध, संपर्क आला त्यातील काहींचा व योगदान दिलेल्या महत्त्वाच्या कीर्तनकारांचा उल्लेख केलेला आहे.

१.२.२. **वारकरी कीर्तन परंपरेचा इतिहास.**

वारकरी पंथाचा उदय महाराष्ट्रात १३ व्या शतकापासून झाला असे आढळते. वारकरी संप्रदायाच्या विस्तारासाठी त्या पंथातील अनेक सत्पुरुष, संत मंडळी, साधू यांनी वाङ्‌मय निर्मिती केली. पंढरपूरची यात्रा, दिंडी, फड, भजन, नामसप्ताह, चातुर्मास इत्यादी विविध उपक्रम राबविले व अजूनही ते महाराष्ट्रात सुरूच आहेत. सन १२७०-१९७० या कालखंडात वारकरी कीर्तन परंपरा भरभराटीला आली. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, गुंडा महाराज, मल्लप्पा वासकर, जोग महाराज, बंकटस्वामी, शं. वा. दांडेकर व धुंडा महाराज या प्रसिद्ध कीर्तनकारांनी मिळून, परमार्थ साधना, आत्मोन्नती, समाज प्रबोधन, विठ्ठल भक्ती व वारकरी संप्रदायाचा विस्तार कीर्तन संस्थेचे उद्दिष्ट ठेवून केला. कीर्तनकार, भजन, मंगलाचरण, भावार्थ, निरूपण, प्रतिपाद्य विषय, दृष्टांत, श्रोते व स्थल ही वारकरी कीर्तनाची मूलभूत अंगे आहेत. वारकरी संप्रदायाचे वारी, दिंडी, फड, चातुर्मास, नामसप्ताह असे विविध सांप्रदायिक उपक्रम आहेत.

वारकरी कीर्तन परंपरा- पूर्व इतिहास.

वारकरी संप्रदायातील अनुयायांना ‘वारकरी’ असे म्हणतात. कीर्तनकार, साथीदार व बहुतांशी श्रोते हे वारकरीच असतात. वारकरी कीर्तनात त्यांचा असा दंडक आहे की जो वारकरी नसेल त्यांनी कीर्तन करू नये. वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत विठ्ठल आहे. ‘वारकरी’ हा या संप्रदायाचा केंद्रबिंदू आहे. शं. वा. दांडेकर यांच्या मतानुसार वारकरी

हा "आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळयात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरात जातो तो पंढरपूरचा वारकरी व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी पंथ होय." वारकरी या शब्दाची उत्पत्ती 'वारी' या शब्दापासून झाली. ज्ञानेश्वरीत 'वारी' हा शब्द फेऱ्या मारणे, येरझारा घालणे, खेपा घालणे किंवा एकच गोष्ट पुन्हा पुन्हा नित्य नियमाने करणे या अर्थाने वापरला आहे.

वारकरी हा गळयात तुळशीची माळ धारण करणारा, खांद्यावर पताका घेऊन विठ्ठलाचे नामस्मरण करणार, टाळ, वीणा, मृदंगाच्या निनादात पंढरीची आषाढी कार्तिकी वारी करणारा, चंद्रभागे स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेणारा, कीर्तन भजन श्रवण करणारा, गीता, भागवत, संत वाङ्मयाचे पठण करणारा आणि दया क्षमा, शांती, समाधानी वृत्ती धारण करून संपूर्णतः विठ्ठलाची भक्ती करणारा असा वारकरी संप्रदाय. तुळशीची माळ गळयात घालणारा वारकरी संप्रदाय असल्याने याला माळकरी पंथ असेही संबोधले जाते. वारकरी संप्रदाय हा वैदिक धर्म व वैष्णव भक्ती संप्रदाय यावर आधारलेला आहे. विठ्ठल, पंढरी क्षेत्र, वारी व संतवाङ्मय हे वारकरी पंथाचे मूलभूत घटक आहेत. 'वारकरी कीर्तन' हे वारकरी संप्रदायाचा व नामभक्तीचा प्रसार करणारे प्रभावी माध्यम आहे. संत ज्ञानेश्वर नामदेवाची संतांनी विठ्ठलाच्या उपासनेला महत्व प्राप्त करून दिले. त्यांनी ग्रंथ निर्मिती, अभंग रचना, भजन, वारी, दिंडी, प्रवचन व कीर्तन असे विविध उपक्रम वारकरी संप्रदायाच्या मार्फत सुरू केले.

वारकरी संप्रदाय आणि वारकरी कीर्तनाला ७०० वर्षांचा इतिहास आहे असा उल्लेख आढळतो. संत ज्ञानेश्वरांचा कालखंड १२७१-१२९६ असा आहे. संत ज्ञानेश्वरांच्या पूर्व काळात विठ्ठलाची उपासना, वारी, यात्रा, भजन भक्ती व विठ्ठल पंढरीचे महात्म्यही वाढले होते. संत ज्ञानेश्वर, नामदेवादी संतांनी विठ्ठल भक्तीचा, वारकऱ्यांच्या आचारधर्माचा, पंथाच्या तत्त्वज्ञानाचा, उपासना पद्धतीचा व भक्तिमार्गाचा दंडक घालून दिला. वारकरी संप्रदाय नेमका काय आहे, या संप्रदायाचे उद्दिष्ट काय आहे याचा परिचय ग्रंथ निर्मिती, अभंग, प्रवचन व कीर्तन या मार्गातून संतांनी करून दिला. कीर्तन हे समाज प्रबोधनाचे व पंथ प्रचाराचे अतिशय प्रभावी माध्यम आहे. वारकरी कीर्तन परंपरेचा उदय तेराव्या शतकापासून झालेला आढळतो. प्राचीन काळामध्ये मंदिरात किंवा गर्भगृहासमोर भजन, कीर्तन, गायन, नामस्मरण व उपासना करण्यासाठी रंगशीळा, रंगभोग असे संबोधले जायचे. नामदेव महाराज, गुंडा महाराज तसेच अन्य भक्त, कीर्तनकारांनी पंढरपूर रंगशीळेवर कीर्तन केल्याचे उल्लेख सापडतात. आपेगावच्या संत ज्ञानेश्वरांनी कीर्तन केल्याचा उल्लेख किंबहुना तुमचे केले| धर्मकीर्तन हे सिद्ध गेले| येथे माझे जी उरले| पाईकपण (ज्ञानेश्वरी) या संदर्भात आढळतो.

संत ज्ञानेश्वरांनी टाळ, मृदंगाच्या नादात, टाळकऱ्यांच्या समूहात कीर्तन केले असा उल्लेख आढळत नाही. कदाचित ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, या स्वरचित ग्रंथांवर त्यांनी प्रवचने केली असण्याची शक्यता आहे. संत ज्ञानेश्वरांचा व्यासिक कीर्तन४ प्रकार असण्याची संभावना आहे. संत ज्ञानेश्वर आपल्या निरूपणाद्वारे वारकरी संप्रदायाची भूमिका, स्वरूप, तत्त्वज्ञान, उपासना, ज्ञान, भक्ती, योग, वैराग्य, अद्वैत, भगवंत, सगुण, निर्गुण, विठ्ठल व सोपे नामभक्तीचे स्वरूप स्पष्ट करायचे. संत ज्ञानेश्वरांनी, ज्ञानेश्वरीमध्ये कीर्तनाचे स्वरूप, विषय, मर्यादा, कीर्तनाचा महिमा, याचे विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते कीर्तन म्हणजे नामघोष, नामस्मरण, नृत्य, गायन, कथा, कीर्तन, भजनभक्ती, भगवत स्वरूपाची चर्चा, भगवतगुणानुवाद आणि धर्म तत्त्वज्ञानाचा प्रसार अशी संकल्पना होती. संत ज्ञानेश्वरांनी धर्म कीर्तन केले.

वारकरी कीर्तनाचे जनकत्व संत नामदेव महाराजांना दिलेले आहे. त्यांचा कालखंड १२७०-१३५० असा आहे. संत नामदेव महाराजांनी वैशिष्ट्यपूर्ण वारकरी कीर्तन पद्धती आचरणात आणली. संत ज्ञानेश्वरांनी कीर्तनाचे स्वरूप स्पष्ट केले तर संत नामदेवांनी प्रत्यक्ष कीर्तनाचे सादरीकरण केले. नामदेव महाराजांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते टाळ, वीणा, मृदंगाच्या निनादात व टाळकऱ्यांच्या साथीने कीर्तन करायचे. संत नामदेव महाराजांनी केलेल्या कीर्तनाचे दाखले विविध संतांच्या अभंगातून दिसून येतात. त्यांच्याविषयी संत जनाबाई लिहितात, “सुंबाचा करदोटा रकट्याची दोरी| नामा वाळवंटी कीर्तन करी||”. संत नामदेव महाराजांनी विठ्ठलाच्या महाद्वारात, वाळवंटात व ज्ञानदेवांच्या समाधी प्रसंगी कीर्तने केली. संत नामदेव महाराजांनी १२९३-९५ या या दरम्यान गुजरात, राजस्थान व पंजाबची यात्रा करताना, भारत यात्रेत ठिकठिकाणी कीर्तने करून विठ्ठल भक्तीचा प्रसार व प्रचार केला. मा. अ. मुळे नामदेवांच्या बाबतीत असे वर्णन करतात की ते ‘पहिले भजनी कीर्तनकार’ होते. नामदेव महाराजांनी वारकरी पंथाचा विस्तार व प्रचार व्हावा यासाठी पंढरपुरातील अनेक खेड्यातून त्याचप्रमाणे विविध प्रांतांतून कीर्तने केली. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगांवर व स्वरचित अभंगांवर ते निरूपण करायचे. त्याचप्रमाणे भगवान श्रीकृष्णांच्या लीला गुणवर्णन करणारे अभंग त्यांनी रचले. नामदेवांचे कीर्तन भक्तीप्रधान होते. नामदेवांच्या कीर्तनाचे अलौकिकत्व त्यांनी केलेल्या कीर्तन सामर्थ्यातून व्यक्त होते. नामदेव महाराजांच्या कीर्तनाचे स्वरूप विशद करताना असे दिसून येते की ते संतांच्या अभंगावर टाळ, वीणा, मृदंगाच्या नादात, टाळकरांच्या साथीने विठ्ठलाचा नाम गजर करत, भगवंताच्या कथा सांगायचे. कीर्तनात भजनाचे प्रमाण अधिक होते. नामदेव महाराजांनी आपल्या विविध अभंगाद्वारे कीर्तन महिमा

वर्णन केलेला आहे. नामदेवांची कीर्तननिष्ठा ही त्यांनी कीर्तनातून मांडलेल्या विषयांवरून स्पष्ट होते. कीर्तनाला उच्च नीच योनीचे बंधन नसते. कीर्तनाने सर्व जीवांचा उद्धार होतो, कीर्तनासाठी काळवेळाची मर्यादा नसते, कीर्तनाने काशी तीर्थाचा लाभ होतो, सर्व पापांचे दहन होते, नामस्मरणाचे महत्त्व असे विषय त्यांच्या कीर्तनातून दिसून येते. दुसऱ्या नामदेवांनी स्वरचित ५४ चरणी अभंगात नंतरच्या 'भानुदास महाराजांनी' पंढरपूरच्या गरुड पाराजवळ कीर्तन केल्याचे वर्णन केले आहे.

संत एकनाथांचा कालखंड १५३३-९९ असा आहे. पैठणच्या एकनाथ महाराजांनी वारकरी कीर्तनामध्ये प्रयोगशील कीर्तन आणले. एकनाथ महाराजांनी आशय व अभिव्यक्ती तंत्राचा समन्वय साधणारे कीर्तन तयार केले. नाथांची कीर्तन पद्धती ही वाङ्ग्मयीन मूल्यात भर घालणारी होती. नाथांनी तेलुगु, हिंदी पद रचना केलेला होत्या. कीर्तनातील आशय व अभिव्यक्तीचा आदर्श आपल्या विद्वत्तेने, व्यासंगी वृत्तीने, बहुश्रुततेने व समाज निरीक्षणातून त्याचप्रमाणे भगवत भक्ती व जनकल्याणाची तळमळ मनात ठेवून घालून दिला. परकीय अत्याचारी राजवटीमुळे वारकरी संप्रदाय विस्कळीत झाला होता. या संप्रदायाला पुनश्च एकत्र आणण्याचे काम प्रवचन, पुराण, कीर्तन, भजन, यात्रा, महोत्सव, ग्रंथ याद्वारे नाथांनी घडवून आणले व कीर्तन पद्धती रुढ केली. संत एकनाथांनी 'सगुण चरित्र परमपवित्र सादर वर्णावी' या स्वरचित अभंगावर निरूपण करून कीर्तनाची मर्यादा घालून दिली. नाथांनी कीर्तनातील अध्यात्म, अद्वैत, तत्त्वज्ञान भक्ती, ज्ञान, वैराग्य व परमात्म्याच्या सगुण-निर्गुण रूपाचे निरूपण याचा महत्त्वपूर्ण विचार केला. आध्यात्मिक अद्वैत तत्त्वज्ञान सर्वांना समजावे यासाठी सगुण चरित्र कथा व संत चरित्र दृष्टांत रूपाने सांगावी असा नाथांचा आग्रह होता. नाथांनी भागवत, रामायण, रुक्मिणी स्वयंवर, अभंग व समाज जीवनाचे प्रतिबिंब दर्शविणारी वैविध्यपूर्ण भारुडांची रचना केली. संत एकनाथांनी वेदांत विषयाचे ज्ञान सोपे करण्यासाठी पौराणिक कथा, वासुदेव, गोंधळी, गारुडी, महार, कोल्हाटी, जागल्या, आंधळा, पांगळा, विंचू, डंके इत्यादी रूपक काव्य प्रबंधांचा उपयोग कीर्तनातून केला. ल.रा. पांगरकरांनी उल्लेख केल्यानुसार नाथांनी कीर्तनाच्या शेवटी 'लळीत' करण्याचा प्रघात केला. नाथांचे कीर्तन सर्वसमावेशक होते. नाथांनी आपल्या अनेक अभंगातून कीर्तनाचे महत्त्व, कीर्तनाचा महिमा, त्याचे स्वरूप, लाभ, याचा उल्लेख केलेला आहे. नाथांनी बिकट परिस्थितीतही वारकरी पंथाचे व कीर्तनाचे महत्व जपले व बहुआयामी कीर्तन प्रयोग सिद्ध केला.

संत तुकाराम महाराजांचा कालखंड १६०८-१६५० असा आहे. तुकाराम महाराजांच्या कालखंडातील राजकीय परिस्थिती चांगली होती. त्यांनी विठ्ठल भक्तीचा प्रसार व वारकरी संप्रदायाचा विस्तार करण्यासाठी ४०६२ अभंग रचना केली व कीर्तन भक्तीचा विस्तारही केला. प्रत्येक मराठी कीर्तनामध्ये संत तुकाराम महाराजांचा अभंग आळवला जातो. संत तुकाराम महाराजांनी लोहगावी व देहू या गावांमध्ये कीर्तन केली. महिपत बुवांनी लिहिलेल्या तुकाराम महाराजांच्या चरित्रात त्यांनी ज्ञानेश्वरी, नामदेव गाथा, नाथ भागवत, अमृतानुभव, कबीर वचने व योगवाशिष्ठाचे अवलोकन केले असा उल्लेख आढळतो. संत तुकाराम महाराजांचे रामेश्वर भट्ट, गंगाराम मवाळ, महादजी पंत, लोहकरे, मालोजी गाडे, गवर शेठ, कोंडू पाटील, मल्हारपंथ लोहगावकर, कान्होबा बंधू, जगनाडे, नावजी माळी, शिवबा कासार व कचेश्वर ब्रह्म हे टाळकरी कीर्तनामध्ये साथ करायचे. तुकाराम महाराज १४ टाळकऱ्यांच्या साथीने 'रामकृष्ण हरी' भजनाने आपल्या कीर्तनाची सुरुवात करून पूर्वीच्या संत वाङ्मयाचा व वेदांत, शास्त्र, ग्रंथांचा वापर करून स्वरचित किंवा अन्य संतांच्या अभंगावर कीर्तने करीत. त्यांच्या कीर्तनात मुख्यतः विठ्ठल स्वरूप, नामसंकीर्तन, भक्ती, वारकरी पंथाची अभिवृद्धी, समाजाची नीतिमत्ता, सन्मार्ग अशा विषयांना निरूपणात प्राधान्य दिले जायचे, याचे दाखले त्यांच्या अभंगातून स्पष्ट होतात. अर्वाचीन वारकरी कीर्तन पद्धत पाहिली तर कीर्तनाच्या मंगलाचरणाचे व निरुपणाचे स्वरूप तुकाराम महाराजांपासून रूढ झाले असावे असा अंदाज बांधला जातो. संत तुकाराम महाराजांचे प्रतिपाद्य विषय हे विठ्ठलाचे परमार्थिक, सगुण निर्गुण स्वरूप, भक्ती मार्ग, नाम महात्म्य, संतांची लक्षणे, प्रपंच व परमार्थ अशा स्वरूपाचे होते. कथा कीर्तनात श्रोत्यांनी कसे वागावे, कीर्तनाधिकारी कसा असावा अशा प्रकारचे विवेचन त्यांनी आपल्या अभंगांमधून केलेले आहे.

अर्वाचीन वारकरी कीर्तन परंपरेचा काल १६५०-१९५० असा सांगितला जातो. तुकोबा-निळोबा नंतरच्या तीनशे वर्षात वारकरी संप्रदाय व वारकरी कीर्तन प्रगतिशील झालेले दिसून येते. अनेक संतानी, सतपुरुषानी, निष्ठावंत वारकऱ्यांनी विद्वान, प्रवचन, कीर्तनकारांनी व संशोधक लेखकांनी वारकरी पंथाचा विस्तार केला. दिंडी, वारी, फड, चातुर्मास, नाम सप्ताह, उत्सव, भजन लेखन याद्वारे विठ्ठल भक्तीचा प्रसार केला.

पंढरपुरामध्ये पहिला वारकरी फड स्थापन करण्याचे श्रेय मल्लाप्पा वासकरांना जाते. त्यांनी विठ्ठल भक्तीला संघटित स्वरूप प्राप्त करून दिले. त्यानंतर अनेक फडांची स्थापना झाली. या फडकऱ्यांनी वारी, दिंडी, भजन, कीर्तन व नाम सप्ताहाद्वारे संप्रदायाचा प्रसार केला.

वासुदेव महाराज, विठोबाअण्णा, भानुदास महाराज बेलापूरकर, बोवाजी बुवा, गंगूकाका, धोंडोपंत दादा, दादा महाराज सातारकर, कृष्णा महाराज व बंकटस्वामी हे सर्व प्रसिद्ध फडकरी कीर्तनकार होते. त्यानंतर अनेक ठिकाणी थर्ड सुरू करून दिंड्या पालख्या उत्सवांच्या निमित्ताने वारकरी एकत्र येऊ लागले व त्यानिमित्ताने कीर्तनकारांची कीर्तने ऐकावयास मिळू लागली. भाऊसाहेब महाराज काटकर, विठोबा दादा चातुर्मास्ये, सखाराम महाराज अंमळनेरकर, नाना महाराज साखरे, विष्णुबुवा जोग, दादा महाराज साखरे, ल.रा. पांगारकर, दादा महाराज सातारकर, धोंडोपंत दादा, गुंडा महाराज देगलूरकर, शं. वा. दांडेकर, बाबाजी पंडित, केशवराव देशमुख, रंगनाथ महाराज परभणीकर, महिपती महाराज देगलूरकर, यशवंतराव महाराज जालनापूरकर, धुंडा महाराज देगलूरकर, शंकर महाराज खंदारकर अशा विद्वत कीर्तनकारांनी कीर्तन प्रवचन पाठ व ग्रंथ लेखनाद्वारे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान वैदिक हिंदू धर्म लोकांपर्यंत पोहोचवला.

पुढे वारकरी कीर्तनाची परंपरा गुंडा महाराज देगलूरकर, मल्लाप्पा महाराज वासकर, साधू महाराज खंदारकर, वीरनाथ महाराज व अवसेकर घराणे, वीरनाथ गुंडा नाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज औसेकर, लक्ष्मण महाराज आष्टीकर, भाऊसाहेब काटकर महाराज, जोग महाराज व सोनोपंत दांडेकर, ह.भ.प दादा महाराज सातारकर , कीर्तनसम्राट बंकट स्वामी महाराज, श्री मोतीराम महाराज काकणी,.भगवान बाबा सानप भगवानगड, ह.भ.प. धुंडा महाराज देगलूरकर, ह.भ.प शंकर महाराज खंदारकर, खंडेराव भागवत महाराज व गजानन म. अंबुलगेकर अशा मान्यवर कीर्तनकारांनी सुरू ठेवली.

वारकरी कीर्तनाशी साधर्म्य दाखवणारे काही कीर्तन प्रकार विसाव्या शतकात महाराष्ट्रात निर्माण झाले बहुजनांसाठी अशिक्षितांसाठी समाज प्रबोधन व सुधारणा हा हेतू ठेवून संत गाडगे महाराज संत कैकाडी महाराज संत तुकडोजी महाराज अशा कीर्तनकारांनी कीर्तने केली.

वारकरी कीर्तन संप्रदायात नामवंत कीर्तनकार तयार झाले व अजूनही होत आहे. त्यापैकी, साखरे महाराज परंपरेतील नाना महाराज साखरे, जोग महाराजांचे शिष्य केशवराव महाराज देशमुख, अंमळनेरकर महाराज, श्री कृष्णदास लोहिया, संत तनपुरे महाराज, बाबा महाराज सातारकर, दादा महाराज मनमाडकर, दा. का. ठावरे, रामदासबुवा मनसुख, स. के. नेऊरगावकर इ. लोकप्रिय कीर्तनकार होते, आहेत. मराठवाड्यात अन्य अभ्यासू कीर्तनकार वारकरी

संप्रदायाचा प्रचार, प्रसार करीत आहेत. बोवाजीबुवा ठाकूर, संतोबा महाराज, यशवंत महाराज जालनापूरकर, दाजी महाराज टाकळीकर, बाबा महाराज उमरीकर, तुकाराम महाराज येहेळेगावकर, बापू महाराज कौठेकर, सीताराम बोकील, सीताराम धुंडीराज महाराज, शंकर महाराज खडकेकर, नाना महाराज मुखेडकर, ज्ञानोबा माऊली उम्रजकर, जनार्दनबुवा पाटांगणकर, मारुती महाराज दस्तापूरकर, संभाजीमामा मारतळेकर व ज्ञानेश्वर महाराज उमरगा हे प्रमुख दिवंगत कीर्तनकार आहेत. पांडुरंगबुवा गोसावी, मुरलीधर बुवा धूत, नामदेवशास्त्री सानप, जगन्नाथ पवार, किसन महाराज बरबडेकर, सोपानकाका इसादकर, ज्ञानोबा हरसूदकर, सांदीपान हस्सेगावकर, निवृत्तीबुवा हंडे, डॉ. बाळासाहेब साजणे, डॉ. सु. ग. चव्हाण, कालिदास महाराज, प्रकाश महाराज बोधले, परशुराम मराठी, प्रभू महाराज, बाबासाहेब इंगळे आदी विद्यमान वारकरी कीर्तनकार आहेत.

## १.३. <u>**कीर्तनातील काव्य.**</u>

प्रस्तावना.

कीर्तनामध्ये काव्यालाही महत्त्व आहे. ज्याप्रमाणे गद्यातून संदर्भांचे स्पष्टीकरण होते त्याचप्रमाणे काही सुप्त संदर्भ हे काव्याच्या माध्यमातून देखील कीर्तनामध्ये वर्णन केले जातात. कीर्तनातील काव्यामुळे कमीत कमी शब्दात एखादा आशय स्पष्ट होतो. कीर्तनामध्ये येणारे पद हे छंदबद्ध गेय रचनेतून निर्माण झालेले असते. कीर्तनातील काव्याचा विचार करताना ओवी, श्लोक, अभंग, भारुड, पोवाडे, कटाव, सुभाषिते, पदे, आर्या, दिंडी, ओवी, साकी इत्यादी रचनांचा अभ्यास कीर्तनकाराला करावा लागतो.

कीर्तन हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. त्यामुळे कीर्तनात रंजकता येण्यासाठी विविध गोष्टींचा अंतर्भाव असतो. ‘काव्य, शास्त्र, विनोदेन’ कीर्तनाचे प्रभावी सादरीकरण केले जाते. कीर्तनातील काव्य या उपप्रकरणात नारदीय, शाक्त, गाणपत्य, रामदासी कीर्तन परंपरेत वापरल्या जाणाऱ्या काव्यांचा उल्लेख केलेला आहे. वारकरी कीर्तनात केवळ भजन किंवा संताचे अभंगच असतात. इतर काव्य प्रकार वापरले जात नाहीत. वापरल्यास ओवी हा काव्यप्रकार वारकरी कीर्तनात वापरतात.

कीर्तनात ज्या काव्यांचा वापर केला जातो त्यासंबंधी ‘कीर्तनातील काव्य’ या उपप्रकरणात थोडक्यात विश्लेषण केलेले आहे.

**श्लोक**.

या काव्यप्रकारात अनेक वृत्ते येतात. मालिनी, उपेंद्रव्रज, स्नग्धरा शिखरणी, वसंततिलका, शार्दुल विक्रिडीत  इत्यादी. प्रत्येक वृत्ताचे चलन, अक्षर संख्या, मात्रा वेगवेगळे आहेत परंतु हा प्रकार हा प्रकार शांत रस, करून रस त्याचप्रमाणे श्रृंगार रसासाठी वापरला जातो. कीर्तनाचा प्रारंभच श्लोकाने होतो. कोणत्याही देवतेचे स्तवन करणारा, देवादिकांचे वर्णन करणारा श्लोक, स्तुतीपर श्लोक कीर्तनात वापरले जातात.

उदा. १. वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ| निर्विघ्नं कुरुमे देव| सर्व कार्येषु सर्वदा||

भुजंगप्रयात. उदा. वामन पंडित- गाठी जयाचा कधी पावला न| भार्या तया हाणित पावलान| तिर्था न गेला कधी पावलान| त्याला हरि तो कधी पावला न||

शार्दुल विक्रिडीत. उदा. (महाभारत आदी पर्व). पृथ्वी शेष धृता सशंभु कटकं कैलास कोणे वसन्| कैलासोपी दशाननेन दूलिता बध्योप्यसो वालीना| वाली राघव विष्णुनां युद्धिजीतां विष्णौ सतां मानसे| तस्मात् विष्णु परायणात् परतरौ नान्यस्ति लोकत्रये||

अनुष्टुप. उदा. (रामरक्षा स्तोत्र). चरितं रघुनाथस्य| शतकोटी प्रविस्तरम्| एकैक अक्षरं पुसां| महापातक नाशनम्||

**आर्या**.

आर्या या काव्य प्रकारामध्ये पहिल्या चरणात १८ व दुसऱ्या चरणात २० अक्षरसंख्या असते परंतु पहिल्या चरणात आकारात दोन अक्षर मात्रा घेतात त्यामुळे संख्या २०-२०च होते. प्रथम व दुसऱ्या चरणात भिन्न भिन्न अक्षरे आली तरी पुन्हा आकारात दोन अक्षर मात्रा येतात त्यामुळे संख्या समसम होते. वर्णनात्मक आर्या गाऊन म्हणता येते. तसेच करूण रसप्रधान किंवा वर्णनात्मक आर्या 'रामा रामा हरे हरे रामा रामा रामा रामा सीतापते रामा रामा' न लावताच म्हणणे संयुक्त ठरते.

उदा. १. (हिरकणीबुरूज आख्यान) हंडे पांच दुधाचे आणावे आज सांज समयी| सांगोनी स्वार गेला तत्क्षणी परतुनी राज भवनासी| रामा रामा....

२. (दत्तजन्माख्यान) नाही त्रिजगामाजी दुसरे ऐसे पतिव्रता रत्न| १९ आकारात.

टाकुनिया तनु लोभा पति सेवेचा करी महा यत्न|| २०.

**साकी**.

साकी या काव्यात दोन प्रकार आहेत. जुनी साकी किंवा लवंगलता आणि नवीन साकी. साकी, ही समवृत्ततही(टिप: वृत्त हे अक्षर व गण या दोन्हींवर अवलंबून असल्याने त्याला अक्षर गणवृत्त असे देखील म्हणतात. वृत्तांचे चरण अथवा पद चार असतात, जर प्रत्येक चरणांची अक्षर संख्या नियमित असेल तर त्याला समवृत्त म्हणतात. उदाहरणार्थ भुजंगप्रयात)असते किंवा अर्धसमवृत्ततही(टिप: पहिला व तिसरा सारख्या अक्षरांचा व दुसरा व चौथा सारख्या

अक्षरांचा पण वेगळ्या अक्षर संख्येचा असल्यास त्याला अर्धसमावृत्त म्हणतात)असते. आख्यानाची सुरुवात होण्यासाठी साकीचा वापर केला जातो. विशेषतः वीर रसाचे वर्णन करताना साकीने सुरुवात केली जाते. परंतु काही वेळा कारुण्य रसातही साकीचा वापर होतो. जुन्या साकीत किंवा लवंगलता मध्ये दोन ओळी असायच्या परंतु नव्या साकी वृत्तात चार चरण झाले. त्यातले दोन मोठे व दोन लहान, नऊ किंवा दहा अक्षरांचे असते. उदाहरणे,

१. (कृष्णाख्यानातील साकी- लवंगलता) क्षिर सागरी श्रीपती बोलती शैषालागी ऐसे|

चला घेऊ अवतार महीवरी सज्जन छळीले कंसे||

२. (निर्भय शिवबाख्यान: कारुण्यरस) हरली माझी धेनु जननी धावा धावा कोणी|

नेती माराया ते तिजला वत्स हंबरे सदनी|

ध्वनी तो शिवकानी आला|

शिवबा त्वरित तिथे गेला||

**दिंडी**.

दिंडीत चार चरण असतात. त्यातील प्रत्येक चरणाच्या अक्षर मात्रा ११ असतात. प्रथम अवसान पूर्व कशाही मात्रा व नंतर आकारात मिळून एकूण १९ मात्रा असतात. हा वर्णनात्मक असा गेय प्रकार आहे. व्यक्तीविशेष, गुणविशेष, व्यक्त करण्यासाठी दिंडी या काव्य प्रकाराचा वापर केला जातो.

१. (ध्रुवबाळ आख्यान. कऱ्हाडकर पठडी).

सूर्यवंशी उत्तानपाद राजा|

रुपवंती त्या असती दोन भार्या||

कनिष्ठेची अत्यंत प्रीती राया|

पट्टराणी नावडे तया जाया||

२. उभा होता तैसाचि जाय वेगी|

रडत पाठी लागली माय मार्गी||

ध्रुवा माते सोडूनी केवी जासी|

तुझ्यावाचूनि सर्वदा मी उदासी||

**ओवी**.

ओवी हा गेय प्रकार मराठीतील अत्यंत लोकप्रिय व रचनेच्या, चालीच्या दृष्टीने अत्यंत साधा असा छंद आहे. महानुभाव संप्रदाय ते संत ज्ञानेश्वरादी मंडळी त्याचप्रमाणे हल्लीच्या काळी सुद्धा कोणालाही आवडेल रुचेल असा हा काव्य प्रकार आहे. ओवी या प्रकारामध्ये अक्षर संख्या अनियमित असते. ओव्यांचे चार प्रकार केलेले आढळतात. १.ज्ञानेश्वरी ओवी, २.एकनाथी ओवी, ३.स्त्रियांच्या ओव्या, ४.आधुनिक ओव्या यांचा समावेश कीर्तनात केला जातो.

उदाहरणे. ज्ञानेश्वरी ओवी: १. माधुर्ये चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां समु ॥ २०४ ॥(ज्ञानेश्वरी, अध्याय बारावा)

एकनाथी ओवी: (श्रावणबाळ आख्यान) २. कोण सौभाग्याचा बाण| करीत आला नामस्मरण| ह्रदय निवले संपूर्ण| केले पावन मजलागि||१||

बहिणाबाई चौधरी ओवी: १. अरे संसार संसार| जसा तवा चुल्ह्यावर| आधी हाताला चटके| तेव्हा मिळते भाकर||

इतर काही ओव्या.

(कृष्ण सुभद्रा आख्यान) तुवां केले तिर्थाटन| सदा चित्ती समाधान| आता हे विषयाचे ध्यान| कांसाया तुज||

**आधुनिक ओवी.**

आधुनिक ओव्यांचा वापर कीर्तनात केला जातो.

उदा. १) आज माझ्या ओंजळीत। दाणे घाल मूठभर। काय मागते भी कार॥

२) मुक्या आभाळाच्या खाली। पोडुरक्या पंख चोच्चा। रतीमधे करकोचा॥

**देवद्वार**.

या छंद प्रकारचा वापर खूप कमी प्रमाणात केला जातो. मोजकेच अभंग या प्रकारात रचले जातात. या प्रकारातील पाहिले तीन चरण ६-६ अक्षरांचे असते व चवथा चरण चार अक्षरांचा असतो. क्वचित प्रसंगी ५ किंवा ६ अक्षरांचा असतो.

उदा. काय बानु आता| न पुरे ही वाणि| मस्तक चरणी| ठेवितसे| थोरीव सांडिली आपुली परिसे| नेणे शिवो कैसे| लोखंडासि||(संत तुकाराम)

**देवप्रिया.(पांडव)**

हा काव्य प्रकार अतिशय कमी प्रमाणात वापरला जातो. यात प्रामुख्याने प्रेम ओढ भक्ति अगतिकता या भावना व्यक्त केल्या जातात यात अक्षरसंख्या १५ असते पहिली दुसरी व चौथी ओळ यात यमक जुळलेले असते.

या काव्य प्रकाराची उदाहरणे संत एकनाथ, संत जनाबाई तसेच आदी संतांच्या विहरण्या म्हणून स्वीकारल्या जातात.

**झंपा**.

झंपा हा काव्यप्रकार बहुतेक वेळा वीर रसासाठी वापरला जातो. यात चार चरण असतात. प्रत्येक चरण साधारण १२ ते १३ अक्षरांचा असतो. या काव्य प्रकाराचे जुने नाव मोहमाया आहे. काही झंपे साडे तीन मात्रांचे असतात.

उदा. (द्रौपदी आख्यान) जावुनि फोडीतो| मस्तकही या गदे| मारुनी टाकितो| सोड मज जावुदे|

**फटका**.

या काव्यप्रकाराचे अजून एक नाव म्हणजे हरी भगिनी. यामध्ये २१ अक्षरे असतात. पोटअंतरा चार चरणांचा असतो. त्यात क्रमाने दहा/नऊ दहा/नऊ अशी अक्षरे असतात. निर्भीडपणा दाखवण्यासाठी किंवा वीर रस दाखवण्यासाठी हा फटका वापरला जातो. उदाहरणार्थ १. बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको

संसारामध्ये ऐस आपला उगाच भटकत फिरू नको.||

**स्फूर्ती गीत**.

हा काव्यप्रकार छंद शास्त्रात नसला तरी जोश, स्फूर्ती, वीर रसासाठी याचा वापर केला जातो. या काव्यप्रकारात चार चरणाचा अंतरा असतो व याला अक्षर संख्येचे बंधन नसते. परंतु यात लय व आघात या घटकांना महत्त्व असते. अंतऱ्यांना बंधन नसते.

उदा. १. सदैव सैनिका पुढेच जायचे| न मागुती तुवा कधी फिरायचे||

१. थांबला तो संपला| ना डरू आम्ही मावळे| मात करुनी सज्ज होऊ| सर्व ते हो अडथळे||

**पोवाडा.**

पोवाडा या काव्य प्रकाराचा वापर प्रामुख्याने वीर रसासाठी शाहिरांनी केलेला आढळतो. एखाद्या वीर प्रसंगाचे वर्णन पोवाड्यातून केले जाते. यात सुमारे १६ प्रकार आढळतात. प्रत्येकाची चाल वेगळी असते. अक्षर संख्येचे बंधन नसते तसेच विशिष्ट अशी पद्धत नसते.

उदा. ऐका हो तुम्ही सज्जन। मावळे जन । देवूनी ध्यान | मराठी मायभूमी अमुची।भूमी ही रणथर मर्दाची। लयाला गेली शान तिची । हो जीss जी ।। यवनांच राज्य देशात। गरीबा गांजीत। धर्म वाढवीत | बाटवित पर धर्मियांना। धर्म वाढी साठी छळती त्यांना। त्राता नाही हिन्दू धर्मियाना| हो जी ऽऽ जी।।

**चामर**.

या काव्य प्रकारात प्रत्येक चरणात अक्षरसंख्या 15 असते चार चरण असतात पहिल्या दोन व दुसऱ्या दोन चरणांची यमक जुळलेली असतात या काव्य प्रकारात आघाताला महत्त्व असते.

उदा. (कृष्ण जन्माख्यान).

कंस होय घाबरा तया गमे उभा हरी|

शंख चक्र खड्ग हाति घेऊनी उरावरी|

भूमि तेज आप वायू व्यापिले दिगंतरा|

ठाव ना विना कुठे न सापडे रिता जरा||

**पंचचामर**.

हा काव्यप्रकार देखील चामरासारखाच आहे. या ठिकाणी प्रत्येक चरणात अक्षर संख्या १६ असते. पहिला व दुसरा तसेच तिसरा व चौथा चरण यमक जुळणारे असतात. हा व चामर हे दोन्ही शौर्य, वीरता व मानसिकता दाखवण्यासाठी वापरले जातात. या काव्य प्रकारात देखील आघाताला महत्त्व आहे.

उदा. प्रमत्त खान आसुरी, उठे सभेत गर्जुनी|

स्वशौर्य वर्णु लागला, मिशीस पिळ देउनि|

न मी उगाच बोलतो, असाच चंग बांधतो|

शिवाजी काय पाहू त्या| धरुनि मीच आणतो||

**संग्राम गीत.**

हे उद्धवृत्त आहे. राजहंसाप्रमाणेच हे वृत्त असते. दु.आ तिवारी या महाराष्ट्र कवीनी हा काव्यप्रकार दिला. हा मुख्यत्वे वीर रसासाठी वापरला जातो. यात पहिल्या सहा ओळी समान अक्षरांच्या असतात. त्यात दुसरी चौथी सहावी ओळ यमक जुळवलेली असते. पुढे तीन ओळी यमक जुळवलेल्या असतात. पुन्हा दोन ओळीवरील प्रमाणे म्हणायच्या असतात.

उदा. जमवून मांड घोड्याला|

भरधाव कसा फेकावा|

जाताना निज खड्गाने| रिपुकंठ छेदावा|

नाचवित भाला हाती| शत्रूस कसा वेधावा||

**नृपममता**.

यातच अजून एक प्रकार आहे त्याचे चलन तसेच आहे. परंतु चालीत थोडा फरक असतो. या काव्यप्रकारचे नाव नृपममता असे आहे.

उदा: मरणाची भीती मज नाही| परी आशा एकच राही| अंबिके| महाराष्ट्र मुक्त झालेला| नच दिसला या शिवबाला| अंबिके| जरी अपेश समजला येई| स्वजनीची धडकत नाही| अंबिके| गांजले दीन जन किती| धेनुमरती| क्रूर ते अति| दया नच त्यांना नच त्यांना| दंडील कोण दुष्टांना| अंबिके||

**राजहंस**.

या काव्यप्रकाराचा उपयोग कारुण्य, विव्हळता, अगतिकता दर्शविण्यासाठी केला जातो. यात अक्षर संख्या समान नसते. परंतु पहिल्या, तिसऱ्या, पाचव्या चरणाचे यमक जुळलेले असतात. तसेच दुसऱ्या, चौथ्या व सहाव्या चरणाचे यमक जुळवलेले असतात. पुढील तीन चरण यमक जुळवलेले असतात. पुन्हा शेवटचे दोन चरण यमक जुळवलेले असतात. काही वेळा सहा चरणांचे यमक जुळवलेले असते.

उदा. १. करकरोनी मज बांधोनी| हे कसाई चिरती मानु| या या रे कोणी धावोनी| विव्हळती पंचही प्राण| आर्य हो तुम्हा वाचोनी| रक्षिल मज सांगा कोण? जावे मी शरण कुणा ते| हिंदू विण माझे नाते| पाळीला कोणी सांगाते| मी अनाथ झाले काय| हंबरडा फोडी गाय||१||

२. शर आला तो धावुनी आला काळ| विव्हळला श्रावण बाळ|

हा आई गे दीर्घ फोडूनी हांक| तो पडला जावुन झोक|

हे राजाच्या श्रवणी करून वाणी| हृदयाचे झाले पाणी|

त्या ब्राह्मण पुत्रा बघुनी| शोकाकुल झाला नृमणी| आसवे आणुनी नयनी|

दशरथ राजा रडला ढाई ढाई| अडखळला ठाई ठाई||१||

**अक्रुर**.

या काव्य प्रकारात पहिली ओळ १३ अक्षरांची निरक्षरी मात्रा असते, दुसरी ओळ ९ अक्षरांची असते. पोट अंतरातील चरणांचा असतो. अक्षरसंख्या नऊ ते दहा व शेवटचा चरण पहिल्यासारखा असतो.

"अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला" या पदावरून हा काव्यप्रकार अक्रूर या नावाने प्रचलित झाला. या काव्यप्रकारात देखील कारुण्य, विव्हळता, अगतिकता व्यक्त होते.

उदा. गुणी बाळ असाss जागसी कारे वाया| निज रे निज शिवराया| अपरात्रीचाss प्रहर लोटला बाई| तरी डोळा लागत नाही| चालेल जागता चटका| हा असाच घटका घटका| कुरवाळा किंवा हटका| का कष्टविसी ss तुझी सावळी काया| निज रे निज शिवराया||१||

**अंजनी गीत.**

पादा कुलकाच्या छंदातील अंजनी गीत हा काव्यप्रकार आहे परंतु चौथ्या चरणाच्या मात्रा कमी असल्याने हा प्रकार विषम जातीत येतो पहिल्या तीन चरणाचे यमक जुळलेले असते चौथा चरण अर्ध असतो कारण शांत रसासाठी या छंदाचा वापर प्रामुख्याने केला जातो.

उदा. (संत दामाजी आख्यान).

कांता बोले दामाजीसी| स्वामी ऐका मम वाचनासी| मारून आपण जावे मजसी| बेदरपूराला||

**पाळणा**.

हा काव्यप्रकार कुठलेही छंदात अथवा वृत्तांत नसावा. पण प्रत्येक जन्माख्यानात याचा वापर केला जातो. यात तीन तीन चरणांचे चौक असतात. प्रत्येक चौकातले दुसरे व तिसरे चरण यमकाने जोडलेले असतात. चरणांची अक्षर संख्या निश्चित नसते. प्रत्येक दोन चौकानंतर बाळा जो जो रे किंवा जो जो जो जो रे असे म्हणण्याची पद्धत आहे. या रचना शांत रसातील आहेत.

उदा. १. बाळा जो जो रे| कुलभुषणा| दशरथनंदना| निद्रा करि आता| मनमोहना| रामा लक्षुमणा| बाळा जो जो रे||

२. जो जो जो जो रे| सुकुमारा| दत्तात्रय अवतारा| निद्रा करि आता| ऊदारा| अद्भुत वर दातारा| जो जो जो जो रे||

**चौपाई**.

हा हिंदी काव्यप्रकार कीर्तनात वापरला जातो. चार चरणांची एक चौपाई असते. प्रत्येक दोन चरणांचे यमक जुळवलेले असते. प्रथम दोन चरण,१३ अक्षरांचे व दुसरे दोन चरण १२ मात्रांचे असते. याची पारंपरिक विशिष्ट अशी चाल आहे.

उदा. (हनुमान चालीसा.) जय हनुमान ज्ञान गुन सागर।

जय कपीस तिहुं लोक उजागर।। रामदूत अतुलित बल धामा।

अंजनि-पुत्र| पवनसुत नामा।। महाबीर बिक्रम बजरंगी। कुमति निवार सुमति के संगी।।

कंचन बरन बिराज सुबेसा। कानन कुंडल कुंचित केसा।।

**दोहा**.

हा हिंदी काव्यप्रकार कीर्तनात वापरला जातो. अक्षर मात्रा विसंगत असतात. चार ओळींचा एक दोहा असतो. प्रत्येक दोन चरण यमकांनी जोडलेले असतात. याचा पूर्वर्धन साधारण १२-११ अक्षरांचा असतो व उत्तरार्धात साधारण १३-१२ अक्षरांचा असतो.

उदा.(कबीर). बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय, जो दिल खोजा आपना, मुझसे बुरा न कोय|.

**कामदा.**

या वृत्तात चार चरण असतात. अक्षर मात्रा प्रत्येक चरणात १६ असतात. निरक्षरी चार अंतर्गत असतात. हा काव्यप्रकार वर्णनासाठी वापरला जातो.

उदा. (गज गौरी आख्यान)

करुनी पिंड तो एक झोकिला| नगर मार्गही त्यांनी झोकिला| जनहि विस्मये तव विलोकिती| मग दुजा तिजा येई मागुती||

**कटाव**.

या काव्य प्रकारात तीन-तीन चरणाचे एक असे अनेक चौक असतात. वर्णनासाठी हा काव्यपार वापरला जातो. एकेक चरणात किती अक्षरे असावी त्याचे काही परिमाण नसते. वीर रसासाठी या काव्यप्रकाराचा वापर केला जातो. तीनही चरण जोडलेले असतात. या काव्य प्रकारात तालाला महत्त्व आहे.

उदा. (विठोबा अण्णा)

कटाव - श्रीहरिवर्णन

हरि हा आनंदाचा कंद| आनंदाचा कंद उभा पुढे भक्त सखा गोविंद| भगवान आनंदाचा कंद||धृ||

सजलनीरदश्यामतनू नवरत्नखचित सौवर्णमुकुट शिरपेच तुरावरी|

कलगी विराजित कुटिलालकनिटीलासि कस्तुरी टिळक केशरी गंध|| हरि हा आनंदाचा कंद||१||

श्रवणी मनोहर मकर कुंडले फुल्लगल्लकर्णात दीर्घ सुप्रसन्न लोचन इंदुवदन तिलपुष्पनासिका कुंदरदन हनु अधर बिंबगत हास्य मंद मंद||२|| ....

**केशव करणी.**

केशव करणे हे नाव त्याच नावाच्या कवितेवरून पडलेले आहेत. यात पहिला चरण मोठा व दुसरा छोटा असतो. पहिल्या ओळीचे अक्षरसंख्या ठरलेली नसते पण साधारण १५ किंवा १६ असते. कधीतरी १७ असू शकते. दुसऱ्या ओळीतही १० किंवा ११ अक्षरे असतात. साधारण चार ओळी झाल्यावर पुढे काही वेळा दोन-तीन ओळी ९ किंवा १० अक्षरांच्या असतात व नंतर पुन्हा वरील प्रमाणे दोन ओळी असतात. हाही वर्णनात्मक काव्यप्रकार आहे.

उदा.(शिवचरित्र आख्यान). मायबोलीचा किल्ला आता द्यावा कोणाकरी| तेवढे सांगाना गडकरी|| साहित्याच्या सह्यगिरीची धाती खचली पुरी|| तयाला कोण कसा सावरी|| कशी राजलक्ष्मी राहील येथुनी पुढे| कशी मऱ्हाटशाही नांदावी चहुकडे| अन् दुनियेत घुमावे कीर्तीचे चौघडे| दिक्कालातुनी बघा शाहिरा दिसतो का तो तरी| आपुला वारस गोदावरी||१||

**कटिबंध**.

या काव्य प्रकारात दोन ओळींचा एक असे कितीही चौक असू शकतात. एखाद्या प्रसंगाचे वर्णन करण्यासाठी किंवा कथा पुढे नेण्यासाठी या काव्यप्रकाराचा वापर केला जातो. त्या काव्य प्रकारात प्रत्येक ओळ १७-१८ अक्षरांची असते प्रत्येक दोन ओळी यमकाने जोडलेल्या असतात.

उदा. (देवनाथ). कवडी कवडी करूनी जोडी, विप्रालागीं हात न जोडी, वेश्येलागी शालजोडी, बसावयाला खाशी घोडी, परवाल दाढी शालजोडी, घे अंगावर जरतारी पगडी, घडी घडी दे ताव मुछावरी, छडीबरदार पुढें चालती बडेजाव करी, रौप्य काठिया, भालदार चोपदार, नकीब, खिजमतगार भरूनि गुडगुडी, करीं धरुनियां ओठी, मुखांतुन धूर काढितो, लोडीं टेकुनि सदरी वसतो, बरवा दिसतो, तृणकाडीसम इतर लेखितो, गाढी अभिमानाची पेटी, बेटाबेटी, पोटीं नीजसुख दृढीकरण करी, प्रौढी उंच घरी, ओढी काळ हे कसे कळेना, रति पळलव क्षण आयुष्य सवही सरलें||

**लावणी**.

श्रृंगार व शांत रसासाठी लावणी हा काव्यप्रकार वापरला जातो. हा काव्यप्रकार लोकगीतातून आला आहे असे मानतात, परंतु त्याचा कर्ता ज्ञात असतो. यात नऊ ते दहा अक्षरांची पहिली ओळ असते. त्यानंतर पाच किंवा सहा अक्षरांच्या दोन ओळी असतात. त्यांची शेवटची अक्षरे जुळवलेली असतात. त्यानंतर पाच ते सहा अक्षरांची एक ओळ दोनदा म्हणण्याची आणि त्यानंतर १४ ते १५ अक्षरांची पुढची ओळ असते. तिचे त्या अगोदरच्या ओळीचे यमक जुळलेले असते. त्यानंतर तीन दीर्घ ओळी १३ ते १५ अक्षरांच्या असतात. त्यांचे यमक जुळलेले असते. त्यानंतर पहिल्यासारख्याच ओळी असतात.

उदा. सांगा मुकुंद कुणीं हा पाहिला?

रासक्रीडा करितां वनमाळी सखे होतों आम्ही विषयविचारी टाकुनी गेला तो गिरिधारी कोठें गुंतून बाई हा राहिला? सांगा मुकुंद कुणीं हा पाहिला?

गोपी आळविती हे व्रजभूषणा हे वियोग अम्हांलागी तुझा ना साहे भावबळे वनिता व्रजाच्या बोलाउन सुताप्रती नंदाजीच्या प्रेमपदी यदुकुळटिळकाच्या म्हणे होनाजी देह हा वाहिला सांगा मुकुंद कुणीं हा पाहिला.... (शाहीर होनाजी बाळा)

**केकावली**.

चार चार चरणांची एक केकावली असते दोन-दोन चलनांचे यमक जुळवलेले असतात यात अक्षर संख्या १७ असते. अश्वधाटी प्रमाणेच इथेही चलन अनाघात असते.

उदा. (मोरोपंत).

सुसंगती सदा घडो सुजनवाक्य कानी पडो । कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो । सदंघ्रिकमळी दडो मुरडिता हटाने अडो । वियोग घडता रडो मन भवच्चरित्री जडो ॥१॥ न निश्चय कधी ढळो कुजनविघ्नबाधा टळो । न चित्त भजनी चळो मति सदुक्तमार्गी वळो । स्वतत्त्व हृदयां कळो दुरभिमान सारा गळो । पुन्हा न मन हे मळो दुरित आत्मबोधे जळो ॥२॥

**मंदारमाला. (अश्वधाटी)**

या वृत्तात अक्षर संख्या २२ असते. याचे चलन ठराविक पद्धतीने असल्यामुळे याला अश्वधाटे हे नाव दिलेले असावे. या प्रकारात अंतर यमक जुळलेले असतात. यातच आणखीन एक प्रकार म्हणजे सुमंदार माला. फक्त यात अक्षर संख्या २३ असते. या वृत्ताला वागेश्वरी असेही दुसरे नाव आहे. दोन दोन ओळींचे चरण असतात. त्याची शेवटची अक्षरे जुळलेली असतात.

उदा. (मोरोपंत). वाचाळ मी नीट आचारित याचा नयो वीट साचा हरी|

खोटा जरी मी चखोटा मध्ये तूंचि मोठा कृपेचा न तोटा धरी||

दाता सुखाचा सदा तारिता आपदाताप हे एकदा तापटी|

या संतसेनाव्हया संपदा हे भया संग नाशील या संकटी.||

**गझल**.

या वृत्तामध्ये चार चार ओळींचे चरण असतात काही वेळेला दुसरा व चौथा चरण हे यमक जुळलेले असतात पहिला दुसरा व चौथा चरण याचे यमक जुळवलेले असतात दोन-तीन शब्दांचा एक चरण असतो साधारण 14 ते 15 मात्रा असतात.

उदा. (अफजलखान वध) निघाला वकील खानाचा| गडावर जावयासाठी| नाव हो कृष्ण भास्कर हे| यवनाचे कोड त्या ओठी.||

**पृथ्वीवृत्त**.

या वृत्तात दोन दोन ओळींचे यमक जुळवलेले असते प्रत्येक ओळी 17 अक्षरे असतात हे वृत्त अनाघात चालते याची चाल दोन आठ बारा अशा अक्षरा अखेर थबकत थपकत म्हटल्याने वैशिष्ट्यपूर्ण वाटते वीर व शौर्य रसासाठी हे वृत्त वापरले जाते.

उदा. (राणी पद्मिनी चरित्र). चितोड गड जिंकुनी त्वरित आणतो पद्मिनी| ससैन्य मग चालला आणण्या नवि स्वामिनी|| पतंग भुलतो जरी बघूनी दीप ज्योती दूरी| खरेच बनतो पशु मनुज काम मोही परी||

**विबुधप्रिया**.

या वृत्तात देखील दोन दोन ओळीचे यमक जुळवलेले असतात. प्रत्येक ओळीत अक्षरसंख्या १८ असतात. प्रौढी, शौर्य, युद्ध यासाठी हा काव्यप्रकार वापरला जातो. गद्य गेय प्रकार म्हणूनही याला संबोधले जाते. हे वृत्त अनाघात चालते. थबकत थबकत म्हटल्याने ते वेगळे वाटते.

उदा. दाखवी तव हा चरू मम हा चरू करी भक्षणा|

स्नान मी करिते मग करू दोघिही सह भक्षणा|| जायती जननी मनी गमले तिच्या चरू चांगला|

तेच रूप बदली पहा किती लोभ अंतरी दाटला||

**भूपाळी**.

हा पारंपरिक गीत प्रकार आहे. याला विशिष्ट मात्रा अक्षर संख्या नसते परंतु यात मुख्यतः आळवणी असते. पहाटेच्या वेळी हा काव्यप्रकार म्हटला जातो. प्रत्येक कवी आपल्या पद्धतीने भूपाळी लिहितात. त्यामुळे त्यात नियमबद्ध असे काही नसते.

उदा. घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला| उठी लवकरी वनमाळी उदयाचळी मित्र आला||

**दीनवत्सल**.

या प्रकारात प्रत्येक चरणात सात ते नऊ अक्षरे असतात. विडा, धावा, आरती अशा तिन्ही प्रकारच्या रचना या छंदात असलेल्या आढळतात.

उदा. विडा- विडा घ्या हो रामराया| महाराजराजया||धृ|| रत्नजडित पानदान| आली जानकी घेवून| विडा देत करूनिया| दीनबंधो रामराया||१||

धावा- धाव रे रामराया| किति अंत पाहाशी||धृ|| प्राणात मांडीलासे| न ये करुणा कैसी|| नयन शिणले बा| आता केधवा येसी||

आरती- आरती ज्ञानराजा| महाकैवल्य तेजा| सेवेतील साधुसंत| मनुवेधीला माझा||

**सवाई/हंसगती.**

या दोन्ही प्रकारात अक्षर संख्या २३ असते. सवाई हा फारसी शब्द असून त्याचा अर्थ सारखा असा आहे. अंतर्यामकास उद्देशून तो शब्द रूढ झालेला आहे. भारतीय शास्त्रकारांनी त्याला सवाई व हंसगती अशी अनुक्रमे नावे दिलेली आहेत.

उदा. सवाई. (शरसेतू आख्यान). ऐकुनिया या नरवीर शिरोमणी सांगतसे निज नाम तयाते| चंद्र कुलान्वय मंडण भूपती पंडू असे वदति पितयाते| पूर्ण परात्पर श्रीयदूवीर वदांबुज रेणुज सिक्त विराजे| हा मज अर्जुन यासिच हे जर्ग वर्णिती सर्व मुनीवर राजे|

हंसगती उदा. अयि गिरिन्नंदिनी नंदितमेदिनी विश्वविनोदिनी नंदिनुते| गिरिवरविन्ध्यशिरोऽधिनिवासिनी विष्णुविलासिनी जिष्णुनुते। भगवती हे शितिकन्थुकुटुम्बिनी भूरिकुटुम्बिनी भूरिकृते| जय जय हे महिषासुरमर्दिनी रम्यकपर्दिनी शैलसुते॥

**शिवराज.**

या वृत्तामध्ये पहिला चरण १० मात्रांचा(१ निरिक्षरी मात्रा धरून) व दुसऱ्या चरण १४ मात्रांचा असतो. पण तरी पहिले तीन पदानुकूल व चौथा चरण ध्रुवपदा सारखा असतो.

उदा. १. (शिवचरित्र). गडावर जाऽऽवु| शिवराज दर्शना लाहु| आमचा गुरु श्री शिवराणा| पुनरुज्जीवन हेतू पुराणा| महाराष्ट्र वीर्याचा बाणा| संकटी बाऽऽहु||धृ||

२. (सावता माळी चरित्र). चला ना जाऽऽवु| पंढरीचा विठ्ठल पाहु||धृ|| रूपमनोहर भाव भुकेला| दीन दयाळु म्हणती त्याला| गोप गड्यांचा मुरलीवाला| निरखूनी येऽऽवु| पंढरीचा विठ्ठल पाहु||.

**भूपती वैभव.**

उदा. पुण्याई सतीची फलद्रुप ती होई|

पांडुरंग विप्र स्वरूपी दुकाने येई|

महाराज मुलाची मुंज करावी ऐसा|

हेतु मनी धरिता नसेची जवळी पैसा|

श्रीमंत तुमचा लौकिक मोठा आहे|

या पेठेमध्ये म्हणूनी मी इथे आलो हे|

मज मदत करावी द्रव्याची हे याची|

तुम्हि मुंज लावणे तरी माझ्या बाळाची||

**विनोदी पद्य वर्णने.**

गणपति बाप्पाची आरती

जय देवा जय देवा जय गणपतिबाप्पा ।

करुनी टाकी आमुचा अभ्यास सोपा ।। ध्रु. ।।

भाषेमध्ये आडवे येई व्याकरण।

गणिताच्या तासाला उडते गाळण।

इतिहासाची नाहीं राहात आठवण।

गडबडगुंडा होतो शिकता विज्ञान ।। जयदेवा ।।

आवडतो आम्हाला गोष्टींचा तास।

वेळापत्रक टाकी बदलुनि तूं खास।

होऊं देत सगळे गोष्टींचे तास।

बाळांची तू पुरवी देवा ही आस ।। जयदेवा ।। (जुन्नरकर)

**वर्णनपर पद्ये.**

सूर्यवर्णन

धौम्य म्हणे, 'विचार सुमती । आराधुनियां गभस्तौ । मागा आपत्काळ बहुतीं । कीतिवंतीं क्रमियेला ।।

चतुराननें निर्मिल्या प्रजा । त्या क्षुधे पीडितां महाराजा । सूर्य प्रतिपाळी वोजा । पिता जैसा पुत्रातें ।।।

रस शोषी उत्तरायणीं । जळ मोकळी दक्षिणायणीं । औषधी पोषी चंद्रकिरणी । हे ही सामर्थ्य सूर्याचे ।।

म्हणोनी विश्वासी प्रतिपाळिता । सूर्यची जाणा तत्त्वता । सूर्यापरता अन्नदाता । दुजा नाही त्रैलोक्यीं ।।

सूर्यकिरणें होती छन । घनवृष्टीपासोनि अन्न । अन्नापासुनी प्रजा जाण । वेद प्रमाण निर्धारे ।।

सूयंचीब्रह्म सूयंची आत्मा । सूर्य नाशी अज्ञानतमा । विष्णु शंकर देव ब्रह्मा । सूर्यरूपे जाणावी ।।

या लागीं भानुमय अन्न । प्राणियातें प्राणधारण । करितां सूर्य आराधन । पूर्ण काम् तुझे होतो(मुक्तेबवर – वनपर्व)

**काही पारंपरिक पद्दे.**

- पद :-कीर्तनीं सापडशी

उघड हरि कीर्तन सांपडशी ।

उमगिता नुमगेचि सदाशिवातें । श्रुतिशास्त्रां दडशी ॥१॥

अष्टांगादिक योगमहातप । तेथेही नातुडशी ॥२॥

उद्धव चिद्घन नाचतो कीर्तनि । त्या अंगे जडशी ॥३॥

- गणराजवर्णन

गणराजपायीं मना जड जड जड ॥ध्रु. ॥

एकदंत गजवदनविराजित ।मोदक भक्षिसि भड भड भड ॥१॥

वेद भुजांगो शेंदुरचचित । फरकांकुशकरी खड खड खड ॥२॥

पीतांबरि जरीवरि फणिवेष्टित । मूषक चालवि दड दड दड ॥३॥

माणिक म्हणे मतिमंदमुक्यासी । वाचे बोलवि घड घड घड ॥४॥

**समारोप**.

प्रस्तुत प्रकरणात कीर्तनाचे स्वरुप, संकल्पना, व्याख्या, विविध कीर्तनप्रकारांच्या प्रयोग पद्धती, नारदीय व वारकरी कीर्तन परंपरेचा इतिहास व कीर्तनातील काव्य या उप प्रकरणांचा अभ्यास केलेला आहे.

पुराण काळापासून प्रसिद्ध असलेली कीर्तन परंपरा, तिचे स्वरूप व आताच्या घडीला प्रचलित असलेली कीर्तन परंपरा यांचा अभ्यास या प्रकरणाच्या माध्यमातून केलेला आहे. त्याचप्रमाणे वेदांपासून ते अगदी आताच्या कीर्तनकारांपर्यंत कीर्तनात झालेले बदल, कीर्तनाच्या व्याख्या, परिमाणे यांचा अभ्यास केलेला आहे.

कीर्तनात विविध प्रयोग पद्धती उदयाला आल्या. प्रत्येक पद्धतीत काही ना काही वेगळेपणा आहे तो ज्या स्वरूपाचा आहे त्याचाही चिकित्सक अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

नारदीय व वारकरी कीर्तन परंपरेचा इतिहास कीर्तनाची प्राचीनता स्पष्ट करतो. त्यातील वेगळेपणा व कीर्तनाच्या स्वरूपात झालेले बदल यांचे अचूक वेध इतिहासातून घेता येतात.

कीर्तनात वापरल्या जाणाऱ्या काव्यातून कीर्तनाची समृद्धता लक्षात येते. कीर्तनामध्ये संगीतलाही प्राधान्य दिले जाते. कीर्तनात जे काव्य वापरले आहे त्याचा अभ्यास केलेला आहे.

**निष्कर्ष.**

- कीर्तनाचे स्वरुप लक्षात घेता, वेदकाळापासून प्रचलित असलेली कीर्तन परंपरा स्थलकालानुरूप बदलत गेली.
- कीर्तन भक्तीचे आद्य प्रणेते म्हणून नारद महर्षींना महत्त्वाचे स्थान आहे. त्यानंतर संत नामदेव महाराजांना महाराष्ट्रातील वारकरी कीर्तनाच्या आद्य प्रवर्तकाचा मान दिला जातो.
- भारतीय कीर्तन परंपरा व वारकरी कीर्तन परंपरा महाराष्ट्रात तसेच गोमंतकादी भागांत प्रसिद्ध आहे.
- कीर्तन भक्तीला कलात्मक आविष्कार मानल्यामुळे कीर्तनाच्या सादरीकरण पद्धतीत बदल झालेले दिसतात.
- १३व्या शतकापासून वारकरी संप्रदायाचे कीर्तन विकसित झाले.
- वारकरी कीर्तनाचे नारदीय कीर्तन परंपरेला केंद्रबिंदू मानून कीर्तनाविष्काराची स्वतंत्र शैली निर्माण झाली.
- भारतामधील विविध प्रांतातील संप्रदायांनी, सांप्रदायिक प्रचार-प्रसारासाठी व भक्तिमर्गाचे प्रभावी साधन व माध्यम म्हणून कीर्तनाचा वापर केला.
- वेदांमध्येही कीर्तन भक्तिविषयी अप्रत्यक्षपणे भाष्य केलेले आढळते.
- वेद-शास्त्रांमधून सांगितलेला विचार, संतांचा उपदेशात्मक आचार व भगवद्गुणानुवाद कीर्तनाचा स्थायीभाव आहे.
- भारतीय कीर्तन पद्धतीतील वैविध्यता सादरीकरणाच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाची आहे
- नारदीय कीर्तन परंपरेला अनुसरून इतर संप्रदायातील विविध कीर्तन प्रयोग आकार घेऊ लागले. प्रत्येक कीर्तन प्रयोगाचे स्वतंत्र वैशिष्ट्य व सादरीकरण पद्धती लक्षणीय आहे.
- नारदीय व वारकरी कीर्तन परंपरेला इतिहास आहे. मूळ नारदांपासून सुरू झालेली कीर्तन परंपरा, पुढे विकसित होत गेली. त्यात गोविंदतारकाश्रम महाराजांचे योगदान आहे. वारकरी कीर्तनाची परंपरा संत नामदेवांपासून सुरू झाली व वारकरी कीर्तन परंपरेत अन्य वारकऱ्यांची भर पडली.
- विविध कीर्तन प्रयोग पद्धती जरी वेगळया असल्या तरी कीर्तनाचे उद्दिष्ट्य व प्रेरणा साम्य दर्शवितात. भक्तिमार्गाचा अवलंब व समाज प्रबोधन अशा द्वी सूत्रांचा विचार कीर्तनात केला जातो.
- नारदीय कीर्तनाचे राष्ट्रीय, रामदासी, गाणपत्य, शाक्त असे उप प्रकार आहे.

- गाणपत्य, शाक्त कीर्तनात गणपती व शक्तीला अनुक्रमाने प्राधान्य दिले जाते.
- रामदासी कीर्तन संप्रदायात श्रीराम व समर्थ रामदास यांच्या चरित्राचा समावेश असतो. रामदासी कीर्तनाच्या शेवटी रामदासांच्या जीवनातील प्रसंग सांगून कीर्तन संपविले जाते.
- गाणपत्य, शाक्त कीर्तन कमी प्रमाणात होते.
- कीर्तनामध्ये वापरले जाणारे काव्य कीर्तनाला रंजकता प्राप्त करवून देते.
- कीर्तनात वापरले जाणारे काव्यप्रकार कीर्तन नवरसपूर्ण करण्यास उपयुक्त ठरतात.
- कीर्तनातील काव्य यात नमूद केलेले काव्यप्रकार वारकरी कीर्तन प्रयोगाव्यतिरिक्त अन्य कीर्तनात विपुल प्रमाणात आढळतात.

**संदर्भ.**


१. जोशी, पी.जी. कीर्तनरंग, मीरा बुक्स अँड पब्लिकेशन, प्र.आ. २२ जानेवारी २०१०, पृ.क्र.९.

२. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र. २-३

३. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र. ४.

४. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र. १.

५. जोशी, पी.जी. कीर्तनरंग, मीरा बुक्स अँड पब्लिकेशन, प्र.आ. २२ जानेवारी २०१०, पृ.क्र.३३.

६. पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.१६.

७. पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.२८.

८. पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.२९.

९. पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.७४.

१०.पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.७५.

११.पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.८३.

१२.पाठक, यशवंत. कीर्तनप्रयोग, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.दि.१७ सप्टेंबर २०१५, पृ.क्र.८४.

१३. ह.भ.प.उदय बुवा फडके यांच्या बाडातून, काव्यप्रकार.

**प्रकरण २. नारदीय व वारकरी कीर्तन परंपरा व प्रकाराची तुलना.**

प्रस्तावना.

“यत् फलं नास्ति तपसा न योगेन समाधिना| तत् फलं लभते सम्यक् कलौ केशवकीर्तनात्||”(श्रीमद् पद्मपुराण, ६.१९५.५४.). जे फळ तपस्येने वा योग सामर्थ्याने प्राप्त होऊ शकत नाही, समाधान मिळत नाही, ते फळ कलियुगात भगवंताच्या कीर्तन भक्तीतून प्राप्त होते. नवविधा भक्तीतील अद्वितीय असणारी द्वितीय भक्ति म्हणजेच कीर्तन, ही भक्ति परमोच्च आनंद देणारी असते. श्रीमद् भागवतात वर्णन केल्याप्रमाणे, नारद-व्यास संवादातातून नारद महर्षी व्यासांना उपदेश करतात की, त्यांनी विपुल प्रमाणात ग्रंथ निर्मिती केली परंतु त्यांना त्यातून समाधान मिळाले नाही. काहीतरी अपूर्ण वाटत होते; त्यावेळी नारदांनी त्यांना असे सुचविले की, भगवंताचे कीर्तन, गुण वर्णन त्यांच्याकडून घडले नाही म्हणून त्यांना तसे वाटते. भगवंताचे गुण वर्णन करणारा ग्रंथ, प्रत्यक्ष कृष्ण म्हणजे श्रीमद् भागवत ग्रंथांची रचना होय.

आध्यात्मिक दृष्टीकोनातून पाहिले तर कीर्तन करण्यामागचा हेतू म्हणजे कीर्तनातून भगवंताचे गुण वर्णन, कीर्ती गाणे. त्याचबरोबर कीर्तनातून मनोरंजन होते. आध्यात्मिक विचाराने पाहिले तर कीर्तन हा भक्तिमार्ग आहे. भक्तीसूत्रातील ज्ञान ज्या साधनातून साधले जाते किंवा दिले जाते, ज्यात भगवंताचे गुणवर्णन, अवतार कार्याच्या उद्देशाचे वर्णन केले जाते ते म्हणजे कीर्तन. भक्तिमार्ग सांगणारे अनेक पंथ, संप्रदाय तयार झाले. वैचारिक साम्य-भेदातून विविध संप्रदाय निर्माण होऊ लागले. उपदेश, नवविधा भक्ती, जीवनदृष्टी बदलणारे, धर्मोपदेश करणारे, असे पंथ निर्माण झाल्यामुळे नवविध साधन दृष्टी तयार होऊ लागली. कीर्तन क्षेत्रात देखील विविध संप्रदाय आपापल्यापरीने प्रगती करत होते व टिकून उरले. प्रत्येक संप्रदायाचे स्वतंत्र असे वैशिष्ट्य आहे व तद्अनुषंगे कीर्तने सादर होतात. आजही बऱ्याच प्रमाणात ज्या दोन संप्रदायांच्या माध्यमातून कीर्तने होताना दिसतात ते म्हणजे, नारदीय संप्रदाय व वारकरी संप्रदाय. नारदीय कीर्तन परंपरा प्राचीन आहे व वारकरी कीर्तन परंपरा ही मध्ययुगीन आहे व आजतागायात टिकून आहेत.

वैदिक धर्माचे जे पुनरुत्थान झाले त्या प्रक्रियेत मध्ययुगीन भारतात विविध भक्तिसंप्रदाय उदयाला आले. विविध प्रांतात जाऊन संतपुरूष, तत्ववेत्ते, कवी, प्रवचनकार, वेदांती सांप्रदायिक प्रसारकांनी आपापल्या संप्रदायाचा विस्तार केला. प्रत्येक कीर्तनप्रकाराचे स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व आहे. महाराष्ट्रात वारकरी व नारदीय कीर्तन परंपरेचे

प्रवाह आहेत. आजही या दोन कीर्तन परंपरांची ज्ञानगंगा अविरत वाहते आहे. कीर्तन परंपरेत एकूणच विचार करता अनेक घराणी तयार झाली. कीर्तनातून कांतासम्मित उपदेश बुवा करतात.

नारदीय आणि वारकरी परंपरा व प्रकारांमध्ये आशय-अभिव्यक्तीनुरूप फरक आढळतात. या दोन्ही संप्रदायांचा उद्देश एक असला तरी साम्य-भेद आहेत.

## २.१. वारकरी कीर्तन व नारदीय कीर्तन परंपरेतील साम्य-भेद.

वारकरी कीर्तन परंपरा.

वारकरी कीर्तन परंपरा महाराष्ट्रात तेराव्या शतकापासून उदयाला आली. वारकरी संप्रदायाचा विस्तार त्या पंथातील अनेक साधुपुरुष, संत, वाङ्मयनिर्मिती, पंढरीची यात्रा, दिंडी, फड, भजन, नामसाप्ताह, चातुर्मास व विविध उपक्रमांच्या योजना आखून केला. वारकरी कीर्तन हे भागवत धर्माच्या प्रसारासाठी उत्तम साधन व माध्यम बनले. स.१२७०-१९७० या कालखंडात संत नामदेव, एकनाथ, तुकारम, गुंडा महाराज, मल्लप्पा वासकर, जोग महाराज, बंकटस्वामी, शं.वा दांडेकर व धुंडा महाराज या काही प्रसिद्ध कीर्तनकारांनी वारकरी कीर्तन परंपरा समृद्ध केली. या कीर्तन संस्थेची उद्दिष्ट्ये लक्षात घेता, असे दिसेल की यात, परमार्थ साधना, आत्मोन्नती, जनप्रबोधन, विठ्ठलभक्ति व संप्रादायाचा विस्तार अशी होती. वारकरी कीर्तनाचे आद्य जनकत्व संत नामदेवांकडे जाते. कालांतराने कीर्तनाचे विविध उपप्रकार निर्माण झाले. वारकरी भजने व कीर्तने आषाढी कार्तिकीच्या दशमी ते पौर्णिमेपर्यंत प्रत्येक फडावर सकाळ संध्याकाळ सादर होतात. 'निरुपण' हा शब्द वारकरी सांप्रदायिक कीर्तनाला वापरला जातो. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अशी वारकरी कीर्तन परंपरा असलेली दिसून येते या परंपरेत ज्ञानोबा-निळोबा यांचे वाङ्मय वापरले जाते. वारकरी कीर्तन परंपरेची सुरुवात 'जय जय रामकृष्ण हरी' याने होते.

संत ज्ञानेश्वरांचे कीर्तन हे धर्मकीर्तन होते. संत नामदेवांची कीर्तन पद्धती म्हणजे प्रत्यक्ष कीर्तनाचे प्रयोग, त्यांनी प्रात्यक्षिक स्वरूपात सादर केले. एकनाथांचे कीर्तन हे आशय व अभिव्यक्तीचा, तंत्राचा समन्वय साधणारे होते. तुकोबारायांचा उदय सतराव्या शतकात झाला. त्यांनी नामदेवांची व एकनाथांची परंपरा पुढे चालविली. ते आद्य राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून मानले जातात. राजकीय स्थिती स्वराज्यानंतर जरी बदलली असली तरी तत्कालीन

समाजाने तेवढी प्रगती गाठली नव्हती. संत तुकाराम महाराजांनी विठ्ठलभक्ति व वारकरी संप्रदायाचा प्रसार, प्रचार व्हावा या हेतूने ४०६२ अभंगाची रचना केल्याचे सांगितले जाते व त्यातून त्यांनी कीर्तनाचा विस्तार केला. तुकारामांच्या काळात पूर्वरंग व उत्तररंग असे कीर्तनाचे दोन भाग झाले. अर्वाचीन वारकरी कीर्तनाचा विचार केला तर १६५०-१९५० हा कालखंड विचारात घेतला जातो. त्या काळात वारकरी कीर्तनाची व वारकरी संप्रदायाची भरभराट झालेली दिसून येते. आषाढी कार्तिकीच्या निमित्ताने पंढरपूरच्या वारीला येणाऱ्या वारकरी लोकांसाठी वारकरी कीर्तनाचा खूप मोठा वाटा आहे. विविध कालखंडात या संप्रदायात अनेक लोकप्रिय कीर्तनकार होऊन गेले. साखरे महाराज परंपरेतील नाना महाराज साखरे, जोग महाराजांचे शिष्यत्व पत्करलेले केशवराव महाराज देशमुख, अंमळनेरकर महाराज, श्री कृष्णदास लोहिया, संत तनपुरे महाराज, बाबा महाराज सातारकर, दादा महाराज मनमाडकर, दा.का.ठावरे, रामदासबुवा मनसुख, स.के.नेऊरगावकर इत्यादी. मराठवाड्यात देखील वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करणारे काही कीर्तनकार आहेत, बोवाजीबुवा ठाकूर, संतोबा महाराज, यशवंत महाराज जालनापूरकर, दाजी महाराज टाकळीकर, बाबा महाराज उमरीकर, तुकाराम महाराज येहेळेगावकर, बापू महाराज कौठेकर, सीताराम बोकील, सीताराम धुंडीराज महाराज, शंकर महाराज खडकेकर, नाना महाराज मुखेडकर, ज्ञानोबा माऊली उम्रजकर, जनार्दनबुवा पाटांगणकर, मारुती महाराज दस्तापूरकर, संभाजीमामा मारतळेकर व ज्ञानेश्वर महाराज उमरगा है प्रमुख दिवंगत कीर्तनकार आहेत. पांडुरंगबुवा गोसावी, मुरलीधर बुवा धूत, नामदेवशास्त्री सानप, जगन्नाथ पवार, किसन महाराज बरबडेकर, सोपानकाका इसादकर, ज्ञानोबा हरसूदकर, सांदीपान हस्सेगावकर, निवृत्तीबुवा हंडे, डॉ. बाळासाहेब साजणे, डॉ. सु. ग. चव्हाण, कालिदास महाराज, प्रकाश महाराज बोधले, परशुराम मराठी, प्रभू महाराज, बाबासाहेब इंगळे इत्यादी. सद्य स्थितीत अस्तिवात असलेली वारकरी कीर्तन पद्धती १८ व्या शतकात उदयाला आली. संत ज्ञानेश्वरांनी निरूपणाचे स्थान स्पष्ट केले तर संत नामदेव महाराजांनी भजन, संगीत,साथीदारांची जोड देऊन सामूहिक कीर्तन प्रयोगाचा प्रत्यक्ष आविष्कार केला. संत एकनाथ महाराजांनी त्यात आशय व अभिव्यक्तीच्या तंत्रात सुधारणा करून वेदान्त, भगवत कथा, विविध काव्य प्रबंध, दृष्टांत कथन, भजन, संगीत या घटकांचा उपयोग करून निरुपणाच्या प्रतिपादनात मोलाची भर घातली. संत तुकाराम महाराजांनी पूर्वीच्या संतांची कीर्तन पद्धती लक्षात घेऊन अर्वाचीन कीर्तन पद्धती निर्माण केली. त्यात टाळकरांच्या साथीने व रामकृष्ण हरी भजनाने कीर्तनाचा प्रारंभ करण्याचा प्रघात सुरू केला. संत तुकाराम महाराजांनी कीर्तनात अभंगाचे निरूपण,

भगवत कथांचे वर्णन याद्वारे लोकांना उपदेश करून सन्मार्गाला लावण्याचे कार्य केले. वारकरी कीर्तनातील आधुनिक प्रयोग हा याच संतांच्या योगदानातील परिशीलनातून निर्माण झाला. नंतरच्या कीर्तनकारांनी या कीर्तन अंगाचे सूक्ष्म निरीक्षण करून कीर्तनाचा आरंभ, निरूपण, प्रतिपाद्य विषय, दृष्टांत, वचने, भजन, संगीत, साथीदार, निवेदन शैली, कीर्तनाचे फलित, कीर्तनाचे ध्येय, कीर्तनाचे प्रयोजन इत्यादीची सुस्पष्ट मर्यादा ठरविली व यातूनच विद्यमान कीर्तनाचा प्रयोग, कीर्तनाचा बौद्धिक, परमार्थिक व सांप्रदायिक स्तर निश्चित केला. यात मल्लाप्पा वासकर, भाऊसाहेब काटकर, भानुदास महाराज बेलापूरकर, धोंडोपंत दादा, नाना महाराज, विनायक महाराज साखरे, विष्णुबुवा जोग, दादा महाराज सातारकर, बंकटस्वामी महाराज, धुंडा महाराज, शंकर महाराज यांचा मोलाचा वाटा आहे. वारकरी कीर्तनाच्या महत्त्वपूर्ण घटकांचा विचार करता त्यात मंगलचरण, भावार्थ, व्याख्यान, दृष्टांत, प्रमाणे व विषय प्रतिपादन यांचे प्रामुख्याने दर्शन होते.

नारदीय कीर्तन परंपरा.

नारदीय कीर्तन हे वारकरी कीर्तन परंपरेपेक्षा भिन्न आहे. नारदीय कीर्तन परंपरेचा विचार करता ही कीर्तन परंपरा नारदांपासूनच सुरु झाली म्हणून त्यांना नारदीय कीर्तनाचे आद्य प्रवर्तक मानले जाते. भारतीय कीर्तन परंपरेचा विचार करताना नारद, शुक, प्रल्हाद, अंबरीश, व्यास आदी प्राचीन विभूतींशी संबंध असलेला दिसून येतो. नारदीय कीर्तन याचा उल्लेख, श्रीमद् भागवत या प्राचीन ग्रंथात असलेला आढळतो. “अहो देवर्षिर्धन्योऽयं यत्कीर्ति शार्ङ्गधन्वयु| गायन् वाद्यन् इदं तंत्र्या समयत्यातुरं जगत||”(श्रीमद् भागवत, स्कं.१,अ.६,श्लो.३९.) यावरून असे लक्षात येते की उत्कट, उदंड भक्तीने भगवान नारायणाचे गुण वर्णन गाणारे नारद, हातात वीणा घेऊन, दुःखीत जगाला हरिकथेने आनंद प्रदान करत होते. पद्मपुराणामध्ये शुकाचार्यांनी वाद्ये व साथीदारांच्या सहाय्याने कीर्तने केल्याचे वर्णन सापडते. नारदीय कीर्तन परंपरेने संत एकनाथांचा संकेत पाळला, “सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी| सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी||”. मुक्तेश्वर, वामनपंडित, अमृतराय, भुजंगनाथ, मोरोपंत, आनंदतनय, मध्वमुनीश्वर, उद्धवचिद्धन हे सर्वजण या नारदीय परंपरेतील आहे. नारदीय कीर्तनाची प्राचीनता सांगताना प.पु.धुंडा महाराज असे उद्धृत करतात की, “आज आपण ज्या अर्थाने कीर्तन शब्द वापरतो तशा कीर्तनाची परंपरा ही खूपच प्राचीन आहे.....ही परंपरा देवर्षी नारद, शुकसनकादिक मुनिश्रेष्ठ, भागवतातील नवयोगेश्वर ऋषभपुत्र यांच्यापासूनची आहे. नारद हे प्रतिभासंपन्न कीर्तनकार होते व जगदुद्धारासाठी त्यांनी सर्वत्र कीर्तने केली म्हणून नारद हेच भारतीय कीर्तनपरंपरेचे ‘आद्यजनक’

मानले जातात.” संत एकनाथ जरी वारकरी संप्रदायाचे असले तरी महाराष्ट्रीय नारदीय कीर्तनाचे संस्कार त्यांच्या व दासोपंतांच्या कीर्तनात आढळतात. नारदीय कीर्तन परंपरेत नमनाचा आरंभ गणपती, सरस्वती, सद्गुरू, माता-पिता, श्रोते असा होतो. नमनात देखील दोन परंपरांचा समावेश आहे. एक परंपरा गोविंदताराकाश्रामाची ज्यात ‘जय जय रामकृष्ण हरी’ने आरंभ करतात.(दुसऱ्या परंपरेचा उल्लेख नंतर). “रामदासी कीर्तनाच्या माध्यमातून रामदास स्वामीनी (१६०८-१६८१) नारदीय कीर्तनाला सुसंघटीत व प्रगल्भ स्वरूप प्राप्त करून दिले”. अर्वाचीन महाराष्ट्रीय नारदीय कीर्तनाची श्रीगणेशा ही रामदासी कीर्तनातून सुरु झाली.

रामदासी कीर्तन परंपरा सुरु असतानाच संत, पंत, शाहीर यांनी कीर्तनात उपयुक्त असणाऱ्या काव्य सामग्रीची विपुल प्रमाणत निर्मिती केली. (१७ शतक,पैठण) मुक्तेश्वरांनी महाभारत,संक्षेप रामायण व शतमुखरावण, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्र भोजन, हरिश्चंद्र, अर्जुनकामपूर्ती, शुकरंभा-संवाद, स्फुट प्रकरण, आरत्या, पदे अशा प्रकारची रचना केली. महानुभाव आणि नाथांची आख्याने कीर्तनात उपयुक्त करून दिली. वामन पंडितांशिवाय(१६०८-१६९५) कीर्तन अपुरे आहे. ‘सुश्लोकवामनाचा’ याशिवाय अनेक पौराणिक आख्यानांची निर्मिती त्यांनी केलेली आहे. (१६२८-१६९०)विठ्ठल बीडकर यांनी देखील अनेक चरित्राख्याने व जो जो रे कुलभूशणा अशा पाळण्यांची रचना केली. त्याचबरोबर गेय पदांची रचना केली. कृष्णदयार्णव यांचे अभंग, अमृतराय यांचे कटाव, यानंतरचे कीर्तनकार परांड्याचे भुजंगनाथ, नंतर चुडामणीसुत विठ्ठल, विष्णुदास माहुरकर, दासगणू महाराज यांनी उत्कृष्ट दर्जाची गेय पद्य रचना केली. अनेक संत-पंत कवींनी विविध प्रकारची आख्याने रचली, पदांची रचना केली, अभंग, वृत्ते, कटाव, छक्कड, रागदारी या पदांची रचना केली आणि नारदीय कीर्तनाचे दालन अधिक समृद्ध केले व नारदीय कीर्तनाला नाविन्यता प्राप्त करून दिली. संत एकनाथांपासून नारदीय कीर्तनाची वाटचाल सुरु झाली. संत रामदासांनी आदर्श कीर्तन प्रयोगाचा पाइंडा घालून दिला. एकोणिसाव्या शतकापासून नारदीय कीर्तन परंपरेचे स्वरूप पाहता असे दिसून येईल की, कीर्तनातील पुर्वरंगाचे स्वरूप कीर्तनकार स्वरचित आख्याने, पदे इत्यादींचा वापर किंवा इतर संत-कवींच्या अभंगाचा वापर करून निरूपण केले जायचे. परंतु तद्नंतर कीर्तनाच्या अभिव्यक्ती शैलीमध्ये बदल झाले. ‘गोविंदबुवा होशिंगकर’ यांना अर्वाचीन नारदीय कीर्तन परंपरेचे प्रणेते म्हणतात. आजच्या नारदीय कीर्तन पद्धतीतील नमन, पूर्वरंग व उत्तररंग इत्यादीचे स्वरूप हे गोविंद तारकाश्रम पठडीतले आहे असे मानले जाते. गोविंद तारकाश्रम परंपरेत नमनाचे पद- ‘जयजय राम कृष्ण हरी’ हे आहे. या नमनानंतर ‘बाळकृष्ण चरणी लक्ष लागोरे।‘ हे पद म्हणतात. रोज नवीन

पदावर पूर्वरंग करावयाचा प्रघात आहे. मधले (मध्यंतर) भजन 'राजाराम कृष्णहरी' हे म्हटले जाते." त्यानंतरचे सर्व कीर्तनकार याच पद्धतीचा अवलंब करतात. अर्वाचीन नारदीय कीर्तन प्रक्रियेचा विचार केला तर कीर्तनाची सुसूत्रीत बांधणी असायचीच त्याशिवाय कीर्तनध्येय, कीर्तनकार, प्रतिपाद्य विषय, कीर्तनवाङ्मय, संगीत, वक्तृत्व, नमन, पूर्वरंग, उत्तररंग, आशय व अभिव्यक्तीतंत्रात अनेक परिवर्तने घडली व आजही विकसित होत आहेत.

साम्य-भेद.

या दोन्ही कीर्तनपरंपरेत साम्य असे की, भगवत् भक्तीच्या प्रेरणेतून आणि समाजाला जागृत करण्यासाठी, उद्बोधन करण्याच्या हेतूने आजतागायत सुरु आहेत. भगवंताचे गुणवर्णन, नामसंकीर्तन व समाज प्रबोधन हा उद्देश ठेवून कीर्तनाची परंपरा कार्य करीत आहेत. कालौघात आवश्यक बदल झाले, कीर्तनाला आजही समाज सुधारण्याचे एक उत्तम साधन व माध्यम म्हणून पाहिले जात आहे. नारदीय व वारकरी कीर्तनाची परंपरा अभिव्यक्तीनुरूप बदलेली आहे. वारकरी कीर्तन संत ज्ञानेश्वरांपासून सुरु झाली त्यांनी धर्मकीर्तनाचा पुरस्कार केला. संत नामदेव महाराजांनी आपली कीर्तनपद्धतीत बदल घडवून आणला. संत तुकाराम महाराजांची कीर्तनभक्ती परखड स्वरूपाची व राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारी होती. संत गाडगेबाबा समाज सुधारक म्हणून कीर्तनातून मार्गदर्शन करायचे, तसेच कैकाडीमहाराज यांचीही कीर्तनपद्धती संत गाडगेबाबांप्रमाणेच होती.

नारदीय कीर्तन परंपरा ही देवर्षी नारदांपासून सुरु झाली असा उल्लेख आढळतो. अर्थात वारकरी कीर्तन परंपरा ही मध्ययुगीन कालखंडातील आहे व नारदीय कीर्तन परंपरा ही प्राचीनतम आहे. नारदीय कीर्तन परंपरेमध्ये हरिगुण गायन केलेले दिसून येते, भगवंताच्या अवतारकार्याचा उद्देश, यशकीर्ती वर्णन, या सगळ्या गोष्टींचा विचार केला जात होता व अजूनही करतात. भगवंताच्या आख्यानाद्वारे मनोरंजनही व्हावे व जीवन मृत्युच्या पाशातून मुक्त होण्यासाठी अध्यामिक दृष्टी देण्याचे कार्य नारदीय कीर्तन करत आलेले आहे. कालांतराने त्यात बदल झाल्याने आशयाला वेगळी विचार दृष्टी मिळाली व वेदान्त, शास्त्र इत्यादी सोप्या पद्धतीने मांडून सामान्यांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले.

## २.२. वारकरी कीर्तन व नारदीय कीर्तन प्रकारांतील साम्य-भेद.

नारदीय व वारकरी कीर्तन यांच्या परंपरेतील साम्य भेदांचा विचार झाला. नारदीय व वारकरी कीर्तन परंपरा यांच्या प्रकारातील साम्य भेदांचा विचार आवश्यक आहे. कीर्तन हे जेवढे आशयावर अवलंबून असते तेवढेच ते अभिव्यक्ती शैलीवरही अवलंबून असते.

प्रत्येक कीर्तन परंपरेची एक शैली असते. कीर्तन सादरीकरणाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर त्यातील वैविध्यता लक्षात येईल. आशय-अभिव्यक्तीच्या अंगाने वारकरी व नारदीय कीर्तन प्रकारांमध्ये वेगळेपणा आढळतो. दोन्ही परंपरांच्या उद्देश व ध्येयामध्ये सादृशता असली तरी प्रकरामध्ये वेगळेपणा आहे. वारकरी कीर्तन परंपरेत आशय, अभिव्यक्ती व वेशभूषा या अनुषंगाने भिन्नता असलेली दिसते.

वारकरी कीर्तन प्रकार.

प्रारंभीच्या कालखंडात राऊळातील विठ्ठलाचे दर्शन घेतल्यावर, देवाला पाठ न दाखवता विठ्ठलाचे भजन करत मागे जायचे ते थेट चंद्रभागेच्या वाळवंटात उतरायचे. त्यानंतर भजनाने कीर्तनाचा आरंभ होतो. वारकरी कीर्तनात गाण्यापेक्षा भजनावर जास्तीत जास्त भर असतो. किमान दहा वीस टाळकरी, कीर्तनकाराच्य मागच्या बाजूला उभे असतात. गावागावात जाऊन अशाप्रकारे राऊळातील कीर्तन करणे कठीण होते म्हणून ह.भ.प. विष्णुबुवा जोगानी पद्धत बदलली. आताच्या वारकरी कीर्तानावर जोग बुवांच्या पद्धतीच्या प्रभाव असलेला दिसतो. वारकरी कीर्तनात जोगबुवांनी पूर्वरंग व उत्तररंग असे भाग सुरु केली. अखंड भजनाची प्रक्रिया कीर्तन सुरु असताना चालू असते. वारकरी एक वचन प्रमाण मानतात ते म्हणजे, 'सुंभाचा करदोटा रकट्याची लंगोटी| नामा वाळवंटी कीर्तन करी||'. ही पद्धती वाळवंटातील असल्यामुळे नदीकाठी जेव्हा तीर्थयात्रेच्या निमित्ताने संतांचा मुक्काम असायचा त्यावेळी तिथे कीर्तने केली जायची. जनाबाई, चोखामेळा यांच्या अभंगातून तसे वर्णन दिसते. वारकरी कीर्तनात निरुपण होते. या संप्रदायातील वारकरी कीर्तनास 'निरुपण' असे म्हणतात. वारकरी कीर्तन परंपरेत गाथ्यांतील अभंगाची कडवी एकामागून एक गाण्याची पद्धत होती. परंतु पुढे ही प्रथा बंद झाली. वारकरी कीर्तन करणारे बुवा कीर्तनाला उभे राहण्यापूर्वी, बुवाच्या व्यासपीठाच्या भोवती जास्तीत जास्त हजारापर्यंत टाळकरी भजन सुरु करतात. कीर्तनकार बुवा व्यासपीठावर उभे राहीपर्यंत, वीणेकरी पुढे उभा राहून संतांचे अभंग सांगतो व इतर टाळकरी एकेक ओळ लावून

म्हणतात. त्यांच्या भजनाच्या चाली पारंपरिक असतात, अनेक पदे किंवा अभंग उच्च चालीत म्हटले जातात. मृदंगाची साथ असते. भजनी वारकऱ्यांपैकी मुख्य एका वारकऱ्याच्या हातात वीणा असते ती घेऊन, टाळकऱ्यांच्या मधोमध पण त्यांच्या रांगेच्या पुढे उभा असतो. बुवांच्या डाव्या बाजूला काही अंतरावर पाखवाजी उभा असतो. मधोमध अंथरलेल्या गालिच्यावर बुवा तेवढ्याच जागेवर फिरतात. जागच्या जागीच किंचित हालचाल असते. वीणेच्या सहाय्याने अभंग म्हणतात. ज्यावेळी बुवा कीर्तनासाठी येतात, त्यावेळी टाळकरी, वीणेकरी "विठोब्बा(हा शब्द प्रयोग करताना ठो वर आघात होतो व ब अक्षरावर जोर दिला जातो) रखुमाई" ही धून ठाय धुमाळीत सुरु करतात. भजन सुरु असतानाच बुवा कीर्तनाच्या गादीवर उभे राहतात. वीणेकरी व श्रोतृवर्गाला वंदन करून वीणा आपल्या गळयात घालतात, वीणेचे स्वर नीट लागले आहेत की नाही ते पाहतात व त्यानंतर "जय जय रामकृष्ण हरी" या भजनाच्या आरंभाने काही अवधी बुवा भजन सांगतात व श्रोते टाळया वाजवून म्हणतात. ठाय लयीतील भजन सावकाशीने हळूहळू दृतलयीपर्यंत वाढते. बुवा वीणेच्या तारा जलद छेडू लागतात. बुवांनी टाळकरी प्रमुखास इशारा केला की भजन द्रुततम गतीने वाढते. अशा पद्धतीने किमान पाच ते दहा मिनिटे भजन टाळयांच्या गजरात अगदी वेगाने सुरु असते. बुवा कीर्तनाच्यावेळी जेव्हा मध्येच 'हो'ऽऽ म्हणताच, पाखवाजीने मोहरा घेताच टाळकरी उतारी घेऊन भजन संपवितात. भजनामुळे कीर्तनाची पार्श्वभूमी तयार होते. त्यानंतर बुवा ज्ञानदेवाचा किंवा वारकरी बुवा तुकाराम महाराजांचा अभंग नमनासाठी घेतात. "रूप पाहता लोचनी|सुख झाले वो साजणी||"/ "सुंदर ते ध्यान| उभे विटेवरी| कर कटावरी| ठेवूनिया||१||" या अभंगांचा शेवटचा चरण येताच बुवांसह सारे डोळे मिटून मान खाली घालून नमस्कार करतात. कोणत्याही वारकरी कीर्तनात संत ज्ञानदेव महाराजांचा अभंग नमन म्हणून येतो, हे मंगलाचरण संपले की पुन्हा 'जय जय रामकृष्ण हरी' हे भजन सर्वांसह म्हटले जाते. ज्या अभंगावर पुढे बुवाना निरुपण करायचे असते तो अभंग ते म्हणतात. बुवा अभंगाचा एकेक चरण प्रथम म्हणतात व मग तो चरण अभंगातील मूळ धृपदाशी जोडून टाळकरी म्हणतात. अभंग संपल्यानंतर "विठोब्बा रखुमाई" हे भजन काही मिनिटे बुवांसह श्रोते म्हणतात. भजन संपताच निरूपणाचा अभंग धृपदासह पहिले कडवे उत्तम चालीने रागदारीसह म्हणण्यास बुवा एखाद्या टाळकऱ्यास खूण करतात. त्यावेळी वारकरी कीर्तन अभंगाला वेगळया सुरेल चालीत म्हणण्यास थोडा वेळ दिला जातो. भजनी धुमाळीच्या ठायलयीत वा विलंबित तीनतालात म्हणणारच फक्त टाळ वाजवून गातो. इतर टाळकरी शांतपणे उभे असतात. हा अभंग म्हणणारा विविध प्रकारच्या तानांसह अभंग गातो व त्याला तानांची दोन-

तीन टाळकरी साथ करतात. एकमेकांच्या तानांसह व आवाजाच्या चढत्या पट्टीसह अभंग गातात. अधूनमधून पाखवाजी मोहरा, चक्रधर पारण व धुमाळीच्या चौपाटीतून फिरून समेवर येतात, भजनी धुमाळीच्या उतारीच्या वेळी काही मोहरे पेश करतात. टाळकरी अखेरच्या कडव्यापर्यंत हळूहळू लय वाढवितो. अभंग संपताच बुवा टाळया किंवा टाळ वाजवून "विठ्ठलऽऽ विठ्ठलऽऽ" भजन करतात.

त्यावेळी भजन सुरु असताना बुवांच्या गळयातील वीणा, हा पूर्वीचा मुख्य वीणेकरी येऊन ती वीणा आपल्या गळयात घालतो आणि त्यानंतर टाळकऱ्यांमध्ये जाऊन एका कोपऱ्यात उभा राहतो. ज्यावेळी बुवा व वीणेकरी एकमेकांना वीणा देतात व घेतात त्यावेळी एकमेकांच्या पायाला नमस्कार करतात; कारण ते असे समजतात की हा कीर्तनाच्या गादीचा मान आहे. वीणेच्या तारांवर पखवाज लावतात. वारकरी कीर्तनामध्ये वीणेचे महत्त्व विशेष मानतात. भजन थांबविण्याची सूचना मिळाल्यानंतर द्रुतलयीत 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम' हा उद्घोष होतो. पुन्हा एकदा 'बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय' असा जयजयकार सर्वत्र होतो. त्यानंतर निरूपणासाठी घेतलेल्या अभंगाचा भावार्थ सरळ सोप्या आणि थोडक्या शब्दात सांगितला जातो. हा भावार्थ अभंगाच्या स्वरूपावर किंवा कमी जास्त वेळेप्रमाणे सांगितला जातो. वारकरी कीर्तनामधला वाङ्मयीन प्रवास हा ज्ञानोबा ते निळोबा असा असतो. या संतां व्यतिरिक्त इतर कोणाचेही काव्य कीर्तनात म्हणू नये असा वारकरी कीर्तनाचा पारंपरिक दंडक आहे. याच कालखंडातील समर्थ रामदासांच्या कवितेचा अंतर्भाव वारकरी कीर्तनात कधी केला जात नाही ही सांप्रदायिक शिस्त आहे असे ते मानतात. ही सांप्रदायिक चौकट असल्याने ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबाराय याच संत कवींचे अभंग निरूपणासाठी मोठ्या प्रमाणात घेतले जातात; परंतु हा सांप्रदायिक नियम असल्याचा पुरावा किंवा हा नियम कोणी ठरवला याविषयी नमूद केलेले सांगितले जात नाही. वारकरी कीर्तनामध्ये जी संत वचने वापरली जातात ती वरील नमूद केलेल्या संतांनी लिहिलेल्या वचनांपैकीच असतात. भागवत धर्माच्या प्रचार प्रसारासाठी जे वाङ्मय असते त्याला प्राधान्य दिले जाते. वारकरी कीर्तनकारांचा समग्र ज्ञानेश्वरीचा, गाथेचा अभ्यास सखोल आणि मूलाग्रही असतो. वारकरी कीर्तनामध्ये भगवंताचे संकीर्तन हे मुख्य सूत्र असले तरी वारकरी कीर्तनकार अस इतर संप्रदायातील विविध मतांचा आढावा घेता येत नाही. जेथे कीर्तन करावयाचे तेथील अन्न सेवन करू नये, बरोबरच्या घोड्यासाठी दाणा सुद्धा मागू नये असा वारकरी संप्रदायाचा दंडक आहे. वारकरी कीर्तनाच्या परंपरेत टाळकऱ्यांची संख्या अधिक असते. ज्या गावात कीर्तन करायचे असेल, त्या

गावातील वारकरी संप्रदायाची भजनी मंडळ असतात. अनेकदा परगावाहून जर बुवा आणले तर त्यांच्यासोबत काही टाळकरी असतात. नमन संपल्यानंतर बुवा उपरणे आपल्या कमरेभोवती घट्ट गुंडाळतात, निरूपणाला सुरुवात झाल्यानंतर अभंगांच्या सर्व चरणांचा भावार्थ अतिशय सोप्या व साध्या भाषेत विविध प्रकारची प्रमाणे देऊन ४५ मिनिटात बुवा स्पष्ट करून सांगतात. दृष्टांतासाठी अनेकदा छोट्या कथा, चुटके वापरून पुन्हा मूळ पदावर येण्यासाठी 'विठ्ठल, विठ्ठल, नामदेव' असा गजर सुरू असतो. निरूपणामध्ये हे भजन बऱ्याचदा येते. याच संप्रदायातील इतर संतांची जी वचने असतात ती पारंपरिक चालीतून म्हटली जातात. भावार्थ सांगून संपल्यानंतर बुवांच्या कपाळी बुक्का लावला जातो आणि हार घातला जातो. हा हार भजना पुरता ठेवून काहीजण बाजूला ठेवतात; त्यावेळी पूर्वरंग संपतो. त्यानंतर निरूपणाचा जो अभंग असतो तो पुन्हा चालीत किंवा रागदारीत मोजके टाळकरी म्हणतात. अभंग संपल्यानंतर एकदा 'विठ्ठल विठ्ठल' किंवा 'विठोबा रखुमाई' याचा मोठा गजर करतात. लय जसजशी वाढते तसा गजर उंचावतो शेवटी पांडुरंगाच्या जयजयकारात हे भजन संपते. त्यानंतर पुढे उत्तररंगाला सुरुवात होते. यामध्ये अभंगाचा जो उत्तरार्ध असतो त्याचे विस्तार पूर्वक स्पष्टीकरण बुवा देतात. पूर्वार्धातील जे काही प्रश्न असतात त्यासंबंधीची उत्तरे उत्तररंगात दिली जातात. उत्तररंगातील निरुपणासाठी जे विषय घेतले जातात ते म्हणजे जन्म मरणाची निर्धार कशी संपवावी, देवाच्या सख्यात्वासाठी सत्संगाची जरुरी असते, नामानेच मन:शांती कशी लाभते, शांतीचा व सुखाचा अनन्य संबंध कोणता?, संतत्व म्हणजे काय, देवाचे स्वरूप असे असतात. प्रत्येक वेळी आपल्या प्रतिपादनाला अनुसरून अभंग, वचन, ओवी, भागवतातील संदर्भ असे अनेक आधार बुवा देतात. मधून मधून थोडा वेळ विठ्ठलाचा नाम गजर करतात. 'पुंडलिक वरदे व ज्ञानदेव तुकाराम' हा गजर पुष्कळदा येतो. पूर्वरंगात जो भावार्थ सांगितला जातो, त्याचे सूक्ष्म आणि सोपे विस्तार पूर्वक विश्लेषण समारोपसह व त्याच्या उद्देशांसह उत्तररंगांमध्ये सांगितले जाते. निरूपणाच्या अभंगाचे सखोल संप्रदायिक ग्रंथाधरे स्पष्टीकरण दिले जाते. देव आणि संत याच विषयांना वारकरी कीर्तनात स्थान आहे. वारकरी कीर्तनामध्ये विषयांतर करायचं नाही असा कडक संकेत पाळला जातो. परंतु विषयाला अनुसरून समाजातील दोषांवर किंवा व्यंगांवर टीका टिपणी केली जाते. कीर्तनामध्ये आधुनिक चुटके आणून उपहास साधला जातो. परंतु त्याचा उद्देश एवढाच असतो की, समाजात सुनीती वाढावी, चांगले विचार करण्याची क्षमता लोकांमध्ये यावी. वारकरी कीर्तनामध्ये ऐतिहासिक, राष्ट्रीय व्यक्तींची चरित्रे, त्यांच्या निरूपणाचा विषय होत नाहीत. वारकरी कीर्तनात संप्रदायातील मोठ्या माणसांचे चरित्र सांगता येत नाहीत. वारकरी कीर्तनात

आख्यान लावणे हा प्रकार येत नाही. अनेकदा हरिभक्त यांचे मत, दृष्टांत रूपाने किंवा प्रसंगोपात हकीकतींचा समावेश निरुपणामध्ये केला जातो. प्रामुख्याने परमार्थ विवेचन व भक्ती यांचे वर्णन केले जाते.

सद्य स्थितीत अस्तिवात असलेली वारकरी कीर्तन पद्धती १८ व्या शतकात उदयाला आली. संत ज्ञानेश्वरांनी निरूपणाचे स्थान स्पष्ट केले तर संत नामदेव महाराजांनी भजन, संगीत,साथीदारांची जोड देऊन सामूहिक कीर्तन प्रयोगाचा प्रत्यक्ष अविष्कार केला. संत एकनाथ महाराजांनी त्यात आशय व अभिव्यक्तीच्या तंत्रात सुधारणा करून वेदांत, भगवत कथा, विविध काव्य प्रबंध, दृष्टांत कथन, भजन, संगीत या घटकांचा उपयोग करून निरुपणाच्या प्रतिपादनात मोलाची भर घातली. संत तुकाराम महाराजांनी पूर्वीच्या संतांची कीर्तन पद्धती लक्षात घेऊन अर्वाचीन कीर्तन पद्धती निर्माण केली. त्यात टाळकरांच्या साथीने व रामकृष्ण हरी भजनाने कीर्तनाचा प्रारंभ करण्याचा प्रघात सुरू केला. संत तुकाराम महाराजांनी कीर्तनात अभंगाचे निरूपण, भगवत कथांचे वर्णन याद्वारे लोकांना उपदेश करून सन्मार्गाला लावण्याचे कार्य केले. वारकरी कीर्तनातील आधुनिक प्रयोग हा याच संतांच्या योगदानातील परिशीलनातून निर्माण झाला. नंतरच्या कीर्तनकारांनी या कीर्तन अंगाचे सूक्ष्म निरीक्षण करून कीर्तनाचा आरंभ, निरूपण, प्रतिपाद्य विषय, दृष्टांत, वचने, भजन, संगीत, साथीदार, निवेदन शैली, कीर्तनाचे फलित, कीर्तनाचे ध्येय, कीर्तनाचे प्रयोजन इत्यादीचे सुस्पष्ट मर्यादा ठरविली व यातूनच विद्यमान कीर्तनाचा प्रयोग, कीर्तनाचा बौद्धिक, परमार्थिक व सांप्रदायिक स्तर निश्चित केला. यात मल्लाप्पा वासकर, भाऊसाहेब काटकर, भानुदास महाराज बेलापूरकर, धोंडोपंत दादा, नाना महाराज, विनायक महाराज साखरे, विष्णुबुवा जोग, दादा महाराज सातारकर, बंकटस्वामी महाराज, धुंडा महाराज, शंकर महाराज यांचा मोलाचा वाटा आहे. वारकरी कीर्तनाच्या महत्त्वपूर्ण घटकांचा विचार करता त्यात मंगलचरण, भावार्थ, व्याख्यान, दृष्टांत, प्रमाणे व विषय प्रतिपादन यांचे प्रामुख्याने दर्शन होते.

नारदीय कीर्तन प्रकार.

कलिसंतरणोपनिषदात वर्णन केल्याप्रमाणे एकदा नारद मुनींनी ब्रह्म देवाना प्रश्न केला की कळीकाळातून तरुण जाण्यासाठी काय उपाय आहे त्यावर ब्रह्म देवानी "भगवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारणमात्रेण निर्धूतकलिर्भवति॥१॥ (कलिसंतरणोपनिषद्)" अर्थात, कळीकाळातून तरुण जाण्यासाठी भगवान आदिपुरूष श्री

नारायणाचे नाम मात्र सर्व दोष नाहीसे करतील, असे सांगितले. पुराण काळापासून भगवंताच्या नामसंकीर्तनाला प्राधान्य दिलेले आहे. आदित्यपुरणात असे नमूद केलेले आहे की, "हरेः संकीर्तनं यस्य सर्वपातकनाशनम्। (आदित्यपुराण) "या कीर्तनात भगवन्नामसंकीर्तनाला भक्त महत्त्व देतात. त्यामुळे पातकांचा नाश होतो."[१]

भागवतात प्रत्येक युगात भक्तीचे मार्ग सांगितलेले आहेत. "कृते यद् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः। द्वापरे परिचर्यायां कलौ-तद्धरिकीर्तनात्॥ (भागवत. २.३.५१)" कलियुगामध्ये सांगितलेले कीर्तनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नवविधा भक्तितीत श्रवणानंतर कीर्तन भक्तीला प्राधान्य दिलेले आहे. अशा या भक्तीमर्गाचे स्वरुप नारद मुनींच्या काळात कसे होते याचे वर्णन श्रीमद्भागवतात केलेले आहे. "प्रल्हादस्तालधारी तरलगतितया चोद्धवः कांस्यधारी। वीणाधारी सुरर्षिः स्वरकुशलतया रागकर्तार्जुनोऽभूत्। इन्द्रो वादीन्मृदङ्ग जयजयसुकराः कीर्तने ते कुमाराः। यत्राग्रे भाववक्ता सरसरचतया व्यासपुत्रों बभूव॥ (श्रीमद्भागवत) म्हणजे देवर्षी नारद, शुक सर्वत्र संचार करीत कीर्तने करायचे, नामस्मरणाचे महत्त्व लोकांना पटवून द्यायचे. कीर्तनाला आवश्यक असणाऱ्या सर्व साधनचा उपयोग करून शुकाचार्यांनी कीर्तनाला विशिष्टता प्राप्त करून दिली. कीर्तनाला आवश्यक असणारे संगीत, वक्तृत्व, नाट्य, अभ्यास या विषयीचे परिपूर्ण ज्ञान नारदांना होते. नारदांनी कीर्तनाचे शास्त्र तयार केले त्यातूनच नारदीय संप्रदाय उदयाला आला. नारदांच्या कीर्तनाचे वर्णन विविध पुराणांमधून केलेले आहे.

नारदीय कीर्तन पद्धती वेगळी आहे. या नारदीय कीर्तन प्रयोगाच्या संदर्भात ह. भ. प. विनायकबुवा भागवत यांनी समर्पक व्याख्या केलेली आहे ज्यात नारदीय कीर्तनाची सर्व वैशिष्ट्ये नमूद केलेली आहे. "वाग्वैदग्ध्यविराजितं नवनवोन्मेषार्थकाव्यान्वितम्। गीताऽऽलापकलापितं च भगवल्लीलाविलासीकृतम्।।यत्स्याद्यत्र किलावलंब्य महतां पद्यं सुबोधप्रदम् । तस्मिश्चेदुपसंहृतं भुवि वरं प्रोक्तं हरेः कीर्तनम्।। "शब्दरचना, वाक्यरचना इ. वाक्चातुर्याने शोभविलेले, नव्या नव्या अर्थाच्या कवितांनी युक्त असलेले, गाण्यांच्या तानांनी वाढविलेले, नटविलेले, भगवल्लीलेने शोभविलेले जे असेल, ज्यात साधुसंतांचे एखादे उपदेशप्रद पद प्रमाणभूत घेऊन त्यावर विवेचन संपविलेले असेल ते हरिकीर्तन श्रेष्ठ ठरते."[२]. कीर्तन हे जरी मुक्त असले तरी त्याचे एक तंत्र असते. नारदीय कीर्तनाचा प्रारंभ मंगलाचरण/नमनाने होतो. त्यात इष्टदेवतेचे, कुलदेवतेचे, ग्रामदेवतेचे स्तवन केले जाते, गुरू परंपरेचे स्मरण करून 'श्रीमन्महागणाधिपतये नमः' कीर्तनाची सुरुवात करतात. त्यानंतर श्रीगणेशाचे स्तवन केले जाते व देवी शारदेचा श्लोक म्हटला जातो. "स जयति सिंधुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम्।

वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम् ॥

यदा लंबोदरं हन्ति सां प्रत्यूह संभवम्। तदालंवं दयालम्बे लम्बोदरपदांबुजम्॥

नमस्ते शारदे देवी सरस्वति मतिप्रदे। वस त्वं मम जिव्हाग्रे सर्वविद्याप्रदा भव"॥

देवतांचे स्मरण करून झाल्यानंतर काही बुवा झांज अथवा चिपळया घेऊन जयजयकार करतात. मंगलाचरणापूरती झांज वाजविली जाते. काहीजण मागे उभ्या असलेल्या किंवा साथीला बसलेल्या व्यक्तीकडे झांज, चिपळया देतात. त्यानंतर "जयजय राम कृष्ण हरी" या पदाने, धुमाळीने व पारंपरिक चालीने कीर्तनाला प्रारंभ केला जातो. नारदीय कीर्तनाच्या मंगलाचरणाच्या दोन भिन्न परंपरा आहेत. त्यातील गोविंद तारकाश्रमानी रचलेल्या, भगवान कृष्णाचे वर्णन असलेल्या पदाने अद्यापही कीर्तनकार मंगलाचरण म्हणतात किंवा दुसऱ्या परंपरेत शुक, व्यासादी परंपरेचा उल्लेख केलेले पद वापरले जाते. ही पदे नारदीय कीर्तनाचे मानदंड आहेत असेच मानले जाते. डॉ. पटवर्धनबुवा, कवीश्वरबुवा, काशीकरबुवा, गौतमबुबा हे पहिल्या परंपरेतील आहेत. तर नानाबुवा बडोदेकर, मुरलीधरबुवा व लक्ष्मणबुवा निजामपुरकर, वासुदेवबुवा जोशी, कवीश्वरबुवा, या कीर्तनकारांनी दुसऱ्या परंपरेचा अवलंब केला. "पहिल्या परंपरेतील पद: जय जय रामकृष्ण हरी ॥ ध्रु. ॥ गोवर्धनधर गोपालनरत, गोकुळसंकट हारी ॥ १ ॥ -नवनीरदसम नत्रनीतप्रिय, नवलविनोदविहारी ॥ २ ॥ रावणमदहर दीनजनोद्धर, सुरवरमोचनकारी ॥ ३ ॥

दुसऱ्या परंपरेतील पद: जय जय रामकृष्ण हरी ॥ ध्रु. ॥ हेचि रसायन सेवन करिर्ता, भवगद सत्वर हारी ॥ १ ॥ निगम दधिचें नवनीतचि है, सेविति शिवविधि हरी ॥॥ २ ॥ मानसिं ध्याउनि रमति जेथें, व्यास-शुकादिक भारी ॥ ३॥ चिद्धनरूप गुरु पांडुरंग, शरणागत उद्धारी ॥ ४ ॥

या पदानंतर पुढील पद म्हटले जाते.

ये सद्गुरुराया कीर्तनी ये सद्गुरुराया ॥ ध्रु. ॥ मतिमंद मी कांहींच नेणे, सांख्य अथवा न्याया ॥ १ ॥ हीन दीन परि मर्नात वाटे, इच्छा तव गुण गाया ॥ २ ॥ जनार्दन सद्गुरु ते बिनवी, निरंजनीच्या राया ॥ ३ ॥ किंवा काही हरिदास 'जय जय रामकृष्ण हरी' या पदानंतर पुढील पारंपरिक पद गातात.

बाळकृष्ण चरणि लक्ष लागो। कीर्तनसंगें रंगांत देह भागो ॥ धृ॥स्वरूपीं चिन्मय नारायणरूप घ्यावो । तन्मय होवोनी बळवंत प्रेमें गात्रो ॥१॥ सारासार बदविता वंद्य असो रे। मंगलधाम जीवन नरहरि पायो रे ॥२॥

नरहरबुवांचे हे पद अत्यंत प्रसिद्ध आहे. या पदानंतर काही बुवा त्यांना इप्सित असलेल्या देवतांचे स्तवनपर पद म्हणतात. त्यानंतर श्रोत्यांना भजन शिकविले जाते, देवांचा जयजयकार केला जातो व त्यानंतर सुर लावण्यासाठी किंचित क्षण घेऊन बुवा पूर्वरंगासाठी घेतलेल्या पदाचे गायन करतात.

नारदीय कीर्तन प्रकार.

कलिसंतरणोपनिषदात वर्णन केल्याप्रमाणे एकदा नारद मुनींनी ब्रह्म देवाना प्रश्न केला की कळीकाळातून तरुण जाण्यासाठी काय उपाय आहे त्यावर ब्रह्म देवानी “भगवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारणमात्रेण निर्धूतकलिर्भवति॥१॥ (कलिसंतरणोपनिषद्)” अर्थात, कळीकाळातून तरुण जाण्यासाठी भगवान आदिपुरूष श्री नारायणाचे नाम मात्र सर्व दोष नाहीसे करतील, असे सांगितले. पुराण काळापासून भगवंताच्या नामसंकीर्तनाला प्राधान्य दिलेले आहे. आदित्यपुरणात असे नमूद केलेले आहे की, “हरेः संकीर्तनं यस्य सर्वपातकनाशनम्। (आदित्यपुराण) “ या कीर्तनात भगवन्नामसंकीर्तनाला भक्त महत्त्व देतात. त्यामुळे पातकांचा नाश होतो.”[३]

भागवतात प्रत्येक युगात भक्तीचे मार्ग सांगितलेले आहेत. “कृते यद् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः। द्वापरे परिचर्यायां कलौ-तद्धरिकीर्तनात् ॥ (भागवत. २.३.५१)” कलियुगामध्ये सांगितलेले कीर्तनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नवविधा भक्तितीत श्रवणानंतर कीर्तन भक्तीला प्राधान्य दिलेले आहे. अशा या भक्तीमर्गाचे स्वरुप नारद मुनींच्या काळात कसे होते याचे वर्णन श्रीमद्भागवतात केलेले आहे. “प्रल्हादस्तालधारी तरलगतितया चोद्धवः कांस्यधारी। वीणाधारी सुरर्षिः स्वरकुशलतया रागकर्तार्जुनोऽभूत्। इन्द्रो वादीन्मृदङ्ग जयजयसुकराः कीर्तने ते कुमाराः । यत्राग्रे भाववक्ता सरसरचतया व्यासपुत्रों बभूव॥ (श्रीमद्भागवत) म्हणजे देवर्षी नारद, शुक सर्वत्र संचार करीत कीर्तने करायचे, नामस्मरणाचे महत्त्व लोकांना पटवून द्यायचे. कीर्तनाला आवश्यक असणाऱ्या सर्व साधनचा उपयोग करून शुकाचार्यांनी कीर्तनाला विशिष्टता प्राप्त करून दिली. कीर्तनाला आवश्यक असणारे संगीत, वक्तृत्व, नाट्य, अभ्यास या विषयीचे परिपूर्ण ज्ञान नारदांना होते. नारदांनी कीर्तनाचे शास्त्र तयार केले त्यातूनच नारदीय संप्रदाय उदयाला आला. नारदांच्या कीर्तनाचे वर्णन विविध पुराणांमधून केलेले आहे.

नारदीय कीर्तन पद्धती वेगळी आहे. या नारदीय कीर्तन प्रयोगाच्या संदर्भात ह.भ.प.विनायकबुवा भागवत यांनी समर्पक व्याख्या केलेली आहे ज्यात नारदीय कीर्तनाची सर्व वैशिष्ट्ये नमूद केलेली आहे. "वाग्वैदग्ध्यविराजितं नवनवोन्मेषार्थकाव्यान्वितम्। गीताऽऽलापकलापितं च भगवल्लीलाविलासीकृतम्।।यत्स्याद्यत्र किलावलंब्य महतां पद्यं सुबोधप्रदम् । तस्मिश्चेदुपसंहृतं भुवि वरं प्रोक्तं हरेः कीर्तनम्।। "शब्दरचना, वाक्यरचना इ. वाक्चातुर्याने शोभविलेले, नव्या नव्या अर्थाच्या कवितांनी युक्त असलेले, गाण्यांच्या तानांनी वाढविलेले, नटविलेले, भगवल्लीलेने शोभविलेले जे असेल, ज्यात साधुसंतांचे एखादे उपदेशप्रद पद प्रमाणभूत घेऊन त्यावर विवेचन संपविलेले असेल ते हरिकीर्तन श्रेष्ठ ठरते."[४]. कीर्तन हे जरी मुक्त असले तरी त्याचे एक तंत्र असते. नारदीय कीर्तनाचा प्रारंभ मंगलाचरण/नमनाने होतो. त्यात इष्टदेवतेचे, कुलदेवतेचे, ग्रामदेवतेचे स्तवन केले जाते, गुरू परंपरेचे स्मरण करून 'श्रीमन्महागणाधिपतये नमः' कीर्तनाची सुरुवात करतात. त्यानंतर श्रीगणेशाचे स्तवन केले जाते व देवी शारदेचा श्लोक म्हटला जातो. "स जयति सिंधुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम्।

वासरमणिरिव तमर्सा राशिं नाशयति विघ्नानाम् ।।

यदा लंबोदरं हन्ति सां प्रत्यूह संभवम्। तदालंवं दयालम्बे लम्बोदरपदांबुजम्।।

नमस्ते शारदे देवी सरस्वति मतिप्रदे। वस त्वं मम जिव्हाग्रे सर्वविद्याप्रदा भव।।"

देवतांचे स्मरण करून झाल्यानंतर काही बुवा झांज अथवा चिपळया घेऊन जयजयकार करतात. मंगलाचरणापूरती झांज वाजविली जाते. काहीजण मागे उभ्या असलेल्या किंवा साथीला बसलेल्या व्यक्तीकडे झांज, चिपळया देतात. त्यानंतर "जयजय राम कृष्ण हरी" या पदाने, धुमाळीने व पारंपरिक चालीने कीर्तनाला प्रारंभ केला जातो. नारदीय कीर्तनाच्या मंगलाचरणाच्या दोन भिन्न परंपरा आहेत. त्यातील गोविंद तारकाश्रमानी रचलेल्या, भगवान कृष्णाचे वर्णन असलेल्या पदाने अद्यापही कीर्तनकार मंगलाचरण म्हणतात किंवा दुसऱ्या परंपरेत शुक, व्यासादी परंपरेचा उल्लेख केलेले पद वापरले जाते. ही पदे नारदीय कीर्तनाचे मानदंड आहेत असेच मानले जाते. डॉ. पटवर्धनबुवा, कवीश्वरबुवा, काशीकरबुवा, गौतमबुबा हे पहिल्या परंपरेतील आहेत. तर नानाबुवा बडोदेकर, मुरलीधरबुवा व लक्ष्मणबुवा निजामपुरकर, वासुदेवबुवा जोशी, कवीश्वरबुवा, या कीर्तनकारांनी दुसऱ्या परंपरेचा अवलंब केला.

“पहिल्या परंपरेतील पद: जय जय रामकृष्ण हरी ॥ ध्रु. ॥ गोवर्धनधर गोपालनरत, गोकुळसंकट हारी ॥ १ ॥ - नवनीरदसम नत्रनीतप्रिय, नवलविनोदविहारी ॥ २ ॥ रावणमदहर दीनजनोद्धर, सुरवरमोचनकारी ॥ ३ ॥

दुसऱ्या परंपरेतील पद: जय जय रामकृष्ण हरी ॥ ध्रु. ॥ हेचि रसायन सेवन करिर्ता, भवगद सत्वर हारी ॥ १ ॥ निगम दधिचें नवनीतचि है, सेविति शिवविधि हरी ।॥ २ ॥ मानसिं ध्याउनि रमति जेथें, व्यास-शुकादिक भारी ॥ ३॥ चिद्धनरूप गुरु पांडुरंग, शरणागत उद्धारी ॥ ४ ॥

या पदानंतर पुढील पद म्हटले जाते.

ये सद्‌गुरुराया कीर्तनी ये सद्‌गुरुराया ॥ ध्रु. ॥ मतिमंद मी कांहींच नेणे, सांख्य अथवा न्याया ॥ १ ॥ हीन दीन परि मर्नात वाटे, इच्छा तव गुण गाया ॥ २ ॥ जनार्दन सद्‌गुरु ते बिनवी, निरंजनीच्या राया ॥ ३ ॥ किंवा काही हरिदास ‘जय जय रामकृष्ण हरी’ या पदानंतर पुढील पारंपरिक पद गातात.

बाळकृष्ण चरणि लक्ष लागो। कीर्तनसंगें रंगांत देह भागो ॥ धृ॥स्वरूपीं चिन्मय नारायणरूप घ्यावो । तन्मय होवोनी बळवंत प्रेमें गात्रो ॥१॥ सारासार बदविता वंद्य असो रे। मंगलधाम जीवन नरहरि पायो रे ॥२॥

नरहरबुवांचे हे पद अत्यंत प्रसिद्ध आहे. या पदानंतर काही बुवा त्यांना इप्सित असलेल्या देवतांचे स्तवनपर पद म्हणतात. त्यानंतर श्रोत्यांना भजन शिकविले जाते, देवांचा जयजयकार केला जातो व त्यानंतर सुर लावण्यासाठी किंचित क्षण घेऊन बुवा पूर्वरंगासाठी घेतलेल्या पदाचे गायन करतात. अभंग व पदाचे, स्वकृत रचनाही गायन म्हणजे इथून कीर्तनाला सुरुवात होते. पूर्वरंगामध्ये संतांचेच अभंग विपुल प्रमाणात वापरले जातात. संत तुकाराम महाराजांचे अभंग किंवा वचने कोणताही विषय प्रतिपादन करण्यापूर्वी वापरले जातात. त्यानंतर मध्वमुनीश्वर, अमृतराय, उद्धवचिद्धन, आनंदतनप, रंगनाथ- स्वामी, सोहिरोबानाथ, सूरदास, तुलसीदास, मीरा, नरसी मेहता, जयदेव यांची पदे निरूपणासाठी घेतली जातात. शास्त्र वचनांचे संदर्भ वापरले जातात त्यातून कीर्तनकारांची व्युत्पन्नता दिसून येते. ज्यावेळी विषय सोडून, चुटके, विनोद किंवा एखादा दृष्टांत, प्रसंग इत्यादी बाबी सांगतात तेव्हा पुन्हा विषयावर येताना गजर करतात. तत्त्वज्ञान व भक्ती हेच विषय प्रामुख्याने पूर्वरंगाचा गाभा असतो. यातून लोकशिक्षण, संस्कार, इत्यादी कार्य साधले जायचे. पूर्वरंगाची सांगता झाल्यानंतर विश्वस्त मंडळी किंवा इतर कोणी बुवांना बुक्का लावण्यासाठी येतात. कोणी प्रतिष्ठित व्यक्ती किंवा कीर्तनकार, ज्ञानी, वयोवृध्द मंडळी असतील तर त्यांना आधी बुक्का लावला

जातो. त्यानंतर बुवा तबकातील बुक्का स्वतः हातातून घेऊन देवासमोर उधळतात, हार घालणाऱ्या व्यक्तीला बुक्का लावतात व त्यानंतर बुवांना हार घातला जातो. त्यानंतर सामुदायिक भजन म्हटले जाते. "बोलाऽऽ पुंडलिका वरदे हाऽऽरी विठ्ठल." "सीताकांत स्मरण जयजयराम", "राजाधिराज रामचंद्र महाराज की जय." "जय जय रघुवीर समर्थ." गजर होतो, भजन संपल्यानंतर, पेटीवाल्या बुवांना पद म्हणण्यास सांगतात व त्यानंतर पुन्हा देवतेचे वाराप्रमाणे, ज्या देवतेचे मंदिर असेल त्यानुसार भजन होते, गजर होतो व उत्तररंगाला प्रारंभ होतो. जुन्या पठडीतील बुवा सरळ पद्धतीने आख्यान सांगायचे तर आता नवीन पठडीतील बुवा नाट्यात्मक संवाद वापरून किंवा एखादे पद, आर्या, साकी, दिंडी इत्यादी काव्य प्रकारांचा वापर करून आख्यानाची सुरुवात केली जाते. आख्यानाचे सूत्र पूर्वरंगाशी मिळते जुळते असणे आवश्यक आहे. कथानकाची निवड, प्रभाव यात आख्याने यश असते. व्यक्तिकेंद्री आख्याने देखील कीर्तनातून मांडली जातात. उत्तररंग व पूर्वरंग यांची एकमेकांशी सांगड घालून शेवटी बुवा मूळ पदावर येतात व भैरवी रागात पद म्हणून झाल्यानंतर देवाकडे कीर्तनाचे पसायदान मागितले जाते. "हेचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा ॥ गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी ॥ न लगे मुक्ति धन संपदा। संतसंग देई सदा ॥ तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी ॥" अथवा "झाले कीर्तन शेवट गोड करा। मनी धरा श्रीजानकीच्या वरा ॥ कीर्तनरंगी वाजवा कर टाळी। नामघोषे पातका होय होळी ॥ येथुन कल्याण साम्राज्य सुखराशी। अवघे उठा ओवाळा राघवासी"॥[५]( ११२ नाचू). काही बुवा कोणत्याही सांप्रदायिक परंपरेनुसार अभंग म्हणतात, एखादा श्लोक सर्वसमावेत म्हणतात, प्रार्थना म्हणून झाली की जयजयकार करतात व कीर्तन संपते. ते झाल्यानंतर देवांच्या आरत्या म्हटल्या जातात, काहीजण तबकात यथाशक्ती पैसे टाकतात. बुवा देवाला साष्टांग नमस्कार करून श्रोत्यांमध्ये जाऊन बसतात व अशा रीतीने हा नारदीय कीर्तन प्रकार पूर्ण होतो.

नारदीय व वारकरी कीर्तन प्रकारातील साम्यांचा विचार केला तर त्यात असे दिसून येईल की, पुराणकाळातील नारदीय कीर्तन पद्धती ही मुनिवर्य नारदानी प्रल्हादादींच्या साथीने प्रयोग करून केले तसेच वारकरी कीर्तनातही प्रकारच्या बाबतीत दिसते. दोन्ही कीर्तनात भगवंताचे गुवर्णन केलेले आहे. लोकांना भक्तिमार्गाचे मार्गदर्शन केले जाते. कीर्तनाचे उद्देश्य व प्रयोजन एक असते. या दोंहोतील काव्य प्रकारांच्या बाबतीत असे दिसते की, त्यात संताचे अभंग, ओव्या, श्लोक याचा वापर असतो. नारदीय कीर्तनातील पूर्वरंग व वारकरी कीर्तनातील निरुपणाचे विषय वेदांत, तत्त्वज्ञान, दृष्टांत, शस्त्रे, उपनिषदे, भक्ती इत्यादी स्वरूपाचे असतात व त्यावर विवेचन केले जाते. नारदीय व वारकरी कीर्तनात

संतांनी प्रतिपदित केलेल्या उपदेशांचे यथोचित मार्गदर्शन केले जाते. दोन्ही कीर्तनात चिपळ्या, झांज, तबला, संवादिनी, टाळ, अशा प्रकारच्या साधनांचा वापर केला जातो.

या दोन्ही प्रकारांतील भेदांचा विचार करता, नारदीय व वारकरी कीर्तनात सादरीकरण व प्रयोग पद्धतीत वेगळेपणा आहे. नारदीय व वारकरी कीर्तन पद्धतीत पोशाखात वेगळेपणा आहे. मध्ययुगीन काळात दोन्ही कीर्तन प्रकार विकसित झाले. संत एकनाथ, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज आदींनी वारकरी कीर्तनाचा ढाचा वापरून विषयात वैविध्यता आणली परंतु अर्वाचीन काळात वारकरी कीर्तनकारांनी अन्य विषयांना फाटा दिला नाही. काही विषयांना स्पर्श केला. निरूपणाला केंद्रस्थानी ठेवून भक्ती व संतांचा उपदेश याच विषयाला अनुसरून कीर्तने केली जातात. नारदीय कीर्तनाचे स्वरूप कालांतराने बदलत गेले. त्यात राजकारण, सामाजिक, संस्कृतिक इत्यादी विषयांचा समावेश होऊ लागला. ईश्वरभक्ती, नाम महिमा, याबरोबर समाज प्रबोधन, लोकरंजन अशा गोष्टींचा विचारही कीर्तनात होऊ लागला. वारकरी कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग या दोन्हीत भेद नसतात. ते निरूपणच असते, नारदीय कीर्तनात पूर्वरंगांमध्ये तत्त्वज्ञान सांगितले जाते व उत्तररंग या भागात पूर्वरंगातील विवेचनावर आधारित पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक इत्यादी प्रकारची आख्याने सांगितली जातात. वारकरी कीर्तन प्रयोगाचे कडक नियम असतात तसे नारदीय कीर्तनाचे नसतात. नारदीय कीर्तनाची शैली स्वतंत्र असते.

नारदीय व वारकरी कीर्तन प्रकारातील साम्यांचा विचार केला तर त्यात असे दिसून येईल की, पुराणकाळातील नारदीय कीर्तन पद्धती ही मुनिवर्य नारदानी प्रल्हादादींच्या साथीने प्रयोग करून केले तसेच वारकरी कीर्तनातही प्रकारच्या बाबतीत दिसते. दोन्ही कीर्तनात भगवंताचे गुवर्णन केलेले आहे. लोकांना भक्तिमार्गाचे मार्गदर्शन केले जाते. कीर्तनाचे उद्देश्य व प्रयोजन एक असते. या दोंहोतील काव्य प्रकारांच्या बाबतीत असे दिसते की, त्यात संताचे अभंग, ओव्या, श्लोक याचा वापर असतो. नारदीय कीर्तनातील पूर्वरंग व वारकरी कीर्तनातील निरुपणाचे विषय वेदांत, तत्त्वज्ञान, दृष्टांत, शस्त्रे, उपनिषदे, भक्ती इत्यादी स्वरूपाचे असतात व त्यावर विवेचन केले जाते. नारदीय व वारकरी कीर्तनात संतांनी प्रतिपदित केलेल्या उपदेशांचे यथोचित मार्गदर्शन केले जाते. दोन्ही कीर्तनात चिपळ्या, झांज, तबला, संवादिनी, टाळ, अशा प्रकारच्या साधनांचा वापर केला जातो.

या दोन्ही प्रकारांतील भेदांचा विचार करता, नारदीय व वारकरी कीर्तनात सादरीकरण व प्रयोग पद्धतीत वेगळेपणा आहे. नारदीय व वारकरी कीर्तन पद्धतीत पोशाखात वेगळेपणा आहे. मध्ययुगीन काळात दोन्ही कीर्तन प्रकार विकसित झाले. संत एकनाथ, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज आदींनी वारकरी कीर्तनाचा ढाचा वापरून विषयात वैविध्यता आणली परंतु अर्वाचीन काळात वारकरी कीर्तनकारांनी अन्य विषयांना फाटा दिला नाही. काही विषयांना स्पर्श केला. निरूपणाला केंद्रस्थानी ठेवून भक्ती व संतांचा उपदेश याच विषयाला अनुसरून कीर्तने केली जातात. नारदीय कीर्तनाचे स्वरूप कालांतराने बदलत गेले. त्यात राजकारण, सामाजिक, संस्कृतिक इत्यादी विषयांचा समावेश होऊ लागला. ईश्वरभक्ती, नाम महिमा, याबरोबर समाज प्रबोधन, लोकरंजन अशा गोष्टींचा विचारही कीर्तनात होऊ लागला. वारकरी कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग या दोन्हीत भेद नसतात. ते निरूपणच असते, नारदीय कीर्तनात पूर्वरंगांमध्ये तत्त्वज्ञान सांगितले जाते व उत्तररंग या भागात पूर्वरंगातील विवेचनावर आधारित पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक इत्यादी प्रकारची आख्याने सांगितली जातात. वारकरी कीर्तन प्रयोगाचे कडक नियम असतात तसे नारदीय कीर्तनाचे नसतात. नारदीय कीर्तनाची शैली स्वतंत्र असते. नारदीय कीर्तन प्रयोगामध्ये ज्याप्रमाणे आख्यान लावणे हा भाग असतो तो वारकरी कीर्तनामध्ये आढळत नाही. वारकरी कीर्तनात परमार्थ विवेचन, हरिभक्ती या सूत्रांचा विचार पूर्वार्ध व उत्तरार्ध यात केला जातो. परंतु उत्तरार्धात आख्यान सांगून विषयाचे विवेचन केले जात नाही, पूर्वार्धात मांडलेल्या प्रश्नांचा उहापोह केला जातो. वारकरी कीर्तन परंपरेत विष्णुबुवा जोग यांना अग्रमान मानले जाते कारण त्यांनी वारकरी कीर्तनाला तर्कानुमानाचे शास्त्रीय वळण लावले. नारदीय कीर्तन प्रयोगात उत्तररंगांमध्ये आख्यान सांगून पूर्वरंगातील तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण दिले जाते. परमार्थ ज्ञान, हरिभक्ती, प्रबोधन या विषयांना केंद्रस्थानी ठेवून उत्तररंगांची निवड केली जाते. पूर्वरंगांमध्ये मांडलेले विचार, तत्त्वज्ञान यांची सांगड आख्यानाशी घालून उपदेश केला जातो.

**समारोप**.

या प्रकरणात वारकरी व नारदीय कीर्तन परंपरा यांची तुलना केलेली आहे. नारदीय कीर्तन परंपरेचे मूळ महर्षी नारदांपासून आहे तर वारकरी कीर्तनाचे आद्य प्रणेते म्हणून संत नामदेव महाराजांना मानतात. परंपरेतील साम्य भेदांचा विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे नारदीय व वारकरी कीर्तन प्रकारांतील साम्य भेद दर्शविलेला आहे. साम्य भेदांच्या माध्यमातून या दोन्ही परंपरांची व प्रकारांची स्वतंत्र वैशिष्ट्ये दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या दोन्हींचा तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास केलेला आहे. प्रत्येक कीर्तन पद्धतीत असणारी सादरीकरणाच्या अनुषंगाने, पोषाखाच्या अनुषंगाने व कीर्तनातून प्रतीत होणारा आशय-विषय यांच्या दृष्टिकोनातून ही तुलना केलेली आहे. नारदीय व वारकरी कीर्तनातून साध्य होणार उद्देश जरी एकच असला तरी त्याची अभिव्यक्ती भिन्न असते. या तुलनात्मक अभ्यासातून दोन्हीतील भिन्नता स्पष्ट होते.

**निष्कर्ष**

- विद्यमान प्रचलित असलेली नारदीय कीर्तन परंपरा १७व्या शतकापासून उदयाला आली. वारकरी कीर्तन परंपरा १३व्या शतकापासून आहे.
- नारदीय कीर्तन परंपरेचा प्राचीन काळापासून विचार केला तर प्राचीन स्वरूप समजते.
- महाराष्ट्रात व विविध खेड्यापाड्यात वारकरी कीर्तन हे लोकाभिमुख आहे असे दिसते.
- वारकरी कीर्तना संदर्भात त्याचा प्रयोगाच्या दृष्टिकोनातून विचार केला, तर सर्वतोमुखी असणारे संत वाङ्मय हे वारकरी कीर्तनाचे प्राणभूत व आधारभूत तत्त्व आहे.
- संत वाङ्मय व संतांच्या वचनावर वारकरी कीर्तनाचे निरूपण आधारलेले असते.
- वारकरी कीर्तनात साथीला टाळकरी असल्यामुळे सामूहिकतेची भावना या वारकरी कीर्तनातून उत्पन्न होते.
- वारकरी कीर्तन पद्धती ही नाराजी कीर्तन पद्धतीपेक्षा परंपरेनुसार व प्रकारानुसार भिन्न आहे.
- या दोन्ही परंपरांचे स्वतंत्र असे संकेत व दंडक आहेत. उदा. वारकरी कीर्तनातील काही फळांवर त्याच फळातील कीर्तनकार कीर्तन करू शकतात. नारदीय कीर्तनात स्वकृत पदांचा शक्यतो वापर करू नये असा संकेत आहे.
- ज्याप्रमाणे नारदीय कीर्तनाची पठडी आहे, त्याप्रमाणे वारकरी कीर्तनाचे फड आहेत.
- नारदीय किर्तनामध्ये काही नामवंत कीर्तनकारांनी किर्तन प्रयोगात विनोदाला वेगळेच स्थान दिलेले आहे. उदा. ह.भ.प.वै. गोविंदस्वामी आफळे, विनोदमूर्ती ह.भ.प.वै.वाडेकरबुवा, ह.भ.प.वै.गोखले बुवा इत्यादी.
- वारकरी कीर्तनामध्ये संत एकनाथांनी, तुकाराम महाराजांनी पारंपरिक चौकटीला फाटा दिला व कीर्तनात विविध बदल केले.
- नारदीय कीर्तनामध्ये गोविंदतारकाश्रम यांची स्वतंत्र पठडी तयार झाली व त्यांनी नारदीय कीर्तनाचा ढाचा तयार केला.

- वारकरी कीर्तनामधून गाडगेमहाराजादी कीर्तनकारांनी खेड्यापाड्यातील बहुजनांपर्यंत ज्ञान पोहचविण्यासाठी त्यांच्याच भाषेचा वापर केला.
- नारदीय कीर्तनाने सर्वमान्य भाषेचा वापर करून कीर्तनातून समाज प्रबोधन व भक्ती मार्ग साधला.
- वारकरी कीर्तन परंपरा ही भक्तीकेंद्रित आहे. त्याच स्वकृत पद्य रचना नसते.
- नारदीय कीर्तन परंपरा ही देखील भक्ती केंद्रित आहेच त्याशिवाय या कीर्तनात स्वकृत पद्यरचना वापरल्या जातात.
- वारकरी कीर्तनाचा ढाचा निरूपणावर आधारलेला आहे तर नारदीय कीर्तनाचा ढाचा पूर्वरंग व उत्तररंग यावर आधारित आहे.
- वारकऱ्यांनी वारकरी म्हणून जे काही नियम पाळायचे आहेत त्यात कीर्तन श्रवण केलेच पाहिजे असा त्यांचा नियम आहे. नारदीय कीर्तनात असा नियम नाही परंतु कीर्तनकार कीर्तन श्रवणातून, कीर्तनाची गोडी लागून कीर्तन शिकण्यास प्रवृत्त होतात.
- वारकरी कीर्तन प्रयोगामध्ये काटकर जोग महाराजांनी आधुनिक वर्तमानाची जोड दिली, बंकट स्वामींनी वेगळ्या धरतीचे निरूपण केले. साखरे महाराजांनी अध्यात्मिक, वेदांत प्रधान, संकल्पनात्मक शैलीचे निरूपण केले. धुंडा महाराजांनी भक्ती आणि सांस्कृतिक इत्यादी विषयांचा समावेश केला.
- नारदीय कीर्तनामध्ये गोविंदतारकाश्रम महाराजांपासून अर्वाचीन नारदीय कीर्तन पद्धती निर्माण झाली व त्यानंतर कराडकर बुवा, ढोलेबुवा, आफळे बुवा, निजामपूरकर बुवा इत्यादी कीर्तनकारांनी आपापल्या परीने कीर्तनात वैविध्य आणले.
- वारकरी कीर्तनामध्ये पूर्वरंग, उत्तररंग असे भाग नसतात. त्यात केवळ अभंगाच्या आधारे निरूपण केले जाते. परंतु नारदीय कीर्तनामध्ये पूर्वरंग व उत्तररंग असे भाग असतात. पूर्वरंगातील तत्त्वज्ञानावर आधारित उत्तररंगांमध्ये पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक इत्यादी प्रकारची आख्याने सांगितली जातात.
- वारकरी कीर्तन प्रयोगाचे काही कडक नियम असतात. तसेच नारदीय कीर्तनात नसतात. नारदीय कीर्तनामध्ये काही प्रमाणात तरी स्वातंत्र्य असते.

- नारदीय कीर्तनामध्ये उत्तर रंगात आख्यान सांगितल्यामुळे ही पद्धती वारकरी कीर्तन पद्धतीपेक्षा अधिक परिणामकारक ठरते.
- जुन्या पठडीतील काही कीर्तनकार हरिदास हे आख्यानाचा प्रारंभ करताना सरळ पद्धतीने करायचे. परंतु नव्या पठडीतील कीर्तनकार आख्यान लावताना, कमरेला उपरणे बांधतात, नाट्यात्म संवादाचा वापर करतात.
- नारदीय कीर्तनाची प्राचीनता वेदोपनिषद काळापासून अस्तित्वात आहे.
- नारदीय कीर्तनपरंपरेत स्वतंत्र आख्यानांची निर्मिती करता येते. तसे वारकरी कीर्तनात करता येत नाही कारण वारकरी कीर्तनात त्यांनी सांगितले जात नाहीत.
- वारकरी कीर्तन पद्धतीत ईश्वर संकीर्तन हेच मुख्य सूत्र असले तरी इतर संप्रदायातील लोकांच्या मतांचा आढावा निरुपणात घेतला जात नाही नारदीय कीर्तनात इतर लोकांच्या मतांचा आढावा घेण्याचे स्वातंत्र्य असते.
- वारकरी कीर्तन संप्रदायामध्ये मोठ्या लोकांचे चरित्र सांगितले जात नाही तर दृष्टांत स्वरूप किंवा प्रसंगोत्पात वर्णन केले जाते. नारदीय कीर्तनपरंपरेत मोठ्या माणसांची चरित्रे आख्यान स्वरूपात सांगितली जातात.
- नारदीय व वारकरी कीर्तन प्रयोग पद्धती जरी भिन्न असल्या तरी त्यांचे मुख्य सूत्र हे लोकोपदेश व भक्तिमार्गाचे ज्ञान लोकांना करून देणे हेच उद्दिष्ट असते.

**संदर्भ.**

१. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र.५.

२. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र.९६.

३. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र.५.

४. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र.९६.

५. पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी कीर्तनसंस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ.१९८०, पृ. क्र.११२.

**प्रकरण ३. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा इतिहास.**

प्रस्तावना.

गोमंतकाचा राजकीय इतिहास लक्षात घेता, भिन्नभिन्न सांस्कृतिक प्रवाह गोमंतकात रूढ झाले. इसवीसन पूर्व इतिहासाचे पुरावे नसल्याने सन पूर्व दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकातील मौर्य राजवट इतिहासापासून गोमंतकातील राजकीय संदर्भातील इतिहास सापडतो. त्यानंतर पहिल्या शतकात सातवाहन अथवा आंध्रभृत्य, दुसऱ्या शतकात अमीरांची राजवट, चौथ्या शतकात वनवासी लोकांचे अधिपत्य व सहाव्या शतकाचा मध्य ते ७५३ पर्यंत चालुक्यांचे राज्य होते. दहाव्या शतकाच्या अखेरपर्यंत राष्ट्रकूटांच्या अंमलाखाली गोवा होता. त्यानंतर विजयनगरची सत्ता गोव्यावर होती. कदंब राजवट, आदिलशाही व त्यानंतर १५१० ते १९६१ पर्यंत पोर्तुगीजांच्या जुलमाखाली गोमंतक प्रदेश होता. हा सर्व राजकीय इतिहास, सांस्कृतिक अभिसरणाची साक्ष देतो. या सर्व राजवटींनी सांस्कृतिक प्रवाह, लोककला प्रकार गोव्यात आणले. आदिलशाही सोडल्यास गोव्यात हिंदू राज्यकर्ते होते. त्यांच्या जीवनात या संस्कृती प्रवाहांचा व कलांचा सहजरित्या समावेश झाला. पोर्तुगीजांमुळे धार्मिक अत्याचाराचे प्रमाण वाढत होते. पोर्तुगीजांनी केलेले सर्व प्रकारचे अत्याचार सहन करून सुद्धा लोकसंस्कृती, लोकपरंपरा, चालीरीती यांचे जतन गोवेकरांनी केले.

अनेक प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक प्रकारांवर पोर्तुगीजांनी बंदी आणली होती. परंतु एवढ्या अनन्वित अत्याचारानंतरही गोमंतकातील लोकांनी चालीरीती, धर्म, परंपरा, रूढी जोपासल्या होत्या. सर्व प्रकारात कीर्तन परंपरेचे स्वतंत्र अस्तित्व दिसून येते. या प्रकरणातून गोमंतकातील कीर्तन परंपरेविषयी अभ्यास केलेला आहे. गोव्यामध्ये अनेक उत्सव प्रसंगी, विविध मंदिरांमधून कीर्तने केली जातात. सुरुवातीच्या कालखंडात गोव्याबाहेरून कीर्तनकार आमंत्रित केले जायचे, त्यानंतर गोव्यामध्येच कीर्तनकार तयार होऊ लागले. प्रारंभी गोमंतकात मराठी कीर्तने होत होती, त्यानंतर कोंकणी कीर्तनेही होऊ लागली.

**३.१. गोमंतकातील कीर्तन परंपरेचा इतिहास.**

गोमंतकातील राजवटीचा विचार करता, त्या इतिहासात कीर्तन संबंधीचा उल्लेख आढळत नाही. परंतु काही कीर्तनकारांशी चर्चा केल्यानंतर असे समजले की, जेवढी जुनी मंदिरे गोव्यात आहे तेवढी जुनी कीर्तन परंपरा या ठिकाणी आहे. गोमंतकामध्ये साडेचारशे वर्षे पोर्तुगीजांचे राज्य होते. काही तालुक्यांमध्ये त्यांचे सर्वप्रथम प्रस्थ वाढले, जसे की तिसवडी तालुका, बार्देश, सालसेत . परंतु ज्या काही भागांत त्याची सत्ता नव्हती त्या ठिकाणी धार्मिक कृत्ये घडत होती. गावागावांत पूजन, भजन, अर्चन, कीर्तन, पुराणांचे वाचन चालूच होते. त्यांच्या अनन्वित छळाने गोव्यातील लोक त्रस्त होते. परंतु त्यांनी आपल्या धार्मिक कृत्याला धरून ठेवले. पोर्तुगीजांनी धर्मांतरण सुरू केले. यामुळे धार्मिक सण, उत्सव, समारंभ बंद पाडण्यात आले. मठ-मंदिरे उध्वस्त होत होती. देवी-देवतांच्या मूर्तींचा विध्वंस केला गेला. हे सर्व घडत असताना कीर्तनाच्या माध्यमातून सशक्त क्रांती घडविण्यात आली होती. गोमंतकातील कीर्तनाची प्राचीनता निश्चितपणे सांगणे अशक्य आहे. परंतु पोर्तुगीजांच्या अत्याचाराला, धर्मांतराला सामोरे जात गोव्यात संतांची परंपरा होती. पंधराव्या शतकातील कृष्णदास शामा यांच्यापासून सुरू असलेली ही संत परंपरा, माशेलातील महेश्वरभट्ट सुखठणकर, संत कवी सोहिरोबानाथ थांबिये, कृष्णंभट्ट बांदकर, श्रीब्रह्मानंदाचार्य सांगितली जाते.

इ.स.१५२६ मध्ये कृष्णदास शामांनी श्रीकृष्णचरित्रकथा ग्रंथ लिहिला. या सर्वांतून असे दिसून येते की गोव्यात पूर्वी कीर्तनादी भक्ती प्रचलित असावी. त्याकाळी अनेक कीर्तनकार गोव्यात असण्याचा संभव आहे परंतु त्यांची नावे मिळत नाहीत.

साधारणतः १९ व्या शतकापासूनची कीर्तन परंपरा गोमंतकातील कीर्तनकारांचे दाखले देते. गोमंतकातील आद्य कीर्तनकारांचा मान ह.भ.प.वै. कृष्णंभट्ट बांदकर यांना जातो. कृष्णंभट्ट बांदकर यांच्या चरित्रात असा उल्लेख आढळतो की त्यांचे वडीलही कीर्तनकार होते परंतु नक्की कालक्रम दिलेला नाही. त्यानंतर ह.भ.प.वै. कृष्णभट्ट कथने यांचा उल्लेख गोमंतकातील कीर्तन परंपरेत केला जातो. पोर्तुगीजांचे राज्य असतानाही कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणून धर्म प्रचार व क्रांती प्रसार करण्यासाठी कीर्तनाचा प्रभावी माध्यम म्हणून उपयोग केला गेला. १९व्या, २०व्या व २१ व्या शतकात कीर्तन परंपरा अधिकाधिक समृद्ध होत गेली. गोमंतकीय कीर्तनकारांचा विचार

करताना १९व्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक कीर्तनकार झालेले होते परंतु त्याचे उल्लेख आढळतात नाही. आदिलशाही, पोर्तुगीज राजवटीत कीर्तन, उत्सव परंपरा अखंडित चालू होती. गोव्यात अनेक कीर्तनकार बाहेरून यायचे. त्यानंतर पोर्तुगीजांनी सीमा बंद केल्या, पासपोर्ट लागत असल्याने गोव्यातून व गोव्याबाहेरून कीर्तनकारांचे येणे बंद झाले. त्यातही काही कीर्तनकार कीर्तनाच्या कार्यक्रमांसाठी गोव्यात तसेच गोव्यामध्ये ये-जा करायचे. त्यावेळी स्व. चिंतुबुवा गोखले, काशीकरबुवा, पटवर्धनबुवा, निजामपूरकरबुवा, कोल्हटकरबुवा, कान्हारे, राशिनकर, मुकुंदबुवा भागवत असे कीर्तनकार गोव्यात उत्सवाच्या निमित्ताने यायचे. पोर्तुगीजांच्या जुलूमाखाली असलेल्या गोमंतकाला क्रांतीची विचार बीजे शिवोलीतील जीवन्मुक्त महाराजांनी कीर्तनाद्वारे श्रोत्यांच्या मनात रूजविली. त्यांनी आपल्या कीर्तनातून अंध:श्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती त्याचबरोबर मठात घेतल्या जाणाऱ्या बैठकांतून क्रांतीविरांना प्रेरणा देण्याचे कार्य केले. १९व्या शतकात, ह.भ.प.कै.दत्तात्रय विष्णू सिद्धये, ह.भ.प.कै. विष्णू दत्तात्रय सिद्धये, १९व्या शतकाच्या मध्यात ह.भ.प.कै. गजानन विष्णू सिद्धये. त्यानंतर २०व्या शतकात ह.भ.प.कै.बाळूबुवा अभिषेकी, ह.भ.प.कै. बाळूबुवा पुराणिक, ह.भ.प. कै. लक्ष्मणबुवा जोग, चिदंबर संप्रदायाचे ह.भ.प.कै. पांडुरंग जोशी, ह.भ.प.कै. गजाननबुवा फडके, ह.भ.प.कै. पांडुरंग महादेव निगळ्ये, ह.भ.प.कै. गणपती बुवा दांडेकर, ह.भ.प.कै. हरिभाऊ जोग, ह.भ.प.कै. सखारामशास्त्री करंडे, ह.भ.प. कै. महादेवशास्त्री सोनशीकर, ह.भ.प.कै. गोविंदबुवा जोतकर, ह.भ.प.कै.भिकूबुवा बर्वे, ह.भ.प.कै.श्रीपादबुवा आपटे, ह.भ.प.कै. केशवबुवा पत्की, ह.भ.प. कै.सीतारामबुवा जोग, ह.भ.प.कै. विष्णुबुवा ताम्हणकर, ह.भ.प.कै. नारायणबुवा कसाळीकर, ह.भ.प.कै. सीताराम बर्वे, ह.भ.प.कै. लक्ष्मणबुवा बर्वे, ह.भ.प.कै. व्यंकटेश देसाई, ह.भ.प.कै. रेगेबुवा, ह.भ.प.कै. केशव अनंत जोशी उर्फ भाऊभट, ह.भ.प.कै.कीर्तनसम्राज्ञी राधाबाई कामत, ह.भ.प.कै. आशाताई फडके, ह.भ.प.कै. शंकरशास्त्री घाटे, ह.भ.प.कै. आबाजी पणशीकर, ह.भ.प.कै. अनंतबुवा जोग, ह.भ.प.कै. गजानन शंकर सामंत, ह.भ.प.कै. काशिनाथ रामचंद्र बर्वे, ह.भ.प.कै. दामोदरबुवा केळकर, ह.भ.प.कै. वासुदेव लक्ष्मण वझे, ह.भ.प.कै. नारायणशास्त्री महाले, ह.भ.प.कै. गोविंदबुवा पुंडलिक पित्रे, ह.भ.प.कै. अनंत गणेश ठाकूर, ह.भ.प.कै. इंदिराबाई अनंत चितळे, ह.भ.प.कै. नारायणबुवा बर्वे, ह.भ.प. मुकुंदराजबुवा मडगावकर, ह.भ.प. विनायक विष्णू खेडेकर, ह.भ.प. गोपाळबुवा दामले, ह.भ.प.कै. नारायणबुवा उपाध्ये, ह.भ.प.वासुदेवबुवा सिद्धये, ह.भ.प.भालचंद्रबुवा सिद्धये(सिद्धयेंच्या ४ पिढ्या कीर्तनात आहेत अशी माहिती मिळाली.), ह.भ.प.श्री. मनोहरबुवा आमशेकर, ह.भ.प.श्री. विवेकबुवा जोशी,

ह.भ.प.श्री.उद्धवबुवा जावडेकर, ह.भ.प. श्री. सुहास वझे, ह.भ.प. श्री. संजय व्यास, ह.भ.प. श्री. विष्णू शेटगावकर, ह.भ.प. श्री. नारायणबुवा सामंत, ह.भ.प.. श्री. चंद्रदास जोशी, ह.भ.प. विश्वनाथ मराठे, ह.भ.प. श्री. साईदास आपटे, ह.भ.प.श्री. रामकृष्ण गर्दे, ह.भ.प.श्री. गुरुदास नारायण सुतार, ह.भ.प. वै. सूर्यकांत जोग, ह.भ.प. श्री. अभय जोग, ह.भ.प. श्री. केशवबुवा शिवडेकर, ह.भ.प. श्री. गजाननबुवा नाईक, ह.भ.प. श्री. लक्ष्मण कृष्ण पित्रे, ह.भ.प. श्री. दत्तगुरू कृष्ण अभ्यंकर, ह.भ.प. श्री. दामोदर बुवा च्यारी, ह.भ.प. श्री. दत्तात्रेय विश्वनाथ उर्फ नानू अभिषेकी, ह.भ.प.सौ. वंदना प्रदीप जोशी, ह.भ.प. श्री. देवेंद्र भास्कर साठे आदी कीर्तनकारांनी गोव्यात कीर्तन परंपरा सुरू ठेवली. यातील कीर्तनकार १९व्या, २०व्या तसेच २१व्या शतकातील आहे.

यातील काही कीर्तनकारांनी गोव्याबाहेरील विद्वान कीर्तनकारांकडून कीर्तनाची दीक्षा घेतली. गोमंतकात कीर्तनाची परंपरा अखंडित सुरू रहावी या उद्देश्याने कीर्तनाच्या शिक्षणाची सोय गोमंतकात करण्यात आली. गोव्यातील ढवळी भागात कीर्तन विद्यालयाची स्थापना प्रकाशबुवा मुळे यांनी केली. त्यात ह.भ.प.कै. रामचंद्रबुवा कऱ्हाडकर बुवा, ह.भ.प.कै.डॉ.अनंतरावबुवा मेहंदळे असे कीर्तनकार प्राचार्य, गुरू म्हणून कार्यरत होते. ह.भ.प.कै.डॉ.अनंतराव मेहंदळे बुवांच्या निधनानंतर कीर्तन विद्यालय बंद पडले. परंतु त्यातून जे कीर्तनकार घडले त्यांनी कीर्तने चालूच ठेवली. जे कीर्तनकार हयात आहेत ते आजपर्यंत ही कीर्तनाची परंपरा जोपासतात व पुढील पिढीलाही कीर्तन शिकवितात. ह.भ.प. सुहासबुवा वझे यांनी कीर्तन विद्यालय चालविण्याची परंपरा सुरू ठेवली व कीर्तन विद्यालय स्थापन करून अनेक बाल, युवा कीर्तनकार ते घडवीत आहे. ह.भ.प. विवेकबुवा जोशी व ह.भ.प. उदयबुवा फडके हे आबाल वृद्धांना विनामूल्य कीर्तनाचे प्रशिक्षण देत आहे. विविध कीर्तनाचे उपक्रम, अभ्यासक्रम, परीक्षा, वर्ग घेऊन ते भावी कीर्तनकारांची पिढी तयार करत आहे. त्याचप्रमाणे ह.भ.प. दामोदरबुवा च्यारी यांनी तपोभूमी, कुंडई याठिकाणी कीर्तनाचे विद्यालय चालविले.

सन १९७६ सालात, कवळे येथे अखिल भारतीय कीर्तनकार स्नेहसंमेलन झाले होते त्यात काही कीर्तनकारांनी भाग घेतला होता परंतु संख्या कमी असल्याने कीर्तनकारांना कार्यक्रमात कीर्तन सादर करण्यासाठी संधी मिळाली नाही या गोष्टीचा विचार करून कै.वा.ल.वझेबुवा यांनी गोमंतकातील कीर्तनकारांचे संमेलन भरवायचे ठरवले त्यात कारवारचे, बाबा कर्वे यांनी स्वतः व इतर कारवार भागातील कीर्तनकारांनीही संमेलनात भाग घेण्याविषयीची इच्छा व्यक्त केली व त्यातून गोमंतकात कीर्तन संमेलने सुरू झाले.

त्याच दरम्यान कपिलेश्वरी रामदास प्रतिष्ठान तर्फे कीर्तन विद्यालय कपिलेश्वरीच्या मंदिर अग्रशाळेत सुरू झाले त्या ठिकाणी ह.भ.प. रामभाऊ कराडकर यांनी कीर्तन विद्यालयाच्या माध्यमातून तरुण कीर्तनकारांना मार्गदर्शन केले त्यात कै. सूर्यकांत जोग, कै. रामदास मराठे, श्री. विष्णू शेटगावकर, श्री. शामराव सामंत, श्री रामकृष्ण गर्दे, श्री केशव शिवडेकर, असे कीर्तनकार होते. ह.भ.प कै. अनंतबुवा मेहंदळे यांनी कीर्तन विद्यालय चालविले त्यात श्री मनोहरबुवा जोग, श्री सुहास वझे, दामोदर च्यारी प्रमुख शिष्य होते.

गोमंतकीय कीर्तन परंपरेच्या इतिहासात हरिभक्त परिषदेचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. गोव्यातील कीर्तन परंपरेने एक वेगळेच वळण घेतले. १९७६ सालात गोव्यात श्री शांतादुर्गा देवस्थान फोंडा, या ठिकाणी अखिल भारतीय कीर्तनकार संमेलन आयोजित करण्यात आले होते, त्यात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.कै. धुंडामहाराज देगलुकर अध्यक्ष होते. विविध प्रांतांतून साडेपाचशे कीर्तनकार सहभागी झालेले होते. परंतु गोव्यात कीर्तनकार असूनही गोमंतकीय कीर्तनकारांना संधी दिली नव्हती. त्या कीर्तन संमेलनात महाराजांच्या हस्ते ह.भ.प.कै.गजाननबुवा फडके यांना 'कीर्तनविशारद' पदवी देऊन सन्मानित केले होते. या संमेलनात नागेशीचे वा. ल. वझे, नानोड्याचे दामोदरबुवा केळकर, शिरोड्याचे गजाननबुवा फडके, कीर्तनासाठी वारंवार गोव्यात येणारे सदाशिवगडचे बाबा कर्वे, बांबर येथील नारायणबुवा बर्वे, शिवोलीचे मुकुंदबुवा मडगावकर हे ज्येष्ठ कीर्तनकार होते. यातील कोणालाच कीर्तन करण्याची संधी दिली नव्हती या ठिणगीतून गोमंतक व कारवार मधील कीर्तनकारांसाठी 'गोवा-कारवार कीर्तन संमेलन' आयोजित केले गेले. त्यातूनच 'हरिभक्त परिषदेचा' उदय झाला. १९८० साली ह.भ.प.कै.गजाननबुवा फडके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, गोमंतकातील ज्येष्ठ गायक, भजनप्रेमी ह.भ.प. कै. पांडुरंग राया भाटीकर यांच्या अध्यक्षतेखाली, तीन दिवसीय पहिले कीर्तन संमेलन, शिवनाथ मंदिर शिरोडा येथे आयोजित करण्यात आले. त्यात पन्नासाच्या आसपास कीर्तनकार सहभागी झाले होते. त्यानंतर आजतागयत हे कीर्तन संमेलन आयोजित केले जाते. गोमंतकीय कीर्तनकार यात अध्यक्षस्थानी असतात व कीर्तन संमेलनाचा यशस्वी सोहळा साजरा होतो. हरिभक्त परिषद असे नाव डॉ. मेहेंदळेबुवा यांनी सुचविले होते. हरिभक्त परिषदेने नंतरच्या काळात कीर्तन वर्ग, कीर्तन कार्यशाळा, स्पर्धा इत्यादी उपक्रम सुरू केले. दरवर्षी गुरु पौर्णिमा, नारद जयंतीच्या निमित्ताने हरिभक्त परिषद गोमंतक, स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम आयोजित करतात.

आजच्या घडीला गोव्यात शंभरच्या आसपास ज्येष्ठ, श्रेष्ठ कीर्तनकार, बाल कीर्तनकार, युवा कीर्तनकार तसेच महिला कीर्तनकारही विविध उत्सवांमध्ये, कीर्तनांचे कार्यक्रम करतात.

गोमंतकीय कीर्तन परंपरेचा इतिहास लक्षात घेताना नारदीय कीर्तन परंपरेप्रमाणेच वारकरी कीर्तन परंपरेचे गोव्यात असलेले स्थान विचारत घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जर विचार केला तर १८ व्या शतकापासून गोमंतकात इतर संप्रदायाचे कीर्तन रुजलेले दिसले नव्हते. परंतु काही ज्येष्ठ कीर्तनकारांशी चर्चा केल्यानंतर असे समजले की, गोव्यात नारदीय कीर्तन परंपराच जास्ती प्रमाणात आहे परंतु गेल्या दशकापासून वारकरी कीर्तन परंपराही गोव्यात रुजत आहेत. मडगाव, सांगे, म्हापसा, साखळी या परिसरात जी विठ्ठल मंदिरे आहेत त्या ठिकाणी तेथीलच काही वारकरी मंडळी वारकरी परंपरेतील कीर्तन प्रयोग सादर करायचे. कोदाळ भागात चिदंबर संप्रदायातील ह.भ.प.कै.पांडुरंग महादेव जोशी यांनी वारकरी कीर्तन प्रयोगासारखेच कीर्तन सुरू केले. बेळगाव जवळील वडगाव परिसरात त्यांचे वास्तव्य होते. चिदंबर स्वामींचे पणतू पांडुरंग महाराज होते, पांडुरंग जोशी वारीला जायचे, पांडुरंग जोशींनी पांडुरंग महाराजाना गुरू मानले. त्यांचे वडील वारी करायचे त्यामुळे वारकरी कीर्तनाचे त्यांना ज्ञान होते. ते गुरू आज्ञेने दृष्टांत झाला, त्यांनतर ते गोव्यातील कोदाळ, वाळपाई भागात आले. त्यानंतर महादेव जोशींनी वारकरी कीर्तन परंपरा गोव्यात सुरू केली. १९३८-१९३९ पासून पांडुरंगबुवा जोशी, कोदाळ परिसरात आले. पोर्तुगीजांच्या कालखंडातही या संप्रदायाची कीर्तनसेवा अखंडित सुरू होती व आजही आहे.

मूळ कर्नाटकातील चिदंबर संप्रदाय गोव्यात रुजला. महादेव जोशी यांनी आपल्या गुरांचा, पांडुरंग महाराजांचा, उत्सव सुरू केला. ८४ वर्षापासून उत्सवातील रूढी चालू आहेत. त्या ठिकाणी वारकरी कीर्तनाला पांडुरंग बुवा जोशी यांनी सुरुवात केली. परंतु त्यात जे संदर्भ वापरले जातात ते चिदंबर संप्रदायात राजाराम महाराज होते, त्यांनी विपुल प्रमाणात मराठी अभंग रचना केल्या, त्यांच्याच रचना वापरल्या जातात. काही कारणास्तव बाहेर पडून, पांडुरंग बुवा जोशींच्या मुलाने होंडा भागातील तेंगणे परिसरात चिदंबर संप्रदायाचे उत्सव सुरू केले. त्यात नंतर इतर समाजातील लोक, परंपरेने भजनाला येणारे लोक, कणकुंबी भागातील जास्ती प्रमाणात टाळकरी लोक आहेत, त्यांचा समावेश असतो. एकंदरीत तीन उत्सव या संप्रदायाने सुरू ठेवले आहे, त्यातील एक उत्सव कार्तिक वद्य षष्ठीला चिदंबर स्वामींचा जन्मोत्सव, माघ वद्य पंचमीला पांडुरंग महाराजांचा जन्मोत्सव, तुकाराम महाराजांच्या बीजेच्या दिवशी राजाराम महाराजांची जयंती तो एक उत्सव परंपरेने केले जातात. या उत्सवातील कीर्तने जोशी कुटुंबातीलच कोणीतरी

करण्याची परंपरा आहे. आजतागायत कोदाळ मध्येच परंपरेने उत्सव व कीर्तने चालू आहे. १९४० पासूनची ही चिदंबर संप्रदायाची कीर्तन परंपरा चालू आहे. सध्या तिथे श्री वासुदेव जोशी, श्री महादेव जोशी हे कीर्तन करतात. परंपरा म्हणून कीर्तने केली जातात. संप्रदायाला जातीचे बंधन नाही. परंपरेने पाठ असलेले टाळकरी असतात. या संप्रदायाचा एक नियम आहे तो असा की, जन्मोत्सवाचे कीर्तन करणार तर दशावतारी मालिका म्हणणे अनिवार्य आहे. अभंग, पाळणा हे राजाराम महाराजांचेच वापरले जातात. कोदाळात गोव्यातील चिदंबर संप्रदायातील जोशी कुटुंब सोडले तर अजून कोणी कीर्तने केलेली नाहीत. जन्मोत्सवाच्या कीर्तनात कीर्तन झाल्यानंतर इत कोणालाही कीर्तन करायला दिले जात नाही. दुसऱ्या दिवशी येऊन केले तर चालू शकते परंतु त्या दिवशी इतरांचे कीर्तन सादरीकरण बंधनकारक असते. प्रसादाचा अभंग, पसायदान म्हणून कीर्तन संपन्न होते. त्यानंतर इतर कोणी भजन करू शकतात. ४ तास कीर्तन होते. थोडक्यात विचार करता, या संप्रदायातील कीर्तन पूर्णतः वारकरी कीर्तनासारखेच असते. या संप्रदायातील कीर्तनकाराचा पोशाख वारकरी कीर्तनकाराप्रमाणेच असतो.

गोमंतकात सध्या नारदीय व चिदंबर संप्रदायातील वारकरी कीर्तन प्रयोग हे कीर्तन प्रकार प्रचलित आहे. गोमंतकात आजही काही कीर्तनाचे घराणे आहेत उदा: सुर्लाचे जोग, कोदाळचे जोशी, सिद्धये.

गोमंतकीय कीर्तन परंपरेची वाटचाल अशा स्वरूपाची आहे.

## ३.२. गोमंतकीय कीर्तनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये.

गोमंतकीय कीर्तन परंपरेचा लक्षणीय इतिहास पाहता, गोमंतकाला नारदीय कीर्तन परंपरेचा वारसा लाभलेला आहे. नारदीय कीर्तन परंपरेचे इतर उप प्रकारही गोमंतकात आढळतात. परंतु त्याचे प्रमाण कमी आहे. गोव्यात नारदीय कीर्तन परंपरा रुजण्याचे कारण, कीर्तन महाविद्यालयामध्ये कीर्तन शिकविण्यासाठी जे कीर्तनकार येत असत ते नारदीय कीर्तन परंपरेतील होते. १८व्या शतकात जे कीर्तनकार होते, त्यांनी नारदीय कीर्तन परंपरा पुढे सुरू ठेवल्याचे दिसून येते. त्यात पोर्तुगीज राजवटीतही कीर्तन, उत्सव सुरू होतेच. महाराष्ट्रात डॉ. पटवर्धनबुवा, गोविंदस्वामी आफळे हे राष्ट्रीय कीर्तनाच्या माध्यमातून क्रांतिकारी विचार लोकांपर्यंत पोहोचवित होते. त्याचा परिणाम व प्रभाव गोव्यातील कीर्तनकारांवरही झालेले दिसतात. त्यामुळे गोव्यात जी कीर्तने व्हायची किंवा अजूनही होतात त्यांचे स्वरूप नारदीय, राष्ट्रीय व चिदंबर संप्रदायाचे वारकरी कीर्तन असे प्रकार प्रचलित आहे.

पोर्तुगीज पूर्व काळातील कीर्तनाचे स्वरूप कदाचित देव देवतांची आख्याने सांगून, भक्तिमार्गचा परिचय करून देण्यासाठी असायचे असे काही कीर्तनकारांचे म्हणणे आहे. त्यात जन्मोत्सवाची कीर्तने असायची. १८-१९ व्या शतकात देखील पौराणिक आशयाची कीर्तने सांगितली जायची. पोर्तुगीज काळात कीर्तनाचे स्वरूप थोडे बदलले. त्यांच्या ताब्यात काही मोजकेच तालुके होते. जसे की तिसवाडी, बार्देश, सालसेत या तालुक्यांमध्ये कीर्तन किंवा मंदिरांमधून उत्सव होण्याची शक्यता कमी दिसते, इतर तालुक्यांत मंदिरांमधून उत्सव, सण साजरे व्हायचे. त्या ठिकाणी कीर्तने, पुराणे, भजन ही परंपरा अखंडित होती. कीर्तनातून जनजागृती करण्याचे काम कीर्तन परंपरेत नमूद केलेल्या काही कीर्तनकारांनी केले. त्यात शिवोलितील जीवनमुक्त महाराजांनी मठातून कीर्तनाच्या माध्यमातून क्रांतीचे विचार तरुणांच्या मनात पेरले. त्यातून अनेक क्रांतिवीर तयार झाले. त्यांनी आपल्या कीर्तनातून अध्यात्मिक विचारांसहित व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी विषय मांडले. लक्ष्मणबुवा जोगानी देखील आपल्या कीर्तनातून ऐतिहासिक कीर्तने सांगितली. २०व्या शतकाच्या सुरुवातीला नारायणशास्त्री महाले यांनीही आपल्या कीर्तनातून ऐतिहासिक चरित्रे मांडली. डॉ. पटवर्धनबुवा गोव्यात कीर्तनासाठी आले होते. त्यांच्या राष्ट्रीय कीर्तनाचा प्रभाव गोव्यातील काही कीर्तनकारांवर झाला व त्यातून दामोदरबुवा केळकर, नारायणशास्त्री गोडबोले, लक्ष्मणबुवा बर्वे, असे अनेक कीर्तनकार घडले. प्रत्येकजण आपापल्या गुरूकडून कीर्तनाचे ज्ञान संपादन करत होते. काही कीर्तनकार पौराणिक व ऐतिहासिक अशी कीर्तने करतात. त्यापैकी विवेकबुवा जोशी, उदयबुवा फडके, असे काही कीर्तनकार

आहेत. काही कीर्तनकार अप्रत्यक्षपणे आपल्या कीर्तनातून राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक विषय मांडतात. कीर्तनातील पोशाख हा नारदीय कीर्तनात असतो तसाच आहे. राष्ट्रीय कीर्तनकार डोक्यावर पगडी ऐवजी फेटा बांधतात.

गोमंतकातील आद्य महिला कीर्तनकार कीर्तनसम्राज्ञी ह.भ.प.वै. राधाबाई कामत यांनी गोमंतकाबाहेर जाऊन कीर्तनाचे कार्यक्रम केले. त्यांची पोशाखाची पद्धत म्हणजे, नऊवारी नेसून, पायात चाळ बांधून, त्या कीर्तन करायच्या. त्यांचा कल सामाजिक विषयाकडे अधिक होता. त्यानंतर अनेक महिला कीर्तनकार तयार झाल्या. त्यापैकी ह.भ.प.वै.आशाताई फडके, ह.भ.प.वै.इंदिराबाई अनंत चितळे. सध्या कीर्तन करीत असलेल्यांपैकी ह.भ.प.सौ. वंदना जोशी इत्यादी.

चिदंबर संप्रदायाचे उत्सव अजूनही गोव्यात होत आहेत. त्यात ह.भ.प.वै.पांडुरंग जोशी यांच्याच घराण्यातील कीर्तनकार वारकरी पद्धतीचे कीर्तन करतात.

विद्यमान गोमंतकीय कीर्तनकार आपल्या कीर्तनातून जनजागृती करण्याचे उत्तम कार्य करतात. कालांतराने कीर्तन हे केवळ देवतांच्या उत्सवापुरते मर्यादित न राहता, मौजी बंधन संस्कार, गृहप्रवेश, विविध समारंभ प्रसंगी, स्नेह संमेलन, शाळांमधून देखील केले जाते. त्यानुरूप विषय मांडले जातात.

गोमंतकीय कीर्तन परंपरेच्या वैशिष्ट्यांचा विचार करता, पोर्तुगीज पूर्व काळात सुरू असलेली कीर्तनपरंपरा आजही गोव्यात अखंडित सुरू आहे. पोर्तुगीज काळात कडक बंधने असताना देखील कीर्तनकारांची घराणी होती. सत्तरी भागात जोग घराणे आपापल्या परीने कीर्तने करीत होते. बर्वे घराणे, सिद्धये घराणे अशी काही घराणी कीर्तनकारांची घराणी म्हणून प्रसिद्ध आहेत. आता ह.भ.प. सुहासबुवा वझे, ह.भ.प.विवेकबुवा जोशी, त्यांच्यासमवेत गुरुदासबुवा सुतार, ह.भ.प.उदयबुवा फडके यांनी आपल्या कीर्तन वर्गांच्या माध्यमातून अनेक कीर्तनकार घडविले. सध्या बाल व युवा कीर्तनकार तयार होत आहेत. यातून गोमंतकीय कीर्तन परंपरा अधिकाधिक समृद्ध होत आहे.

**३.३. गोमंतकीय कीर्तनात विशेष योगदान दिलेल्या कीर्तनकारांचा परिचय.**

गोमंतकातील कीर्तन परंपरा समृद्ध होण्यासाठी आणि कीर्तनकारांनी आपापल्या परीने योगदान दिलेले आहे. खरे पाहता, गोमंतकीय कीर्तन परंपरेतील प्रत्येक कीर्तनकार व त्याचे कीर्तनाप्रती असणारे समर्पण वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु पृष्ठ मर्यादेमुळे सर्वच कीर्तनकारांचा परिचय या उपप्रकरणात नमूद केलेला नाही. त्यातल्या त्यात अठराव्या शतकापासून ते आत्तापर्यंत ज्या कीर्तनकारांचे योगदान विशेष आहे अशाच काही कीर्तनकारांचा परिचय केलेला आहे.

गोमंतकात कृष्णदास शामांपासून कीर्तन परंपरा सुरू झाली असे म्हटले जाते. परंतु आद्य कीर्तनकार म्हणून १८ व्या शतकातील कृष्णंभट्ट बांदकर यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी डोंगरी येथे श्रीराम मंदिराची स्थापना केली व त्या ठिकाणी कीर्तने केली. आनंद रामायणातील काही आख्याने निवडून छंदोबद्ध रचना केल्याचे त्यांच्या चरित्रात आढळते. डोंगरी मधील राम मंदिरात रामनवमी ते हनुमान जयंती पर्यंतची कीर्तने बांदकर महाराज करायचे. त्यांनी विविध रागांवर आधारित पदांच्या रचना केलेल्या आहेत. बांदकर महाराजांमुळेच गोमंतकात कीर्तन, भजनाचे महत्त्व वाढले असे मानले जाते.

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात कृष्णभट्ट कथने कीर्तनकार होऊन गेले. कृष्णभट्ट कथने यांचा उल्लेख, कीर्तनकार, पुराणिक, व्याख्याते, प्रवचनकार, ग्रंथप्रेमी, व्यासंगी असा केला जातो. कीर्तनाबरोबरच भागवत, प्रवचन, अध्यात्मरामायण इत्यादी विषयांवर सलग प्रवचने करीत असत. गोमंतकाबाहेर विदर्भ-मराठवाड्यापर्यंत व महाराष्ट्रातही कीर्तन, प्रवचने करण्यासाठी जायचे.

१९व्या व २०व्या शतकातील पुढील कीर्तनकारांनी गोमंतकीय कीर्तन परंपरेत उल्लेखनीय भर घातली. त्यापैकी, बाळुबुवा अभिषेकी होते. गोड गळ्याचे उत्कृष्ट कीर्तनकार, परंपरानिष्ठ व यशस्वी कीर्तनकार म्हणून त्यांची ख्याती गोव्यात तसेच महाराष्ट्रात पसरली होती. वयाच्या १७ व्या वर्षापासून त्यांनी कीर्तनाला सुरुवात केली होती. काव्य रचना करून पूर्वरंगव आख्याने त्यांनी स्वतः तयार केली असल्याचे उल्लेख आढळतात. जवळपास १८० आख्याने व पूर्वरंग त्यांच्याकडे तयार होते.

ह.भ.प.वै.बाळूबुवा पुराणिक यांचे मूळ नाव वासुदेव दत्तात्रय ढवळीकर असे होते. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या ठिकाणी घेतलेले पूर्वरंग, उत्तररंग त्याच ठिकाणी पुन्हा घेतले जाणार नाही याची दक्षता ते घ्यायचे. स्वतः कीर्तने रचायचे. त्यांनी दत्त नवरात्राची पंधरा वर्ष एकाच ठिकाणी कीर्तन सेवा केली. त्यात दरवर्षी निरुपणासाठी वेगळा अभंग व आख्यानही वेगळे घेत असे. त्यांचा भागवताचा अभ्यास दांडगा होता.

ह.भ.प.गजाननबुवा फडके यांनी ६००० पेक्षा अधिक कीर्तने केलेली होती. त्यांच्या वयाच्या ६० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने सिंकागो(सिंधुदुर्ग,कारवार,गोवा) म्हणजेच आताची हरिभक्त परिषद ही संस्था उदयाला आली. त्यांनी कामाक्षी मंदिरात ३६ वर्षे किर्तन सेवा केलेली होती. त्यानी गोव्यात तसेच महाराष्ट्र, कर्नाटकातही शेकडो कीर्तने केली. त्यांच्या कीर्तनातून त्यांनी, चारित्र्य, नीतिमत्ता, सचोटी, चांगुलपणा, बंधुभाव, माणुसकी यासारखे समाजोपायोगी विषय मांडले. त्यांनी कीर्तनासंबंधी "आपणासारिखे करिती तात्काळ' हा सहजभाव सहजपणे निर्माण करण्यात यशस्वी झाला तो कीर्तनकार" अशी व्याख्या केल्याचे 'सुखे नाचा हो कीर्तनी' या पुस्तकात नमूद केले आहे. ह.भ.प.वै.धुंडामहाराज देगलूरकर यांनी त्यांना कीर्तन विशारद ही पदवी देऊन त्यांच्या गौरव केला. गोव्यातील कीर्तन विद्यालय सुरू करण्यासाठी त्यांचा मोलाचा हातभार होता.

ह.भ.प.वै. लक्ष्मणबुवा बर्वे हे राष्ट्रीय कीर्तनकार होते. श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य विद्याशंकरभारती स्वामीमहाराज, करवीर पीठाधीश, यांनी त्यांचा कीर्तनपटू म्हणून गौरव केला होता. ते डॉ.पटवर्धन बुवांचे शिष्य होते. त्यांनी नंतर अखंड कीर्तन सेवेचे व्रत हाती घेण्याची शपथ घेतली. सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक अशा विषयांवर त्यांनी स्वतः आख्याने बांधली होती. गोवा शासनाने तयार केलेल्या विविध योजनांवर बुवांनी कोंकणी व मराठी भाषांतून आकाशवाणीवरून कीर्तने सादर केली. गोव्यात तसेच महाराष्ट्रातील विविध राज्यातून त्यांच्या कीर्तनाला मागणी होती. हरिभक्त परिषदेत असलेल्या तरुण कीर्तनकारांना त्यांनी मार्गदर्शन केले होते. त्यांना गोवा राज्याचा १९८५-१९८६ सालचा १ला कीर्तन विषयक राज्य पुरस्कार प्राप्त झाला.

ह.भ.प.वै. नारायण शास्त्री महाले हे गोव्याबाहेर कीर्तने करायचे. ऐतिहासिक स्वरूपाचे कीर्तन त्यांनी केले. ते स्वतः स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांना कीर्तन केसरी कीर्तन विशारद यासारख्या पदव्या बहाल करण्यात आल्या होत्या. त्यांचे कीर्तना अतिशय परखड असायचे. त्यांच्या कीर्तनामुळे त्यांना पकडायला पोलीस देखील आले होते, असा उल्लेख

उदयबुवा फडके यांच्याशी चर्चा करताना आढळला. त्यांनी अष्टपंचाक्षरी, शंकर संहिता, अंजनयोग, असे ग्रह अशी उपासना हो पुस्तके लिहिली.

ह.भ.प.कै.नारायणबुवा बर्वे यांनी राष्ट्रीय, तसेच पौराणिक आख्याने आपल्या कीर्तनातून मांडली. त्यांचे अनेक शिष्य तयार झाले. गोव्यातील महादेवशास्त्री जोशी, दिपाजी राणे यांची चरित्रे बांधली. खेड्यापाड्यात मोठ्या प्रमाणात कीर्तनाचा प्रसार व प्रचार केला. त्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात कीर्तन विद्या शिकविली. 'कीर्तनमंजिरी' व 'माझ्या कीर्तन स्मृती' ही पुस्तके त्यांनी लिहिली.

चिदंबर संप्रदायातील ह.भ.प.कै. पांडुरंग महादेव जोशी यांनी कोदाळ मध्ये वारकरी कीर्तनाचे परंपरा सुरू केली. चिदंबर संप्रदायातील कीर्तनाचे स्वरूप हे वारकरी कीर्तनासारखेच आहे. १९व्या, २०व्या शतकापासून ही कीर्तन परंपरा अखंडित चालू आहे. आज त्यांच्या पिढीतील वासुदेव जोशी त्या ठिकाणी संप्रदायातील उत्सवाच्या निमित्ताने कीर्तने करतात. त्या संप्रदायातील राजाराम महाराजांनी केलेले अभंग यांचाच वापर त्यांच्या कीर्तनात केला जातो. ते कुटुंब सोडल्यास अजून कोणीही चिदंबर संप्रदायातील कीर्तन करीत नाही.

गोमंतकातील आद्य महिला कीर्तनकार म्हणून ‘कीर्तनसम्राज्ञी’ ह.भ.प.कै. राधाबाई कामत यांचा उल्लेख केला जातो. राधाबाई कामात यांनी गोव्याबाहेरही कीर्तने केली. त्यांच्या कीर्तनाची पद्धत म्हणजे पायात चाळ बांधून त्या कीर्तने करीत. कीर्तनाचे विषय हे सामाजिक स्वरूपाचे होते. त्यांच्या आध्यात्मिक विचारांची बैठक प्रगल्भ होती. त्यांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या कीर्तनात सिनेमांच्या चाली लावून पदे म्हटली. त्यांचे आध्यात्मिक गुरु म्हणजे त्यांचे सासरे रामचंद्र कामत. आणि सोलापूर बडोदा या ठिकाणी दोन महिने अखंडित कीर्तने केली. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या कीर्तनातील पदे म्हणताना ताल न चुकता विषय मांडत असत.

ह.भ.प.सुहासबुवा वझे हे अनंतबुवा मेहेंदळे यांचे शिष्य होय. त्यांनी आपल्या कीर्तनातून पौराणिक विषय मांडले. अप्रत्यक्षपणे राजकीय सामाजिक विषय कीर्तनातून सांगितले. सध्या ते अनेक बाल-युवा कीर्तनकारांना कीर्तने शिकवित आहे. किर्तन विद्यालयाचे स्थापना करून गोवा, कर्नाटक,महाराष्ट्र तसेच इतरही राज्यात कीर्तनांचे कार्यक्रम करत आहे. बाल-युवा कीर्तनकारांचे चक्री कीर्तनाचे प्रयोगही त्यांनी केलेले आहेत. सध्या ते फोंडा तसेच माशेल भागांत कीर्तनाचे प्रशिक्षण देतात.

ह.भ.प. उदयबुवा फडके हे गोमंतकात तसेच बाहेरही राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहे. लक्ष्मणबुवा बर्वे हे त्यांचे कीर्तनातील गुरू होते. त्यांच्याकडून काही आख्याने शिकून त्यानंतर त्यांनी स्वतः कीर्तनाचा अभ्यास केला. त्यांनी स्वतः गोमंतकीय क्रांतिवीर, विज्ञान, पौराणिक विषय घेऊन कीर्तने बांधली. सलग कीर्तन करण्याचा त्यांनी विक्रम केला. त्यांनी पंढरपूरच्या वारीची परंपरा गोव्यात सुरू ठेवली आहे. तरी त्यांचे कीर्तन हे नारदीय परंपरेतील आहे. ते सध्या कीर्तनाबरोबरच, कीर्तनाचे प्रशिक्षण वर्ग, विविध उपक्रम, गोव्यात तसेच गोव्याबाहेरही कीर्तनाच्या कार्यशाळा घेतात. डिचोली तालुक्यातील मुळगाव भागात ते विनामूल्य कीर्तन वर्ग घेतात. त्यांचे ‘क्रांतिगाथा हि अपरान्ताची’ हे पुस्तक प्रसिद्ध आहे. १९ फेब्रुवारी २००८ साली डिचोली येथील शिवसंकीर्तन समितीतर्फे सलग तेरा तास कीर्तन करण्याचा विक्रम फडके बुवांनी केला.

ह.भ.प.विवेकबुवा जोशी हे सत्तरी भागातील प्रसिद्ध कीर्तनकार आहेत. पेशाने शिक्षक असले तरी कीर्तनाचा साधन व माध्यम म्हणून आजपर्यंत ते योग्यप्रकारे उपयोग करत आहे. ह.भ.प.कै.नारायणबुवा बर्वे हे त्यांचे गुरू होते. विवेकबुवा जोशींनी आपल्या कीर्तनातून ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक विषय मांडले. त्यांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या गावात त्यांचे कीर्तन आहे, त्या गावातील प्रसिद्ध व्यक्ती, विशेष योगदान असलेले व्यक्तिमत्व इत्यादींच्या चरित्रांचा अभ्यास करून कीर्तनात आख्याने मांडली. विवेकबुवा जोशी विनामूल्य कीर्तनाचे वर्ग, कार्यशाळा घेतात. त्यांनी अनेक कीर्तनकार घडविलेले आहेत. आबाल-वृद्ध त्यांच्याकडे कीर्तनाचे धडे घेत आहेत. त्याशिवाय काही महिला कीर्तनकारही कीर्तनाचे शिक्षण घेत आहेत.

गिमोणे पिळगाव येथील ह.भ.प. रामकृष्णबुवा गर्दे यांनी पाठशाळेत असताना महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.वै.रामचंद्रबुवा कऱ्हाडकर यांच्याकडे कीर्तनाचे शिक्षण झाले. पुढे करवीर पीठ कोल्हापूर या ठिकाणी जाऊन त्यांनी कीर्तनाचे पुढील शिक्षण संपादन केले. बुवांनी पौराणिक, सामाजिक विषय कीर्तनातून मांडले. मराठी, कोंकणी मधून कीर्तने केली. रेडिओ तसेच दूरदर्शनवरही कीर्तनाचे कार्यक्रम केले. रेडिओवरून कोंकणीमधून सरकारच्या विविध योजनांवर कीर्तनाची मालिका सादर केली. पर्यावरण, सामाजिक विषयांवर आख्याने बांधली.

**समारोप.**

गोमंतकीय कीर्तन परंपरेचा इतिहास समजून घेताना सुरुवातीला कीर्तनाची प्राचीनता शोधून काढणे आव्हानात्मक होते. १८व्या शतकापासून कीर्तना संबंधीची माहिती मिळते परंतु त्या अगोदरची माहिती मिळणे अशक्य होते. काहींचे उल्लेख सापडतात काहींचे नाही. त्यामुळे हे प्रकरण मुलाखती घेऊन व पुस्तकातून काही माहिती घेऊन पूर्ण झाले.

प्रस्तुत प्रकरणात गोमंतकीय कीर्तन परंपरेचा आढावा, गोमंतकीय कीर्तनाचे स्वरूप ववैशिष्ट्ये व विशेष योगदान असलेले कीर्तनकार यांच्या विषयी अभ्यास केलेला आहे.

गोमंतकीय कीर्तन परंपरेचा हा इतिहास व कीर्तनकारांची कीर्तनाप्रती असलेली निष्ठा अवर्णनीय आहे. याच कारणाने पोर्तुगीज राजवट होती तेव्हापासून ते आतापर्यंत कीर्तनाची परंपरा अखंडित सुरू आहे. त्यात विशेष योगदान कीर्तनकारांचे आहे.

**निष्कर्ष.**

- गोमंतकातील कीर्तन परंपरेचा इतिहास १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात असण्याची शक्यता आहे. परंतू त्याचे पुरावे सापडत नाहीत. त्यामुळे १८ व्या शतकानंतरच्या कीर्तन परंपरेचा इतिहास गोमंतकात आहे असे मानावे लागते.
- १८-१९ व्या शतकातील कीर्तन परंपरेचा विचार जर केला तर त्याचे स्वरूप धार्मिकतेचा प्रचार व प्रसार करणारे होते.
- १९व्या, २०व्या व २१ व्या शतकातील कीर्तनाचे स्वरूप कालांतराने बदलत गेले. त्यात विषय वैविध्यता आली.
- गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता, त्यावेळी कीर्तनाच्या माध्यमातून क्रांतिकारी विचारांना प्रेरणा देण्यात आली.
- कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. त्यात सामाजिक, राजकीय अशा प्रकारचे विषय हाताळले गेले.
- गोमंतकात पूर्वी बाहेरुन कीर्तनकार यायचे. परंतू गोव्यात कीर्तनाची घराणी होती.
- गोमंतकात कीर्तन विद्यालयाची स्थापना झाली. त्यात गोव्याबाहेरील नामवंत कीर्तनकार प्रशिक्षण देत होते. त्यातूनच गोमंतकातील नारदीय कीर्तनपरंपरा वृद्धींगत होत गेली.
- गोव्यातील कीर्तनकारांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने १९८० सालापासून हरिभक्त परिषदेची वाटचाल सुरु झाली.
- गोमंतकात महिला कीर्तनकारांना स्थान मिळाले. त्यामध्ये आद्य महिला कीर्तनकाराचा मान कीर्तनसम्राज्ञी ह.भ.प. राधाबाई कामत यांच्याकडे जातो.
- गोमंतकात नारदीय कीर्तनपरंपरा अधिक तर रुजली याचे कारण नारदीय कीर्तनकारांचा प्रभाव अधिक प्रमाणात गोमंतकातील कीर्तनकारांवर झाला.
- गोव्यात चिदंबर संप्रदाय,.काडसिद्धेश्वर संप्रदाय,.त्याचप्रमाणे पद्मनाभ संप्रदाय अस्तित्वात होता. या संप्रदायांनी आपापल्या परीने कीर्तने करून संप्रदायाची शिस्त लोकांना लावली. त्यातील चिदंबर संप्रदायाचे

लोक आजही उत्सवाच्या माध्यमातून कीर्तने सादर करतात. त्यांची कीर्तनाची पद्धत ही वारकरी कीर्तनाची आहे.

- आजही ह. भ. प. सुहासबुवा वझे, विवेकबुवा जोशी, उत्यबुवा फडके. आबाल स्त्री, वृध्दांसाठी कीर्तनाचे वर्ग घेतात.
- १८ व्या शतकापासून २१ व्या शतकापर्यंत गोमंतकातील कीर्तन परंपरा अखंडीत सुरु आहे तसेच कीर्तनकारांच्या यशस्वी प्रयत्नांमुळे हि परंपरा अशीच सुरु राहील.

## प्रकरण ४. <u>**गोमंतकामधील कीर्तनातील परिवर्तने.**</u>

प्रस्तावना.

प्राचीन काळापासून चालत आलेली कीर्तन परंपरा यद्ययावत सुरू आहे. कीर्तन परंपरेचे मूळ नारद महर्षींपासून आहे. त्यात अनेकविध कीर्तनकार तयार झाले, अनेक संप्रदायांनी कीर्तनाचा साधन म्हणून वापर केला, कीर्तन एक प्रभावी माध्यम म्हणून विकसित झाले. कीर्तनाची घरणी तयार झाली. स्थल-कालानुरूप कीर्तन परंपरेत बदल झाले व हळूहळू कीर्तनाचे स्वरूप बदलू लागले. कीर्तनातून व्यक्त केला जाणारा विषय व त्याला अनुरूप अशा आशयाची बांधणी व सुसूत्र पद्धतीने साकारला जाणारा प्रकार यात परिवर्तन झाले. जसे हे बदल इतर प्रांतामधून झाले तसेच गोमंतकातही झालेले आढळतात. साडे चारशे वर्षे पोर्तुगीजांच्या जुलमी राजवटी खाली दबलेला गोमंतक प्रदेश व संस्कृती याला फाटा देऊन, कीर्तनातून निःशस्त्र क्रांती झाली याचे दाखले काही कीर्तनकारांशी चर्चा करताना समजले. परंतु गोमंतकातील कीर्तनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये कालौघात परिवर्तित होत गेली. विषयांत, आशयांत वैविध्यता दिसून आली. त्याचे स्वरूप प्रस्तुत प्रकरणांतून नोंदविलेले आहे.

काळानुरूप कीर्तनामध्ये विविध बदल होत गेले, आताही होत आहेत. कीर्तनाचा विषय, आशय व प्रकारात परिवर्तने होत आहेत. वैश्विक, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवर होणारे बदल कीर्तनातही होताना दिसतात. जसे इतर ठिकाणी कीर्तनात वैविध्य आढळते तसेच गोमंतकातही दिसून येते. पोर्तुगीज पूर्व व गोवा मुक्ती नंतर कीर्तनात विविधता असलेली दिसून येते. त्याचा विचार करताना विषय, आशय व प्रकार या अनुषंगाने उपप्रकरणांची विभागणी केलेली आहे.

### ४.१ **कीर्तनातील विषयानुरुप परिवर्तन.**

गोवा मुक्तीपूर्व गोव्यामध्ये कीर्तन परंपरा चालूच होती. परंतु त्याचा फारसा उल्लेख आढळत नाही. गोमंतकातील कीर्तनकारांच्या मुलाखती वाचून, काहींशी चर्चा करून असे आढळून आले की पोर्तुगीज पूर्व कीर्तने सुरू होतीच. जेवढी जुनी मंदिरे आहेत तेवढीच जुनी ही कीर्तन परंपरा आहे असे दिसून आले. पोर्तुगीज पूर्व गोवा भारताचाच भाग असल्याने गोव्यामध्ये हा सांस्कृतिक वारसा जपलेला होता.

त्याकाळी कीर्तनाच्या विषयांचे स्वरूप हे भक्तिपूर्ण असायचे. आध्यात्मिक विषयांची देवाण घेवाण असायची. मंदिरांमधून जन्माची आख्याने केली जायची. कृष्णभट्ट बांदकरांचे वडील कीर्तने करायचे असा उल्लेख कृष्णभट्ट बांदकरांच्या चरित्रात आहे. परंतु त्यांच्या कीर्तनाचे स्वरूप इत्यादी गोष्टींचा उल्लेख नाही. यावरून गोव्यातील कीर्तन परंपरा किती पुरातन आहे याची कल्पना येते.

पोर्तुगीज कालखंडात धार्मिक, आध्यात्मिक गोष्टी मंदिरातून कमी प्रमाणात व्हायच्या. त्या काळातील कीर्तनाचे विषय हे पौराणिकच होते. परंतु अप्रत्यक्षपणे गोवा मुक्ती संग्रमाची बीजे श्रोत्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य कीर्तनकार करत होते. राष्ट्रीय कीर्तनकार

गोव्यात असल्याने गोवा मुक्ती संग्रामाबद्दलचे विषय कीर्तनातून व्यक्त केले जायचे. जीवनमुक्त महाराजांसारखे क्रांतिकारी कीर्तनकार आध्यात्मिक विषय लोकांना समजावून सांगतानाच क्रांतिकारी विचारांनी प्रेरणा देत.

गोवा मुक्ती नंतरच्या कालखंडात विविध मंदिरातून जन्माख्याने सांगितली जायची. त्याचप्रमाणे वास्तवावर आधारित विषय कीर्तनात घेतले जाऊ लागले. पौराणिक, ऐतिहासिक, आध्यात्मिक, तत्वज्ञान, व्यसनमुक्ती, समाज सुधारणा, आरोग्य विषयक इत्यादी विषय कीर्तनातून जनजागृतीसाठी सांगितले जातात. कीर्तन विद्यालये गोव्यामध्ये असल्याने अनेक कीर्तनकार आजही घडत आहेत. भौगोलिक, सांस्कृतिक वारसा असणारे कीर्तनकार विविध प्रकारे कीर्तनाच्या विषयांमधून गोव्याचे दर्शन घडवतात.

१९व्या शतकापासून कीर्तनात अधिक वैविध्य असल्याचे आढळते. विज्ञाननिष्ठ विषय घेऊन त्यावर चरित्रे रचलेली आहेत. गोमंतकीय क्रांतिवीरांच्या जीवनावर आधारित कीर्तने रचली आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्र पुरुषांची चरित्रे कीर्तनातून सांगण्याचा पायंडा गोमंतकीय कीर्तनकारांनी घालून दिला. त्यामध्ये प्रामुख्याने ह. भ. प. लक्ष्मण बुवा बर्वे, ह. भ. प. नारायण बुवा बर्वे, ह. भ. प. नारायण शास्त्री महाले, ह.भ. प. लक्ष्मण बुवा जोग, ह.भ.प.कै.सिताराम बुवा बर्वे, ह. भ. प. उदय बुवा फडके, ह. भ. प. विवेकबुवा जोशी आदी कीर्तनकारांनी राष्ट्रीय कीर्तने व ऐतिहासिक कीर्तने केली त्याशिवाय पौराणिक कीर्तनेही केली. ह. भ. प. शामराव सामंतांसारखे कीर्तनकार काळानुरूप विषयात बदल करून कीर्तने करायचे. ह. भ. प. रामकृष्ण बुवा गर्दे यांनी सामाजिक, पर्यावरण, सरकारच्या विविध योजना, पौराणिक इत्यादी विषयांची चरित्रे बांधली.

कालांतराने विविध व्यक्तिगत, सामूहिक उत्सवातून कीर्तनांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ लागले. जसे की, मुंज, गृहप्रवेश, लग्न समारंभ, वाढदिवस, शाळा, संमेलने इत्यादी. तद्नंतर त्या प्रसंगाला अनुसरून कीर्तने बांधली व सादर केली जायची. यातून कीर्तन हे एक उत्तम माध्यम आहे याचा बोध होतो. चांगल्या गोष्टीची कीर्ती गाणे हे ब्रीद ठेऊनच कीर्तनकार काळानुरुप विषयात बदल करीत, जुन्या-नव्याची सांगड घालून कीर्तनाचे विषय लोकांपर्यंत ठेऊ लागले. प्रामुख्याने जे विषय लोकांच्या जवळचे आहेत, लोकांना जिव्हाळ्याचे आहेत व त्यांना आपलेसे वाटतील असे विषय घेऊन कीर्तनांची बांधणी केली गेली. लोकांना पौराणिक संदर्भांचे विश्लेषण वास्तवाला धरून, सुशिक्षित, सुजाण श्रोत्यांना आवाहनात्मक वाटतील असे विषय कीर्तनातून सांगितले जातात. सुरुवातीच्या काळात काही कीर्तनकार क्लिष्ट विषय सांगायचे परंतु आता क्लिष्टता कमी दिसून येते. कीर्तनाचे विषय हे लोकाभिमुख असलेले आढळतात.

विषयांतील वैविध्यामुळे कीर्तनाची गोडी गोव्यात आजही सर्वांना लागलेली आहे.

### ४.२ **कीर्तनातील आशयानुरुप परिवर्तन.**

गोमंतकाची ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात घेता, कीर्तनामधे आशयानुरूप बदल झालेले दिसून येतात. कीर्तनातील आशय समजून घेताना, त्यातील ऐतिहासिक, वाङ्‌मयीन, सांस्कृतिक दृष्ट्या जे परिवर्तन झाले आहे ते महत्त्वाचे आहे.

गोव्याला पोर्तुगीजांची सत्ता असल्यामुळे कीर्तनातील आशय अतिशय गुप्तपणे जसे प्रगट केले होते त्याचा उल्लेख अनेक कीर्तनकारांच्या चर्चांमधून आढळला. गोवा मुक्ती संग्रामात कीर्तनाचे स्वरूप आध्यात्मिक किंवा धार्मिक होतेच परंतु त्यात आशय मात्र गुप्त क्रांतीचा असायचा. लोकांच्या मनात मुक्तीची धारणा निर्माण करण्यासाठी अप्रत्यक्षपणे काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या जायच्या. घटना, प्रसंगाचा उल्लेख केला जायचा.

गोवा मुक्ती पूर्व जी कीर्तने होत त्यात प्रामुख्याने मंदिरा मंदिरांमधून देवतांच्या जन्मोत्सवाचीच आख्याने सांगितली जायची. तत्त्वज्ञानावर अधिक भर दिला जायचा. परंतु गोवा मुक्ती नंतरचे कीर्तन हे समाजाला आवडेल, रुचेल व पचेल असेच होते, अजूनही आहे. कीर्तन हे भगवंताचे गुणवर्णन करणारे आहेच त्याशिवाय लोकांना भक्ती मार्ग सोपा करून सांगण्यासाठी उपयुक्त असे साधन आहे. त्यामुळे त्यातील आशय हा वास्तवाला धरून असतो. आजू बाजूच्या घटनांचा प्रभाव माणसावर होतो त्यातून त्याला जे अनुभव मिळतात तेच कीर्तनातून जेव्हा मांडले जातात त्यावेळी श्रोत्यांना कीर्तन हे आपल्यासाठी आहे याची जाणीव होते व म्हणूनच कीर्तनातील अप्रत्यक्षपणे मांडला गेलेला आशय अत्यंत महत्त्वाचा असतो.

कीर्तन हे खरे तर मनोरंजनासाठी नाही. कीर्तन हे भगवत भक्तीचे साधन व समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. तरी, कीर्तनातून रंजन घडते. कीर्तनातील काव्य, विनोद, संगीत, वाचिक, आंगिक अभिनय, रस निर्मिती श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यास महत्त्वाचे असतात. कीर्तनाचा मुख्य उद्देश, विषयाचे गांभीर्य, तत्वज्ञान, वेद वचने, परमार्थ, भगवंताची ओळख इत्यादीचा परिपूर्ण परिचय समजावून सांगण्यासाठी वा पटवून देण्यासाठी आशयातील वेगळेपणा उपयुक्त ठरतो. आशयातील भिन्नता उपर्युक्त घटकांमुळे पोषक ठरते.

आशयातील परिपक्वता ही अभ्यासातून दिसून येते. गोमंतकामधे असे कीर्तनकार झाले ज्यांनी वेदोक्त, उपनिषदे, शास्त्र, पुराणे, विविध ग्रंथ, स्तोत्रे, इत्यादींचा अभ्यास केला होता. काहीं कीर्तनकारांना सारे कंठस्त होते. परिणामी कीर्तनाला वाङ्‌मयीन सौंदर्य प्राप्त झाले. कीर्तनकारांना श्रीमद् भागवत, भगवद् गीता, वेद, उपनिषदे इत्यादी संदर्भासहित स्पष्टीकरण देणे सोपे झाले. आशयाचा पाया भक्कम असल्याने कीर्तनाला अधिक उंची व समृद्धता प्राप्त झाली.

कीर्तनाचे आशयसूत्र हे गोमंतकातील श्रोत्रुवर्गाला आपलेसे वाटेल असे कीर्तनकारांनी प्रयत्न केले. सर्व समाजाला कळेल असा भाषेचा वापर केल्याने कीर्तनाचा एक माध्यम म्हणून प्रभावी उपयोग झाला. कीर्तनाचा ढाचा पुरातन असला तरी त्यात नावीन्य आशयामुळे आले.

गोमंतक ही देवभूमी आहे. या ठिकाणी पौराणिक विषय लोकांना अधिक प्रिय असतात. कीर्तनकार हा समाज प्रबोधनाच्या हेतुपुरस्सर त्यातून विविध संदर्भ देऊन आशयाला बळकटी देतो. उदा. ह. भ. प. सीताराम बुवा बर्वे, पौराणिक, ऐतिहासिक विषय सांगताना त्यातील पात्रे, घटना, प्रसंग हे तत्कालीन परिस्थितीशी समरुप होते याचे संदर्भ कीर्तनातून द्यायचे.

कीर्तनामध्ये वैश्विक, राष्ट्रीय, परिस्थितीनुरूप, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी गोष्टींचा विचार केला जातो. त्यामुळे आशायमध्ये विविधता येते.

४.३. **कीर्तनातील प्रकारानुरुप परिवर्तन.**

गोमंतकामधील कीर्तन प्रकाराचा परिचय झाला त्यात असे दिसून आले की सुरुवातीच्या कालखंडात गोव्याबाहेरून कीर्तनकार येत असल्याने, खास करून महाराष्ट्रातील येत असल्याने(तो भाग जवळचा) नारदीय कीर्तने अखंडित सुरू आहेत. त्यामुळे नारदीय कीर्तन परंपरेचा प्रभाव गोव्यातील कीर्तनकारांवर पडला. परिणामी गोव्यामध्ये जे कीर्तनकार तयार झाले ते नारदीय कीर्तन परंपरेचा वारसा जपणारे आहेत.

वारकरी कीर्तन प्रकार गोव्यात आजही क्वचितच आढळतो. मडगाव मध्ये हरी मंदिर, विठ्ठल मंदिर त्याचप्रमाणे साखळी, सांगे, म्हापसा या ठिकाणीही विठ्ठल मंदिर असल्यामुळे काही प्रमाणात तेथील कीर्तनकार, मंदिराजवळील लोक वारकरी कीर्तन करायचे परंतु वारकरी कीर्तन परंपरा गोमंतकात तेवढी रुजली नाही. गोव्यात अनेक संप्रदाय होते त्यातील वारकरी व चिदंबर संप्रदाय, काडसिद्धेश्वर संप्रदाय, पद्मनाभ संप्रदाय यांनी आपल्या संप्रदायाची कीर्तने व सांप्रदायिक शिस्त लोकांना लावली.

गोव्यामध्ये चिदंबर संप्रदाय अजूनही आपली कीर्तन परंपरा चालवीत आहे. आजही त्यांचे उत्सव होतात व कीर्तने सुरू आहेत. परंतु गोमंतकातील बहुतांशी कीर्तनकार या संप्रदायात असलेले दिसून येत नाहीत. सद्य:स्थितीत वासुदेव जोशी हे व त्यांच्या कुटुंबातील त्यांचे बंधू चिदंबर संप्रदायातील कीर्तन प्रकार सादर करतात. हा एक प्रकार गोव्यात टिकून आहे. पिढीजात असलेला कीर्तनाचा वारसा जोशी बुवा पुढे चालवीत आहेत.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात लळित कीर्तन प्रकारही गोव्यामध्ये रुजला. गोपाळकाल्याचे कीर्तन गोव्यामध्ये होऊ लागले. रामनवमी, नवरात्र, दत्त नवरात्राच्या वेळी साखळी दत्त मंदिर अशा ठिकाणी लळित कीर्तने व्हायची काही ठिकाणी अजूनही होतात.

नारदीय कीर्तन परंपरेला केंद्रस्थानी ठेऊन राष्ट्रीय कीर्तन प्रकार १९व्या शतकापासून पाहायला मिळतो. गोवा मुक्तिनंतर गोव्या बाहेरून कीर्तनकार येऊ लागले व त्यात वारकरी, रामदासी असे सांप्रदायिक कीर्तनकार येऊ लागले. परंतु गोव्यात मुख्यतः अद्याप नारदीय कीर्तन परंपराच टिकून आहे.

**समारोप**.

प्रस्तुत प्रकरणात, गोमंतकामधील कीर्तनातील परिवर्तने याचा विचार करताना, आशय, विषय व प्रकारानुरुप केलेला आहे. गोव्यातील कीर्तनकार धार्मिक वृत्तीचे असल्याने त्यांचा धर्म ग्रंथाचा अभ्यास होताच. त्याशिवाय तत्कालीन विषयाची त्यांना असणारी जाण ही त्यांच्या कीर्तनाची परिपक्वता स्पष्ट करते. गोमंतकीय समृद्ध कीर्तन परंपरेची सुरुवात जवळजवळ १८व्या शतकाच्या आधीपासून असेल परंतु त्याचे दाखले मिळत नाही. पोर्तुगीज कालखंडातील विषय वैविध्यता, आशय यांचा विचार केला तर कीर्तनकाराच्या विचारांची प्रगल्भता दिसून येते. मोजकेच विषय अगदी समर्पक शब्दांत मांडून कीर्तनातून जनजागृती करण्याची कामगिरी गोमंतकीय कीर्तनकारांनी बजावली होती. आजही गोमंतकीय कीर्तनात आशय वैविध्यता दिसून येते. विषयांत असणारे बदल व त्याचप्रमाणे कीर्तनांची ठिकाणेही बदलेली दिसून येतात. अर्थात कीर्तन हे केवळ आता मंदिरापुरतेच मर्यादित न राहता ते समाजाभिमुख असल्याने त्याचे परिणाम व प्रभाव समाजावर होताना दिसतो.

**निष्कर्ष**.

- काळानुरूप विषयात, आशयात बदल, परिवर्तन होताना दिसते. गोमंत कात कीर्तनाचा प्रकार, राष्ट्रीय कीर्तन प्रकार रुजलेला आहे. इतर प्रकार गोव्याबहेरून आलेले दिसतात उदा. वारकरी, रामदासी. परंतु गोव्यात अन्य प्रकारचे गोमंतकीय कीर्तन अगदीच तुरळक प्रमाणात आढळतात.
- गोमंतकातील कीर्तन परंपरा पुरातन असली तरी त्यात जे नावीन्य आहे त्याचा प्रत्यय येतो.
- गोमंतकातील कीर्तने ही विषय निवडीवर लोकप्रिय होताना दिसतात. कीर्तनकारासाठी असे विषय निवडणे आव्हान असते.
- कीर्तनातील विषय, आशय वैविध्य गोमंतकातील कीर्तन परंपरेला समृद्ध करते.
- सामाजिक, शैक्षणिक, सुधारणावादी विचारसरणी कीर्तनातून व्यक्त होत असल्याने कीर्तनाचा परिणामकारक प्रभाव श्रोत्यांवर पडतो.
- काही कीर्तनकारांनी कोंकणी, मराठी, संस्कृत तसेच सिताराम बुवांनी चित्पावनी भाषेतून कीर्तने केली.
- यातील काही कीर्तनकारांनी आकाशवाणी, दूरदर्शन यावर कीर्तनांचे कार्यक्रम केले.
- कोंकणी भाषेतून आकाशवाणीवर कीर्तन करणारे सिताराम बुवा बर्वे हे पहिले कीर्तनकार होते.
- कीर्तनातून जनजागृती होते. विषयांतील भिन्नता लोकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणते.
- गोमंतकात कीर्तनातून सांस्कृतिक वारसा फार मोठ्या प्रमाणात जपला जात आहे.
- गोमंतकातील कीर्तन परंपरेला विषय, आशय आणि प्रकारामुळे वैशिष्ट्य प्राप्त झालेले आहे.
- गोमंतकाची प्राचीनता टिकून आहे. गोमंतकातील लोकांवर झालेले संस्कार अनेक कीर्तनकार घडवितात.

प्रकरण ५. **समारोप व निष्कर्ष.**

**समारोप.**

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये चार प्रकरणांचा समावेश आहे. महाराष्ट्र व गोवा या दोन राज्यांना केंद्रस्थानी ठेवून कीर्तनाचा अभ्यास केलेला आहे. त्यात नारदीय व वारकरी या दोन कीर्तन प्रकारांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात पाहिले प्रकरण कीर्तनाचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करते, दुसरे प्रकरण कीर्तनातील विविध प्रकारांची प्रयोग पद्धती स्पष्ट करते, तिसऱ्या प्रकरणात गोमंतकीय कीर्तन परंपरेच्या इतिहासाचा आढावा घेतला व त्यानंतर चौथे प्रकरण गोमंतकीय कीर्तनातील परिवर्तने यांचा अभ्यास केला.

पहिल्या प्रकरणात कीर्तनाचे स्वरूप, संकल्पना स्पष्ट केलेली आहे. प्राचीन काळापासून प्रचलित असलेली कीर्तन भक्ती, तिचे स्वरूप काय होते, कशाप्रकारे ती सादर केली जायची याचे विवेचन त्यात केलेले आहे. नवविधा भक्तीत असणारे तिचे दुसरे स्थान व त्यातून अनेकविध भक्ती मार्गाचे सूत्र याचे विवेचन केलेले आहे. कीर्तनातील व्याख्या स्पष्ट करताना, वेदांतील प्रमाणे देऊन, पुराण ग्रंथांपासून कीर्तन भक्तीचे महत्त्व कथन करणाऱ्या अनेक व्याख्या व काही कीर्तनकारांच्या व्याख्या उप प्रकरणात नमूद केलेल्या आहे. पुढील उप प्रकरण हे कीर्तनातील विविध प्रयोगांवर आधारित आहे. त्यात नारदीय, वारकरी, रामदासी, राष्ट्रीय, शाक्त, गाणपत्य या कीर्तन प्रयोगांच्या पद्धतींवर अभ्यास केलेला आहे. त्यात त्यांचा पोशाख, कीर्तनाची परंपरा, कीर्तनाचे स्वरूप या गोष्टींचा विचार केलेला आहे. त्यानंतर कीर्तनातील काव्य, याचा अभ्यास केलेला आहे. त्यात नारदीय कीर्तन, रामदासी व राष्ट्रीय कीर्तन यांत वापरले जाणारे काव्य यांचा विचार समाविष्ट आहे. श्लोक, आर्या, ओवी, दिंडी इत्यादी काव्य प्रकारांचा उदाहरणासहित उल्लेख केलेला आहे. त्यानंतर निष्कर्ष, समारोप लिहून हे प्रकरण पूर्ण केले आहे.

दुसऱ्या प्रकरणात वारकरी व कीर्तनाचा तुलनात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. त्यात वारकरी कीर्तनाची परंपरा, नारदीय कीर्तनाची परंपरा यांच्या विषयी अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे प्रकारांचाही तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास केलेला आहे. यातील प्रकरणात वारकरी कीर्तन व नारदीय कीर्तन यातील साम्य भेदांचा विचार केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात गोमंतकीय कीर्तन परंपरेचा इतिहास अभ्यासलेला आहे. गोमंतकीय कीर्तनाची स्वरूप व वैशिष्ट्ये याचाही विचार यात समाविष्ट आहे. अधिकतम योगदान दिलेल्या गोमंतकातील कीर्तनकारांचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. गोमंतकीय कीर्तनाची वाटचाल व सद्य स्थितीत असलेली कीर्तन परंपरा याचा थोडक्यात आढावा प्रकरणातून घेतलेला आहे.

चौथे प्रकरण गोमंतकीय कीर्तनातील परिवर्तने यांचा अभ्यास करणारे आहे. त्यात आशय, विषय व प्रकारानुरुप निदर्शनास आलेली भिन्नता, स्वरूप व गोमंतकात बदलत गेलेले कीर्तनाचे स्वरूप यांचा विचार केलेला आहे. गोमंतकाची सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता, त्यानुसार अनेक कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनात बदल केले. त्यात जे लक्षणीय बदल होते त्यांचा उहापोह या प्रकरणाच्या माध्यमातून केलेला आहे.

प्रबंधिका लेखना दरम्यान अनेक कीर्तनकारांशी चर्चा झाली. त्यात त्यांचे असे म्हणणे होते की गोमंतकात कीर्तन परंपरा टिकून होती. हेच गोमंतकीय कीर्तनकारांचे भाग्य आहे असे जाणवले. आजतागायत असलेली गोमंतकीय परंपरा पुढेही अखंडित रहावी यासाठी काही कीर्तनकार सदैव प्रयत्नशील आहेत. अनेक बाल-युवा कीर्तनकारांची पिढी कीर्तन भक्तीचा साधन व माध्यम या अनुषंगाने विचार करून, त्याचा प्रचार व प्रसार करीत आहे.

कीर्तनाची समृद्ध परंपरा लक्षात घेता, गोमंतकीय लोकांमध्ये धार्मिक भावनांची विशेष वृत्ती दिसून येते. गोमंतकात जेवढी जुनी मंदिरे, तेवढीच जुनी कीर्तन परंपरा आहे. गोव्यात आधी बाहेरून कीर्तनकार यायचे व गोव्यातील कीर्तनकार बाहेर कीर्तने करू लागले. आजही गोव्यातील प्रसिद्ध कीर्तनकार गोवा तसेच गोव्याबाहेर कीर्तनाचे कार्यक्रम करतात. गोव्यातील तीन कीर्तनकारांना शिष्यवृत्ती मिळाली होती.

कीर्तनकार ह.भ.प.विवेकबुवा जोशी यांच्याशी चर्चा करताना असे आढळून आले की, कला अकादमी सुरुवातीच्या कालखंडात कीर्तन महोत्सव आयोजित करायचे आता ते केले जात नाहीत. सरकार दरबारी देखील याची नोंद घेतली जात नाही. कीर्तनासाठी अनेक पुरस्कार दिले जायचे तेही आता बंद आहेत. त्यामुळे कीर्तनाच्या बाबतीत राजकीय दृष्टिकोनातून उदासीनता दिसून येते. त्याचप्रमाणे जर सरकार तर्फे कीर्तन विद्यालयासाठी आणखी प्रयत्न करता आले तर निश्चितच गोमंतकीय कीर्तन परंपरा अधिक वृद्धिंगत होईल.

या प्रबंधिकेचा हेतू गोमंतकीय कीर्तन परंपरा सर्वांपर्यंत पोहोचावी यासाठी हा अभ्यास आवश्यक होता. कीर्तन प्रकारचा परिचय व गोमंतकात कीर्तनाचे असणारे स्थान स्पष्ट करण्याचा हेतू होता. या प्रबंधिकेमुळे गोमंतकातील नारदीय कीर्तनाचा परिचय झाला. विविध कीर्तनकारांसोबत ज्या चर्चा झाल्या, त्यातून कीर्तनासाठी खूप कार्य करता येऊ शकते असे दिसून आले.

गोव्यात आधी कीर्तन महोत्सव व्हायचे ते बंद झाले, कला अकादमी तर्फे पुरस्कार किंवा स्पर्धा व्हायच्या त्या कमी झाल्या. राजकीय उदासीनतेमुळे कीर्तनाची प्रगती कमी प्रमाणात होते, त्यात वाढ व्हावी या दृष्टिकोनातून राजकीय स्तरावरून प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष.**

- कीर्तन संस्था म्हणजे सांस्कृतिक इतिहासाचे प्रतीक आहे.
- प्राचीन कीर्तनाचे स्वरूप लक्षात घेता, कीर्तनाला सामुदायिक भक्तीचे सुलभ साधन व मोक्षाचे साधन म्हटलेले आहे.
- कीर्तनातून कांतासम्मित उपदेश केला जातो.
- प्राचीन काळापासून कीर्तनाचे दोन प्रमुख संप्रदाय मानले जातात. वैय्यासिक, म्हणजे जो संप्रदाय व्यास महर्षींनी प्रवर्तित केला व दुसरा नारदीय संप्रदाय, जो नारदांपासून सुरू झाला.
- वेदकाळापासून कीर्तनाची महती वर्णन केली जाते.
- श्रीमद् भागवत ग्रंथात नारदीय कीर्तनाचे उल्लेख आढळतात.
- संत ज्ञानदेव महाराजांचा कीर्तन विषयी जो दृष्टिकोन होता त्याचा नामदेव महाराजांनी प्रत्यक्षात विस्तार केला.
- समर्थ रामदास स्वामींच्या वचनातून भक्ती मार्गाच्या प्रसार आधी हेतूने रामदासी कीर्तन ही प्रयोग पद्धती उदयाला आली.
- समर्थ रामदासांनी ‘पहिले ते हरीकथा निरूपण’ असे म्हणून कीर्तनाचा पुरस्कार केला व राम भक्ती लोकांत रुजवली.
- कीर्तनाविषयी असे म्हटले जाते की, “कीर्तन हा बंदिस्त साचा नाही ते मानसिक उपासनेचे अधिष्ठान आहे.”
- कीर्तनात पंडिती काव्याचा वापर होऊ लागला व त्यामुळे कीर्तनाला रंजकतेचे स्वरूप प्राप्त झाले.
- कीर्तनामध्ये जरी वारकरी, रामदासी, नारदीय, राष्ट्रीय, शाक्त, गाणपत्य हे प्रमुख संप्रदाय असले तरी सध्या नारदीय व वारकरी कीर्तन परंपरा अधिक प्रमाणात प्रचलित असलेली आढळते.
- कीर्तनाला भगवत भक्तीचे साधन म्हटले जाते व समाज प्रबोधनाचे उत्तम माध्यम असे संबोधले जाते. कीर्तनातून नामचिंतन भक्ती भक्तीचे तत्त्वज्ञान तत्त्वज्ञानातील भक्ती या सर्वांची समर्पक मांडणी केली जाते.

- महाराष्ट्रामध्ये वारकरी व नारदीय कीर्तनाचे दोन प्रवाह आहेत गोमंतकामध्ये नारदीय प्रवाह अधिक प्रमाणात आहे.
- महाराष्ट्र तसेच गोव्यातही कीर्तनांची घराणी झालेली आहे.
- परमार्थ साधना व लोकोधरासाठी असणारी तळमळ कीर्तनातून दिसून येते.
- नारदीय व वारकरी कीर्तनात अनेकविध साम्य भेद असलेले आढळतात. नारदीय व वारकरी कीर्तनाची परंपरा देखील वेगळी आहे.
- नारदीय व वारकरी कीर्तनातील सादरीकरणात वेगळेपणा आढळतो. त्यामुळेच या दोन्ही कीर्तन पद्धतीचे स्वतंत्र वैशिष्ट्य जाणवते.
- नारदीय व वारकरी कीर्तनामधे प्रतिपादित केले जाणारे विषय भिन्न असतात.
- गोमंतकातील कीर्तन परंपरेचा इतिहास समजून घेताना गोमंतकातील धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात येते.
- गोमंतकीय कीर्तनकारांचे कीर्तनात असलेले विशेष योगदान  असल्याचे आढळून आले.
- आजतागायत गोमंतकीय कीर्तनाचे स्वरूप नारदीय कीर्तन परंपरेतील आहे.
- गोमंतकात काडसिद्धेश्वर, चिदंबर, पद्मनाभ संप्रदाय अस्तित्वात असल्याचे उल्लेख आढळतात. त्यातील चिदंबर संप्रदायाचे लोक वारकरी पद्धतीचे कीर्तन अजूनही करतात.
- कालांतराने गोमंतकातील कीर्तनात विषयानुरुप, आशयानुरुप, प्रकारानुरुप परिवर्तने झालेली दिसून येतात.
- कीर्तनात वैविध्यता असल्यामुळे कीर्तनाचा श्रोता वाढत आहे. अनेक तरुण पिढीतील कीर्तनकार आपापल्या परीने विषय मांडतात.
- कीर्तनाच्या सादरीकरण शैलीमुळे कीर्तनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.
- महाराष्ट्राप्रमाणेच गोव्यातही कीर्तनाची समृद्ध वाटचाल सुरू असलेली दिसून येते.

- कीर्तनाचे जीवनात असणारे अनन्यसाधारण महत्त्व लोकांना पटल्यामुळे विविध स्थळी, उत्सव प्रसंगी कीर्तनाचे आयोजन केले जाते.
- गोमंतकीय कीर्तनकार आपल्या शैलीतून कीर्तन करून कीर्तनात विविधता आणतात.
- कीर्तनातून जनजागृती करण्याच्या दृष्टीने विविध उत्सवाच्या निमित्ताने कीर्तने केली जातात.
- कीर्तन करण्याच्या वैविध्यतेमुळे व वास्तवाचे संदर्भ देऊन हल्लीच्या काळात कीर्तने केली जातात. कीर्तनाची आख्याने जरी एकसारखी असली तरी अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्यामुळे कीर्तनातील श्रोत्यांची उपस्थिती वाढत आहे.
- कीर्तन संमेलनांच्या माध्यमातून नवनवीन कीर्तनकारांना संधी मिळते.
- कीर्तन विद्यालयाच्या माध्यमातून आजही गोमंतकात अनेक कीर्तनकार घडविले जात आहेत.
- बाल-युवा कीर्तनकार उर्वरित काळात कीर्तने करीत नाही याचे कारण, राजकीय, सामाजिक, संस्कृती उदासीनता, विचारसरणी या गोष्टी आहेत. तरी काही कीर्तनकार कीर्तन सेवेचे व्रत चालवत आहेत.
- एकंदरीत गोमंतकाची सद्यस्थितीतील सांस्कृतिक पार्श्वभूमी बघता, काही ज्येष्ठ कीर्तनकारांच्या मते गोमंतकातील कीर्तन परंपरा अखंडित सुरू राहणे विषयी शंका वाटते.
- राजकीय स्तरावरही कीर्तनाला म्हणावा तेवढा राजाश्रय मिळत नसल्यामुळे तरुण पिढी कीर्तनाकडे वळेल याबाबत काही कीर्तनकार साशंक आहेत.
- कीर्तन हा एक संस्कार म्हणून मुलांच्या मनावर बिंबवले तर मुले कीर्तन परंपरा पुढे चालवतील.
- कीर्तन संस्थेत जरी विविध प्रकार असले तरी भगवद्भक्ती व समाज प्रबोधन हेच उद्दिष्ट असते.

**परिशिष्ट.**

**गोमंतकीय कीर्तनकारांची नामावली.**

ह. भ. प. मनोहखुवा वा. जोग, फोंडा

ह. भ. प. मंदाखुवा मनोहर जोग, फोंडा

ह. भ. प. दामोदखुवा वामन चारी, फोंडा

ह. भ. प. केशवबुवा माधव शिवडेकर, कवळे

ह. भ. प. संजयबुवा नरहर व्यास, खांडोळा, माशेल

ह. भ. प. सुहासबुवा लक्ष्मण वझे, फोंडा

ह. भ. प. सुधीरखुवा सुर्लकर, फोंडा

ह. भ. प. कु. साधना गणपती दांडेकर, बोरी, फोंडा

ह. भ. प. शामरावबुवा गोविंद सामंत, फोंडा

ह. भ. प. गजाननबुवा काशिनाथ नाईक, ढवळी

ह. भ. प. गोपाळबुवा दामले, फोंडा

ह. भ. प. प्रमोदबुवा कपिलेश्वरकर, फोंडा

ह. भ. प. गायत्री बाळकृष्ण कदम, फोंडा

ह. भ. प. सी. वृंदा लक्ष्मण वझे, फोंडा

ह. भ. प. मनोजबुवा भांडणकर, फोंडा

ह. भ. प. गणेश शंकर भट्ट, फोंडा

ह. भ. प. गौरीकुमार तिळवे, फोंडा

ह. भ. प. सौ. सुनीती मराठे, फोंडा

ह. भ. प. उमा उदय सहकारी, फोंडा

ह. भ. प. विनायक विवेक भट प्रभू, फोंडा

ह. भ. प. सुरज दामोदर गवस, फोडा

ह. भ. प. शुभला विश्राम नाईक, फोंडा

ह. भ. प. विभव दामोदर मडकईकर, फोंडा

ह. भ. प. विभा जयवंत भटप्रभु, फोंडा

ह. भ. प. रुद्राक्ष सुहास वझे, फोंडा

ह. भ. प. उत्पल उदय सहारी, फोंडा

ह. भ. प. शिवानी सुहास वझे, फोंडा

कु. चिन्मई दामोदर कामत, सावई वेरे- फोंडा

ह. भ. प. दामोदर वसंत सामंत, म्हार्दोळ

कु. वेदश्री विवेक बोरकर, फोंडा

कु. अमृता आनंद करंबळेकर, फोंडा

कु. चैतन्य संजय कोरडे, फोंडा

कु. ऋषीकेश अनंत साने, फोंडा

कु. सुशांत दा. गवस, फोंडा

कु. आकांक्षा आनंद करंबळेकर, फोंडा

ह. भ. प. गजेश नाईक, फोंडा

ह. भ. प. कु. प्राची प्रदीप, फोंडा

ह. भ. प. कु. कोमल अनंत साने, फोंडा

ह. भ. प. सौ. गायत्री संदीप टेंग्से, फोंडा

ह. भ. प. कु. असित अवधुत टेंग्से, फोंडा

ह. भ. प. कु. निषाद उपाध्ये, फोंडा

ह. भ. प. कु. शांभवी कालीदास सावईकर, फोंडा

ह. भ. प. श्री. सात्विक दत्तात्रेय अभिषेकी, फोंडा

ह. भ. प. कु. धनश्री बाबुसो नाईक, फोंडा

ह. भ. प. पांडुरंग येसो सावंत, फोंडा

ह. भ. प. कु. अवनी अवधूत टेंग्से, फोंडा

ह. भ. प. कु. स्नेहा प्रकाश अभिषेकी, फोंडा

कु. गौरांग कृष्णनाथ आळवणी, म्हार्दोळ

ह. भ. प. कु. कांची गिरीश आळवणी, प्रियोळ

ह. भ. प. कु. अनुजा अच्युत पिंगे, फोंडा

ह. भ. प. कु. राजमती धाकटी नाईक, फोंडा

ह. भ. प. कु. निशा धाकु गावणेकर, फोंडा

ह. भ. प. कु. सरिता दत्तो नाईक, फोंडा

ह. भ. प. कु. सुवर्णलता गु. आमोणकर, फोंडा

ह. भ. प. कु. रामेश्वर पां. मांद्रेकर, फोंडा

ह. भ. प. तुळशीदास कृष्णा नाईक, फोंडा

ह. भ. प. शिवदास अनंत गावडे, फोंडा

ह. भ. प. विष्णु नागेश गावडे, फोंडा

ह. भ. प. जय येसो खांडोळकर, फोंडा

ह. भ. प. ज्ञानेश्वर सगुण खांडेपारकर, फोंडा

ह. भ. प. अनंत महादेव गावडे, होंडा, सत्तरी

ह. भ. प. तुळशीदास काळू गावडे, फोंडा

ह. भ. प. तुकाराम मंगेश नाईक, फोंडा

ह. भ. प. कु. मंजिता मोहनदास नाईक, फोंडा

ह. भ. प. कु. प्राची मनोहर दामले, फोंडा

ह. भ. कु. वर्धन कृष्णनाथ सहकारी, फोंडा

ह. भ. प. शिवाजी रा. सावकार, फोंडा

ह. भ. प. कु. प्राची गोविंद देव, फोंडा

कु. दिव्या दत्ता शेणवी मावजेकर, फोंडा

आनंदराव घैसास, फोंडा

कु. ब्रह्मय देवानंद सुर्लकर, फोंडा

कु. प्रियंवदा सिद्धार्थ मिरींगकर, शिरोडा

ह. भ. प. रविंद्र कृ. कामत, मंगेशी

ह. भ. प. सुरेश शिरोडकर, शिरोडा

ह. भ. प. उमेश विष्णू फडके, शिरोडा

ह. भ. प. प्रदिप वीर, शिरोडा

ह. भ. प. कु. आशना आशिषकुमार भगत, मार्शल

ह. भ. प. कु. अदिती आशिषकुमार भगत, मार्शल

ह. भ. प. कु. धनश्री जय खांडोळकर, मार्शेल

ह. भ. प. कु. विभूति आनंद उपाध्ये, फोंडा

ह. भ. प. कु कौशलराम श्रीकृष्ण जोशी, फोंडा

ह. भ. प. मुकुंदबुवा बाबनी मडगावकर, बार्देश

ह. भ. प. विनयबुवा मुकुंद मडगावकर, बार्देश

ह. भ. प. शरणबुवा मुकुंद मडगावकर, बार्देश

ह. भ. प. सोमाबुवा महादेव गंवस, बार्देश

ह. भ. प. कृष्णबुवा झीला चोडणकर, बार्देश

ह. भ. प. धोंडीबुवा रघुनाथ निवतकर, बार्देश

ह. भ. प. रत्नकांतबुवा साळगांवकर, बार्देश

ह. भ. प. सहदेव काशिनाथ महाले, बार्देश

ह. भ. प. कु. विवेक सदानंद गोखले, म्हापसा

ह. भ. प. श्री. रामचंद्र नाईक, अस्नोडा

ह. भ. प. विश्वजित वल्लभ फडके, बार्देश

कु. नेहा अभय उपाध्ये, बार्देश

कु. भक्ती संजय धुपकर, बार्देश

कु. शांभवी अविनाश मणेरीकर, बार्देश

कु. सृष्टी दे. दाभाळे, बार्देश

कु. सिद्धी दे. दाभाळे, बार्देश

ह. भ. प. कु. शिवमाया सोमा गंवस, बार्देश

कु. रमा विराज शेणवी, बार्देश

ह. भ. प. भास्कर देवेंद्र साठे, म्हापसा

ह. भ. प. कु. सिद्धी देवू दाखाळे, बार्देश

ह.भ.प.निशांत समीर काळे, बार्देश

ह. भ. प. कु. आकांक्षा अमोल प्रभू, म्हापसा

ह. भ. प. साईदास आपटे, पेडणे

ह. भ. प. रामचंद्रबुवा यशवंत परांजपे, पेडणे

ह. भ. प. विष्णुबुवा गणेश शेटगांवकर, पेडणे

ह. भ. प. जनार्दनबुवा बर्वे, पेडणे

ह. भ. प. मंजीरी सीताराम गणपुले, पेडणे

ह. भ. प. कु. वृषा अनिल नाईक, पेडणे

ह. भ. प. कु. भक्ती संजय धुपकर, पेडणे

ह. भ. प. कु. अनिशा आनंद उपाध्ये, पेडणे

कु. सिद्धी सोमनाथ पार्सेकर, पेडणे

ह. भ. प. नारायणबुवा विष्णु बर्वे, सत्तरी

ह. भ. प. सदानंदबुवा गोपाळ बर्वे, सत्तरी

ह. भ. प. सौ. मुग्धा (अपर्णा बर्वे) माधव जोशी, सत्तरी

ह. भ. प. अदिती जयंत बर्वे, सत्तरी

ह. भ. प. विवेकबुवा लक्ष्मण जोशी, सत्तरी

ह. भ. प. सौ. सविता दिनराज देसाई, सत्तरी

ह. भ. प. दत्तात्रेयबुवा रघुनाथ जोग, सत्तरी

ह. भ. प. कु. योगेश्वरी शहाजी राणे, सत्तरी

ह. भ. प. कु. कल्याणी केशव जोशी, सत्तरी

ह. भ. प. कु. कृपा केशव जोशी, सत्तरी

ह. भ. प. कु. मंजुषा रघुनाथ जोशी, सत्तरी

ह. भ. प. कु. सोनाली रामकृष्ण वझे, सत्तरी

ह. भ. प. सौ. गीताश्रुती गजानन वझे, सत्तरी

ह. भ. प. कु. सर्वजित संतोष बर्वे, सत्तरी

ह. भ. प. कु. योगीता बाळकृष्ण नाईक, सत्तरी

ह. भ. प. कु. रंजित बाळकृष्ण नाईक, सत्तरी

ह. भ. प. श्री. गुरूदास नारायण सुतार, सत्तरी

कु. भक्ती गुरुदास सुतार, सत्तरी

कु. मयुरेश गुरुदास सुतार, सत्तरी

ह. भ. प. कु. अभिषेक प्रदिप जोशी, सत्तरी

ह. भ. प. कु. अवधूत वामन मराठे, सत्तरी

कु. आर्या गुरुदास वझे, सत्तरी

ह. भ. प. अनंत म. गावडे, सत्तरी

ह. भ. प. रघुनाथ के. च्यारी, सत्तरी

ह. भ. प. किशोरी देसाई, सत्तरी – गोवा

ह. भ. प. प्रसादबुवा गाडगीळ, डिचोली

ह. भ. प. श्रीकृष्ण दामोदर केळकर, डिचोली

ह. भ. प. वासुदेवबुवा विष्णु वझे, डिचोली

ह. भ. प. भालचंद्र रामकृष्ण सिद्धये, डिचोली

ह. भ. प. रामकृष्ण अनंत गर्दे, डिचोली

ह. भ. प. देवीदास विष्णु उमर्ये, डिचोली

ह. भ. प. अभयबुवा अनंत जोग, डिचोली

ह. भ. प. नीलकंठबुवा धुंडीराज जावडेकर, डिचोली

ह. भ. प. कु. उर्वी उदय फडके, मुळगाव

ह. भ. प. नरसिंहबुवा कृष्णा गोवेकर, डिचोली

ह. भ. प. अजितबुवा टाककर, डिचोली

ह. भ. प. उदयबुवा विष्णु फडके, डिचोली

ह. भ. प. उत्पलबुवा उदय फडके, डिचोली

कु. अभिजीत अभय जोग, पाळी

ह. भ. प. गजानन यशवंत मोने, डिचोली

ह. भ. प. विश्वनाथ बाळकृष्ण दांडेकर, डिचोली

ह. भ. प. कु. वंदना विनायक वझे, डिचोली

कु. श्रद्धा श्रीकृष्ण धोंड, डिचोली

कु. अर्चना सुधाकर डिचोलकर, साखळी

कु. सायली रामकृष्ण गर्दे, डिचोली

ह. भ. प. नारायणबुवा रामचंद्र फडके, डिचोली

ह. भ. प. देविदास वळवईकर, डिचोली

ह. भ. प. किशोर देसाई, डिचोली

ह. भ. प. रामचंद्र च्यारी, डिचोली

सिद्धार्थ आमोणकर, डिचोली

गजाननबुवा देसाई, डिचोली

मुकुंदबुवा कवठणकर, डिचोली

संतोषबुवा गोरे, डिचोली

सौ. तृप्ती माया सु उमर्ये, डिचोली

देविदासबुवा उमर्ये, डिचोली

कु श्रवण सु. कांसार, डिचोली

देविदास गो. सायनेकर, डिचोली

सौ. मंजूषा जोशी, डिचोली

श्रीमती प्रज्वलिता गाडगीळ, साखळी

कु. रक्षंदा दिनेश नाईक, डिचोली

डॉ. सुबोध विनायक कांसार, डिचोली

ह. भ. प. रामा अ. शिरोडकर, डिचोली

ह. भ. प. किशन मोहनदास नाईक, सालसेत

ह. भ. प. दत्तगुरुबुवा कृष्ण अभ्यंकर, सडा

ह. भ. प. श्रवण रविंद्र मणेरीकर, वास्को

ह. भ. प. चंद्रदासबुवा वामन जोशी, मडगाव

ह. भ. प. रोहित शशिकांत दांडेकर, मडगाव

ह. भ. प. सौमिनी सप्रे, फातर्पा

ह. भ. प. माधव गु. मणेरीकर, मडगाव

ह. भ. प. संजयबुवा रामचंद्र टेंगसे, काणकोण

ह. भ. प. दत्तात्रेय (व्यंकटेश) दुर्गाराम टेंगसे, काणकोण

ह. भ. प. निशिकांतबुवा नागेश टेंगसे, काणकोण

ह. भ. प. मनोहरखुवा दत्ताराम आमशेकर, काणकोण

कु. श्रिया मनोहर टेंगसे, काणकोण

**ग्रंथसूची.**

संपा. देसाई गोविंद विनायक, श्रीमद्भागवतमहापुराणम्((सरलमराठीव्याख्यासहितम्) प्रथमः खण्डः (प्रथमस्कन्धादारभ्याष्टमस्कन्धपर्यन्तः), गीताप्रेस, गोरखपूर, पाँचवाँ पुनर्मुद्रण.

**संदर्भसूची**

कोपरकर, गं. ना. कीर्तनाची प्रयोगप्रक्रिया, कीर्तन महाविद्यालय प्रकाशन पुणे, १०/१०/१९८२

पाठक, यशवंत. कीर्तन – प्रयोग, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १५, सप्टे. २०१५

जोशी, पी.जी. कीर्तनरंग, मीरा बुक्स अँड पब्लिकेशन, प्र. आवृत्ती, २२ जानेवारी २०१०.

संपा. कोपरकर, गं. ना. कंथा हरिदासांची, गं. ना. कोपरकर, कीर्तन महाविद्यालय पुणे, प्र आवृत्ती २०००.

खेडेकर, विनायक विष्णू. लोकसरिता, कला अकादमी, पणजी, गोवा

पाठक, यशवंत. नाचू कीर्तनाचे रंगी, मराठी. कीर्तन संस्थेचा चिकित्सक अभ्यास, कॉन्टिनेन्टल, प्रकाशन पुणे, प्र. आवृत्ती, १९८०

काळे, गोविंद. सुखे नाचा हो कीर्तनी, गोवा मराठी अकादमी, पणजी, गोवा. मार्च २०२२.

संपा. देशपांडे, श्री. द. सार्थ श्रीनारदभक्तिसूत्राणि, श्री वामनरज प्रकाशन, पुणे, तृ आवृत्ती, १ एप्रिल १९९७.

**स्मरणिका.**

संपादक – कोमरपंत, सोमनाथ. गोमंत-वैखरी, स्मराणका, कोकण मराठी परिषद, गोवा प्र. आवृत्ती. १५ जाने. २०१०.

**व्यक्तीनाम सूची** –

ह.भ.प. उदयबुवा फडके

ह.भ.प. सुहासबुवा वझे.

ह.भ.प. विवेकबुवा जोशी.

ह.भ.प. मुकुंदराजबुवा मडगांवकर.

ह.भ.प. सोमाबुवा गांवस

ह.भ.प. वासुदेव बुवा जोशी.

ह.भ.प. मनोहरबुवा आमशेकर.

ह.भ.प. रामकृष्णबुवा गर्दे.

श्री. सनतकुमार कामत.

डॉ. प्रा. विनय मडगांवकर.

प्रा. अदिती बर्वे.